आज मराठी समीक्षकांमध्ये अशी एक विचारधारा दिसते, की स्त्री-पुरुष संबंधविषयक धीटपणे काही सांगणारी कलाकृती नवी आणि म्हणून चांगली आहे. व्यक्तिशः मला हे मत कलाबाह्य आणि म्हणून अप्रस्तुत वाटते. हे जितके अप्रस्तुत वाटते तितकेच ज्या कलाकृतीमध्ये समाजाने निषिद्ध मानलेला अनुभव व्यक्त केला आहे ती अश्लिल आणि म्हणून समाजविघातक आहे, हेही मत अप्रस्तुत वाटते. प्रत्येक कलाकृतीमध्ये एक स्व-तंत्र निर्माण होते. या तंत्राच्या तर्कक्रमात जे योग्य ते श्लील असेच मानणे योग्य



# माणूस

शनिवार

८ एप्रिल १९७२

पन्नास पैसे

होईल. म्हणूनच श्री. विजय तेंडुलकरांचे ' सखाराम बाइंडर ' हे नाटक अश्लिल आहे, समाजविघातक आहे हे मत मला मान्य होणार नाही. वरवर पहाता सभ्य समाजात स्त्री-पुरुष संबंधविषयक उच्चारले न जाणारे शब्द, प्रत्यक्ष सुखाच्या प्रसंगाची सूचना, स्त्री-पुरुष संबंधातील अनेक विकृतींचे दर्शन हे सारे भडकपणे या नाटकात आहे. परंतु या नाटकाचा सर्वांगीण परिणाम उत्तेजक नसून जुगुप्सेचा आणि माणसाविषयीच्या अतीव करुणेचा आहे. हा परिणाम जिथे आहे, तिथे अश्लीलता लोकानुरंजनासाठी आलेली नसून जीवनाच्या एक भेदक अनुभव व्यक्त करण्यासाठी अपरिहार्यतेने आलेली आहे, हे उघड आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ८ एप्रिल १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पंचेचाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## मराठी माणसाचे ग्रंथप्रेम !

◻ आपला १ एप्रिलचा माणूस आज मिळाला. त्या अंकात आपण लिहिलेले 'कुपन' (पृष्ठ ३२–३३ वर) नाही. तरी ते कूपन कोठे नाहीसे झाले हे कळत नाही. माझा कुपन नंबर मला कसा समजणार? तरी हे पत्र पोचताच आपल्या यादीत माझा कुपन नंबर पहावा व मला १०० रु. किमतीची पुस्तके भेट देणार असाल तर पुस्तक पाठवण्याच्या खर्चाच्या V. P. P. ने पुस्तके पाठवण्याची तसदी घ्यावी. मुद्दाम ताबडतोब कळवित आहे.

३० मार्च १९७२ — डॉ. व्ही. एस. मुळे संगमेश्वर, (रत्नागिरी)

◻ आपले माणूस साप्ताहिक दि. १ एप्रिल १९७२ चे पोचले. पान एकवर आपण पान ३२–३३ वर सप्रेम भेट कुपन जोडल्याचे छापले आहे. आम्हाला आलेल्या अंकातील कुपन कोणीतरी काढून घेतले आहे याची नोंद घ्यावी. व कृपया आमच्या अंकातील कुपन कोणी आणून दिल्यास त्यास पुस्तके देऊ नयेत.

३१–३–७२ — सौ. इंदिरा तांबे, मुंबई

◻ आताच पोस्टाने अंक हाती आला परंतु त्यात पहिल्या पानावर लिहिल्याप्रमाणे

मुखपृष्ठ छायाचित्र : नीलकंठ प्रकाशनच्या सौजन्याने – रचना : देवीदास बागूल

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

माझ्या अंकात भेट कुपन नाही तरी खुलासा व्हावा.

३०–३–७२ — य. भ. गाडे, ठाणे

□ आपण माणूसच्या वार्षिक वर्गणीदारांसाठी देऊ केलेली भेट फारच अभिनव आहे. मला आलेल्या अंकाबरोबर जे भेटकुपन आले आहे ते विषम क्रमांकाचे आहे. पण १० एप्रिलपूर्वी कार्यालयात प्रत्यक्ष येणे मला शक्य नसल्याने कृपया आपण आपली भेट पोष्टाने पाठविण्याची कृपा करावी.

१–४–७२ — सुभाष य. रेळेकर, सिल्व्हासा

□ आपला दि. १–४–७२ चा अंक आजच पोहचला. या अंकातील पान नं १ वर आपण एक निवेदन दिलेले वाचले.

त्या निवेदनात आपण पान ३२–३३ वर एक सप्रेम भेट कुपन असल्याचे कळवले आहे.

या निवेदनाप्रमाणे अंक तपासता पान नं. ३२–३३ वर 'सप्रेम भेट कुपन' आढळले नाही. तरी शंका एक की हे कुपन आपल्याकडून चुकून पाठवले गेले नसेल.

कदाचित पोस्टात काढले गेले असेल.

पत्र एव्हढ्याच करता, की आपल्याकडे कदाचित कोणत्या क्रमांकाचे कुपन कोणत्या वर्गणीदाराकडे गेले याची नोंद असेल तर माझ्या नावावर असलेल्या कुपनला जर पुस्तके मिळणार असतील तर ते कुपन दुसऱ्या कोणी आणल्यास त्यांना मिळू नये व आपल्याला खोटे समाधान, की योग्य माणसास भेट दिले हे. म्हणून खुलासा. आपल्या उत्तराची अपेक्षा आहे.

३० मार्च, १९७२ — राजा दीक्षित, मुंबई

□ आपल्या आज मिळालेल्या १ एप्रिलच्या अंकामध्ये पहिल्या पानावर लिहिल्या-प्रमाणे अंकाच्या मध्यभागी पान ३२–३३ वर पाहिले परंतु 'सप्रेम भेट कुपन' मिळाले नाही. मजकुरावरून असे वाटते की आपण प्रत्येक अंकात एक कुपन दिले आहे. तरी मला आलेल्या अंकात कुपन आलेले नाही याची नोंद घ्यावी.

शक्य असल्यास असे का ते कळवावे.

३० मार्च, १९७२ — चं. रा. नाफडे, मुंबई

□ नेहमीप्रमाणेच १ एप्रिल ७२ चा अंकही आज मला मिळाला आहे. त्यात आपण माणूस वर्गणीदारांसाठी 'अभिनव भेट योजना' म्हणून एक कुपन (१०० रुपये किंमतीचे) जोडण्यात आल्याचे लिहिले आहे, परंतु मला मिळालेल्या 'माणूस'मध्ये असले कुपन आलेले दिसत नाही. ३२–३३ पानाच्या दरम्यान काहीतरी फाडल्याचे दिसते. शिवाय एक पिनही उचकटली गेली आहे. माझ्या समजुतीनुसार पोस्टाला आपल्या या योजना आधीच माहिती असाव्यात. का ही १ एप्रिलची काही खास

वार्ता आहे ? योजना खरी असेल तर माझे १०० रुपये गेले असे मी मानतो, कारण त्या कुपनचा नंबर विषम असावा म्हणूनच ते गेले.

३० मार्च १९७२ — ल. भा. आदमणे, पुणे

▫ आमचा वर्गणीदार क्रमांक R १६०५ आहे. नाव-श्री. व्ही. आर. दांडेकर, कर्जत जि. कुलाबा. साप्ताहिक माणूसच्या, १ एप्रिल १९७२ च्या अंकात 'माणूस वर्गणीदारांसाठी 'अभिनव भेट' या शिर्षकाखाली, व्यवस्थापकांच्या सहिनिशी 'सप्रेम कुपन भेट'ची योजना दिली असून पान ३२–३३ वर एक सप्रेम भेट कुपन जोडण्यांत आले आहे असे म्हटले आहे. परंतु खेदाची गोष्ट अशी ही की, पृष्ठ ३२–३३ वर हे कुपन जोडण्याचे राहून तरी गेले असावे, अथवा तेथेच कोणीतरी काढून घेतले असावे. किंवा हा 'एप्रिल फूल' करण्याचाच एक प्रकार तर नव्हे ना ? तरी आपण या गोष्टीची चौकशी करवून दुसरे कुपन (अंकासह) पाठविणे. पत्रोत्तर त्वरीत पाठविण्याची विनंती आहे.

३० मार्च, १९७२ — सौ. शै. व. दांडेकर, कर्जत

▫ आत्ताच माणूस १ एप्रिल १९७२ चा अंक मिळाला. सलामी–रुपया–वार्षिक वर्गणीदारासाठी १ एप्रिल रोजी जाहीर केलेली अभिनव भेट वाचली. अंकामधील ३२–३३ पानात कुपन जोडले नाही. म्हणून चि. सुहासने कुणीतरी कुपन काढून घेतल्याचा तर्क केला. आपल्या अभिनव एप्रिल फूलबद्दल धन्यवाद !

३० मार्च, १९७२ — एन. सी. म्हात्रे, मुंबई

▫ आज आपला माणूसचा अंक मिळाला. पहिल्याच पानावर माणूस वर्गणीदारांसाठी अभिनव भेटीचा मजकूर वाचला. त्याप्रमाणे पान ३२–३३ मध्ये कुपन निघते का पाहिले पण आढळले नाही. म्हणून पाने चाळून पाहिली पण मिळाले नाही. तेव्हा असा विचार मनात आला की एप्रिल फूल सदराखाली आपण सहा गोष्टी दाखविल्या आहेत; त्यातली ही एक सातवी असेल काय ?

३० मार्च १९७२ — श्री. ल. गाडगीळ, पुणे

[ कुपनसंबंधी विचारणा करणारी बरीच पत्रे माणूसकडे एकूण आली. समक्ष येऊन चेहरा टाकून गेलेले वाचकही काही कमी नव्हते. अंक हातात पडल्यावर फोनकडेही अनेकजणांनी धाव घेतली, केवढे हे मराठी माणसाचे ग्रंथ प्रेम !

एक संतप्त युवक हा एप्रिल फूलचा प्रकार आहे हे समजल्यावर जाता जाता म्हणाला : मानलं आपण तुम्हाला !

सगळ्यांनी खिलाडूपणाने ही थट्टामस्करी स्वीकारली यामुळ खेळाला चांगलाच रंग चढला. सर्व खेळाडूंचे मन:पूर्वक आभार. — व्यवस्थापक माणूस ]

# सप्रेम नमस्कार....

¤ दि. १९ मार्च १९७२ चे अंकातील श्री. वर्तक यांचा गंगा–कावेरी जोडकालव्यावरील लेख वाचला. इंजिनिअरिंगमधील ही अचाट व अफाट कल्पना ज्या प्राध्यापक के. एल. राव यांच्या बुद्धीसामर्थ्यातून निर्माण झाली त्यांना शतशः धन्यवाद! भारत भूमितील अशा गुणवान तंत्रज्ञांमुळेच ही भारत भू पुनश्च सुजलाम् सुफलाम् होईल असा विश्वास वाटतो.

अशा कल्पनांच्या सामर्थ्यातून दुसरी कल्पना सुचते. कदाचित ती पहिल्या कल्पनेइतकी भव्य दिव्य असणार नाही, परंतु उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास ती नजीकच्या भविष्यकालात व्यवहार्य वाटेल.

गंगा-कावेरी जोडकालवा प्रकल्पात पाणी अनेकदा २–३ शे फूट उंच पंपाच्या सहाय्याने खेचले जाणार आहे. अशा पाणी वरती खेचण्यामुळे ते एका नदीच्या खोऱ्यातून दुसऱ्या नदीच्या खोऱ्यात नेता येणे शक्य आहे.

आता हीच कल्पना आपण महाराष्ट्रात लावून पाहू. खुद्द गंगा-कावेरी जोडकालवा महाराष्ट्रास फारसे वरदान ठरत नाही हे उघड आहे. परंतु महाराष्ट्रात 'गंगा' नावाने संबोधिली जाणाऱ्या गोदावरी नदीचा आपण उपयोग करून घेऊ शकू काय?

पैठणजवळ जायकवाडी येथे गोदावरीवर एक मोठे धरण बांधण्याचे काम सुरू आहे. त्यावरील जलाशयाचा सध्या तरी मुख्यत्वे सिचाई-इरिगेशनकडे वापर करण्याचे आराखडे तयार आहेत.

समजा, पैठण धरणावरील जलाशयाच्या वरील फुगवट्यापासून पाणी वर खेचून ६०–७० फूट उंच व ५० मैल (ढोबळ मानाने) दूर असलेल्या कन्नड घाटाजवळ नेले, तर त्या पाण्यास ऑउटरॅम घाटाचा सुमारे ५००–६०० फुटाचा खोल उतार (Sudden Vertical drop) एकदम मिळेल. घाटाखाली पाईप्स नेऊन जनित्रे बसविल्यास त्यापासून वीजनिर्मिती करता येईल. कोयना धरणाचे पाणी पोफळीस आणून अशा प्रकारे वीजनिर्मिती आपण कोयना प्रकल्पात केली आहेच. पोफळीपासून गोवळकोटपर्यंत (२० मैल) सध्या तरी हे पाणी फुकटच जात आहे. (अर्थात ते काही अंशी तरी वापरता यावे म्हणून आलोरे प्रकल्पाचे काम चालू आहे.)

या उलट, कन्नड घाटातून खाली आलेले पाणी वीजनिर्मिती तर करेलच, परंतु त्याखेरीज जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव-पाचोरे आदी पाणी टचाईच्या भागात सिचाईसाठी वापरता येईल. हे वरदानच ठरणार नाही काय?

अशा या दुहेरी फायदेशीर ठरणाऱ्या योजनेवर महाराष्ट्रातील नामवंत व तज्ञ

अभियन्त्यांनी विचार करून यावर आणखी उहापोह करून विधायक सूचना मांडाव्यात.

२१ मार्च, १९७२

सुधीर गाडगीळ
रिसर्च स्कॉलर, आय. आय. टी. पवई (मुंबई)

## शासनकर्ते गप्प का ?

☐ गेल्या दोन तीन महिन्यापासून आम्ही आपले माणूस अंक नियमीत वाचीत आहोत. धुळे जिल्ह्यातील शहादे तालुक्यातील आदिवासीचे प्रश्न, त्यांचेवर होणारा अन्याय पाहून फार वाईट वाटले. ह्या प्रश्नाची आपण आस्थेने व पोटतिडकीने दखल घेऊन ह्या घटना उभ्या महाराष्ट्राचे नजरेसमोर आणल्या त्यामुळे आदिवासी जनतेचे एक दारूण चित्र खरेखुरे नजरेसमोर आले. स्वराज्य मिळवून २५ वर्षे होत आहेत. परंतू शहादा तळोदा व अक्कलकूवा भागातील आदिवासी मात्र खरेखुरे स्वातंत्र्य उपभोगू शकत नाहीत. लोकशाही समाजवाद खालचे थरापर्यंत पोहचविण्याची भाषा सत्ताधारी कशी काय करतात कळत नाही. आदिवासीला दोराने बांधून आणणे व दिवस-दिवस कोंडून ठेवणे, विजेचे शॉक देणे इत्यादी गोष्टीं अद्याप चालतात व कदाचित अतिशयोक्ती सोडल्यास चालतही असतील हे आपल्यावर आलेल्या प्रसंगावरून खरेही वाटते. गेल्या रविवारी (२६-३-१९७२) रोजी आमच्या संघटनेच्या मुंबई शाखेचे बरेच विद्यार्थी सदस्य मा. आमदार शिवाजीराव पाटील (माजी जिल्हा संपर्क मंत्री) यांना भेटले व शहादे तालुक्यातील आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाचा जाब विचारला व बरेच प्रश्न त्यांना विचारण्यात आले. परंतु त्या उत्तरामुळे आमचे मात्र समाधान झाले नाही. त्यावर मा. आमदार शिवाजीराव पाटील यांनी व विद्यार्थी संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी व शहादे भागात काम करणारी सर्वोदयवादी, समाजवादी मंडळी, ग्रामस्वराज्य समितीचे कार्यकर्ते इ. की, ज्यांना ह्या आदिवासींचे प्रश्नासंबंधी सहानुभूती आहे अशांनी एकत्रपणे ह्या भागातील दौरे करून ह्या प्रश्नाचे खरे स्वरूप समजावून घ्यायचे ठरले. ह्या भागातील आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाचा एवढा गाजावाजा होत असता शासनकर्ते गप्प का ह्याचेही कारण कळू शकत नाही !

येत्या मे च्या सुटीत आमच्या संघटनेचे काही कार्यकर्ते मुद्दाम ह्या भागात जावून आदिवासींचे प्रश्न समजावून घेणार आहेत. आपण वेळोवेळी अशा हतबल आदिवासींची दखल घेतली त्याबद्दल आमच्या संघटनेच्या वतीने आपले आभार.

२९ मार्च, १९७२

टी. एस. सायनेकर
अध्यक्ष, मुंबई शाखा, धुळे जिल्हा विद्यार्थी संघटना.

☐ ☐ ☐

# विषय एक प्रसंग दोन

दिलीप जोशी

## प्रसंग क्रमांक एक

स्थळ : मुंबईतील एक उच्च स्टँडर्डच्या कॉलेजमधील पोस्ट ग्रॅज्युएट लॅबोरेटरी.

प्राणिशास्त्र विभागात एम्. एस्. सी. चे विद्यार्थी डिसेक्शन करीत आहेत. दोन तीन मुलामुलींना त्यात फारसा रस नाही. कठीण असलेले डिसेक्शन हातावेगळे करण्याव्यतिरिक्त पर्याय नाही असं मानून कामाला जुडलेली काही मुलंमुली आहेत. सुदैवाने मी त्यांच्यातलाच एक आहे.

ज्यांना प्रयोगामध्ये फारसा रस नाही त्या मुलींच्या गप्पा नेहमीप्रमाणे सुरू आहेत. 'काय ग, बस कितीची मिळाली, साडीवरचे भोवरे किती छान आहेत, माझा भाऊ फार ग्रेट आहे, कारण त्याने एका दिवसात तीन पिक्चर टाकले, पप्पा बंगलोरला फ्लाय झाले' वगैरे रुटीन छाप गप्पा छाटणंच चालू असणार; फार तर काय, नवीन निघालेलं लिपस्टीक कोणाच्या 'स्किन'ला 'मॅच' होईल आणि कोणाच्या होणार नाही, यावर हुज्जत घालणं चालू असेल, तेव्हा लक्ष द्यायचं काही कारण नाही. शिवाय डिसेक्शन बऱ्यापैकी इंटरेस्टिंग असल्याने त्या गप्पांकडे लक्ष न जाण्याच्या मूडमध्ये मी आहे.

थोड्या वेळाने माझे विच्छेदन पुरे होत आले आणि ते साफसुफ करायच्या इराद्याने मी शेवटचा हात मारू लागलो. इतक्यात दहा-बारा फुटांवरून—मुली बसल्या आहेत तिथून—निवडणूक, फुल्या वगैरे शब्द कानांवर घरंगळले. खेड्यामध्ये हेलिकॉप्टर उतरल्यासारखं वाटलं. कान नकळत टवकारले गेले. परवा असेच एकदा कान टवकारले असता बरीच धांदल ऐकायला मिळाली. कँटीनमध्ये एक मुलगी दुसऱ्या मुलीला म्हणत होती, 'ए मंजू, डोंट टॉक चिटचॅट विथ मी! आय हॅव हरी, आय वॉंट टु गो!' आम्हाला प्रथम वाटलं, की कोण हा हरी—अडला हरी—

हिला भेटला? नंतर शोध लागला, की आय हॅव हरी म्हणजे मला घाई आहे— आज चक्क सामाजिक प्रश्नांवर चर्चा सुरू होणार होती. काही का बोलेनात, निवडणुका वगैरेंवर बोलणार आहेत ना, बोलू देत. असं मनाशी म्हणून मी लांबूनच ऐकू लागलो.

'ए दिल्या, या पोरी आता निवडणुकांवर बोलणार आहेत, वाटेल त्या विषयावर बोलतात. मी चाललो कॅंटीनमध्ये! चहा पिऊ, चल! देतोस का कंपनी, बोल!' इतका वेळ त्या मुलींबरोबर बसलेला अन्या माझ्याजवळ येऊन पुटपुटला. मी मानेनेच नाही म्हटले आणि डिसेक्शनमध्य मान खुपसली. 'च्यायला, प्रत्येक गोष्ट हा भारी सिरिअसली घेतो. हे तुझं किती वेळ चालणार आहे दिल्या? आपण सटकतो!' असं म्हणून अन्या सटकला. मी त्याला हसून गुडबाय केल्यानंतर संपलेलं डिसेक्शन साफ करणं चालूच ठेवलं. कान मात्र दहा-बारा फुटांवर होते.

'अय्या, निवडणूक आली नं?'

'हो नं, किती छान नै?'

'ए, निवडणूक म्हणजे फुल्या मारायच्या असतात ना?'

'फुल्या नै कै, एकच फुली असते.'

'हट् ग ऽऽ! तीन असतात! मागे मुंबईच्या निवडणुकांना तीन-तीन फुल्या होत्या.'

'असतील बाई! पण आमच्या बंगल्याच्या गेटवर एक कागद लावला आहे नं, त्यावर शिक्का मारो म्हणून लिहिलंय्! तू फुली मारायची काय म्हणतेस?'

'अग, म्हणजे तेच ते! शिक्का मारो म्हणजे फुली मारायचं भाषांतर असेल!'

'काय, सॉलिड ना? आमच्याकडे माहीत आहे, हेमचंद्र गुप्ते उभे आहेऽऽत! तुमच्याकडे कोण ग?'

'अग, आपण एकमेकींपासून दोन स्टॉपच्या अंतरावर राहतो, म्हणजे आमच्याकडं पण तेच असणार!'

'ते मेयर आहेत ना ग?'

'मग! कित्ती वर्षं मेयर आहेत ते!'

'ते का ग उभे राहिले?'

'मेयर आहेत म्हणून! अय्या, एवढा नाही तुला अंदाज करता येत!'

'काय ग्रेट नाही? अग, त्यांचा आमच्या तिथेच बंगला आहे, म्हणून मला माहीत! पण ते फक्त पार्टर्या असल्या कीच बंगल्यात येतात! त्यावेळी कित्ती कित्ती छाऽऽन मोटारी तिथे येतात!!'

माझं डिसेक्शन संपलेलं आहे. माझ्या चेहऱ्यावरचे हावभाव कोणाला दिसू नयेत म्हणून मी खालच्या मानेनेच माझी आयुधे पुसून हळूहळू बॉक्समध्ये भरतो

पृष्ठ ६२ वर

# गुढीपाडव्याचे स्वप्न !

मराठी मासिकांमध्ये आम्हाला त्या स्वप्नांच्या जाहिराती पहायला मिळतात. मसाल्याच्या गोड स्वप्नांचा रविवार ! उन्हे पडली तरीही कॉटवरच्या पांघरुणातून दोन झोपलेली डोकी दिसतात. ते दोघे म्हणे मग संडे स्पेशल गरम मसाल्याच्या चमचमीत वासाने जागे होणार असतात. ी महाराष्ट्र बँकेची टेलिव्हिजन सेटची जाहीरात–म्हणजे त्यासाठी संचित ठेवीची व त्यामधून टीव्ही घेण्याचे स्वप्न साकार होणार म्हणे. ती तर मी कित्तीतरी वेळ पहातच बसते. महाराष्ट्रातील तुम्हा लोकांची सुट्टीच्या दिवसाची मसालेदार स्वप्ने खरी होत असतील तर होवोत बापडी !

आम्ही मद्रासलाही फार फार वर्षांपूर्वी अशीच काहीतरी स्वप्ने करीत असू. सकाळीच झक्कपैकी कांजीवरम साडी मिरवीत मिरवीत ओळखीच्या कुणा मराठी स्नेह्यांकडे जावे. अस्सल पुणेरी कांदापोहे अन् चहा झोडावा, असलाच तर सकाळचा मराठी सिनेमाचा एकुलता एक खेळ पहावा. एक ना दोन सुखस्वप्नांना कधी अंतच नसतो ना ! पण प्रत्यक्षात स्वप्नांचा अन् ती पहाणाऱ्यांचाही जणू अंत होतो. कांजीवरम (तिला इकडे 'पट्टू' म्हणतात) साडी मिरवीत बस स्टॉपवर जावे आणि तेथे असणाऱ्या घोळक्यात सामील व्हावे. तिथल्या झाडाला कधीकाळी लटकविलेले बसचे चित्र असणारे टिनपाट गायब झालेले असते. 'बसस्टॉप' नावाची वास्तू बांधण्याचे पाप मद्रास सरकार कधीच करीत नाही, त्यामुळे मग तेथे बाके, बसक्रमांकाचा फलक, ह्यांचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कुणा चेट्टीया शेठजींनी देणगीदाखल बसस्टॉप बांधून दिलेला असेल तर त्यावर कुणातरी भिकारी कुटुंबाने हंडक्यामडक्यांचा संसार थाटलेला असतो. त्यांची अर्धा डझन प्रजा तेथेच भीक मागण्याचा वारसा पुढे चालवीत असते. लोकांचा घोळका फुगत फुगत रस्त्यावर येतो. होय, 'क्यू' हे अक्षरच इकडच्या शब्दकोषात नाही, दर पंधरावीस मिनिटांनी कुठली तरी एखादी बस तेथून जवळच आगे मागे थांबते आणि घोळका बसकडे धावतो. तेवढ्यात बस चालूही होते. धावणाऱ्यांपैकी पहिले दोघे तिघे बसला लोंबकाळतात. उतरणाऱ्यांपैकी एखादा लुंगीत पाय अडकून खाली पडतो. बसस्टॉपवर नेमक्या कोणत्या क्रमांकाच्या बसने थांबायचे ह्याचा प्रश्नच नाही. काही थांबतात, काही रिकाम्या बसेस न थांबता भरधाव निघून जातात, काही पाव फर्लांग पुढे जाऊन थांबतात. एखाद्याला उतरवून देऊन झट चालू लागतात. हो, स्टॉपवरच्यांपैकी कुणीतरी पळत येऊन बस पकडली म्हणजे ? सकाळी

नवालाच मद्रासचे ऊन चटके देते. आलेल्या बसवर तुटून पडण्याची हिंमत होई-पर्यंत तासभर तसेच उभे रहावे. तोच घोळक्यापैकी कुणीतरी म्हणते "आज सुट्टीचा दिवस! आता तासभर बस नाही." कारण वीस मिनिटांचे अंतर असणाऱ्या तीन बसेस पाठोपाठ शिवाशिवी करीत नुकत्याच न थांबता गेलेल्या असतात. मद्रासला तसा टॅक्सींचाही तुटवडाच. बसस्टॉपवरच सकाळचे अकरा होतात. कसले स्नेह्यांकडे कांदापोहे नि कसला सिनेमा! उभ्याने उन्हात तापत, धुळीत, घाणीत फक्त चरफडणे!

समजा, सुदैवाने मिळालीच बस तर? तर काय? पुढच्याच वळणावर अधेमधे ती कडेला थांबते. ड्रायव्हर इंजीन बंद करून, मागे तोंड फिरवून प्रवाशांना दम-बाजी करू लागतो. 'सुटे पैसे नसतील तर चालू लागा पायी' इ. इ. बस थांबताच कंडक्टर नामक कुणी कळकट प्राणी, तिकिटे देऊ लागतो. त्याच्याजवळ तिकिटे ठेवण्यास बोर्ड, गळ्यात पिशवी, भोके पाडण्यास पंच, ह्या पैकी काहीही नसते– म्हणजे सरकारतर्फेच काही देण्यात आलेले नसते. तो बिचारा तिकिटांचे गठ्ठे एका हातात धरतो, तर लोकांनी दिलेल्या नोटा बोटांच्या बेचक्यात धरतो, एकेक तिकीट बोटांनीच मधे फाडून 'स्टेज पंच' करतो. प्रत्येकासमोर जाऊन अशा प्रकारे तिकिटे देण्यास, ती ठेचून भरलेली बस, त्याची पंधरावीस मिनिटे घेते. तोवर बसमधले सारे डुलक्या देतात अन् जांभाया देतात. शेवटी कंडक्टर 'रै रै... रैट्' (Right) असे ओरडतो किंवा तोंडात बोटं घालून तमाशाछाप शीळ घालतो, तशी बस चालू होते. कुणी पुण्यामुंबईकडचे बाहेरगावचे बसमधे असतील तर ते मूर्खाप्रमाणे शेजाऱ्यास इंग्रजीत विचारतात, 'ह्यांना चालत्या बसमध्ये तिकिटे देता येत नाहीत?' तो मद्राशी तोंड वळवून फक्त खिडकीतून बाहेर बघू लागतो.

अधल्या मधल्या ठिकाणी थांबणे न थांबणे ड्रायव्हरच्या मनावर, कारण बसमध्ये लांबलचक दोरी असणारी घंटी मद्रासमध्ये अपवाद म्हणूनदेखील, एकाही बस-मध सापडणार नाही. तुमचे उतरण्याचे ठिकाण आले, की त्यापूर्वीच दाराशी जाऊन उभे रहावे. ड्रायव्हर फर्लांगभर अलीकडे बस थांबवून अधेमधे सोडून देतो तुम्हाला. भांडण केले तर ड्रायव्हर कंडक्टर सरळ बस पोलीस चौकीवर नेतात. सारे प्रवाशी तिकिटांच्या पैशावर पाणी सोडून उतरून जातात. कधीकधी मार-हाणीच्या प्रसंगी, इतर बसेसचे ड्रायव्हर कंडक्टर्स आपापल्या बसेस रस्त्यातच सोडून देऊन, आपल्या बांधवांच्या मदतीस जातात. तुम्ही तक्रार करणार कुठे? अख्ख्या मद्रास शहरात 'सेंट्रल बस स्टँडची' बांधलेली इमारतच नाही, हे खरे वाटेल का तुम्हाला? त्या ड्रायव्हर कंडक्टरच्या छातीवर बिल्ला लावलेला असेल तर नंबर टिपून घेणार ना? समजा बसनंबर वगैरे लिहून केलीच लेखी तक्रार, तर दहा रिमाईंडर्स पाठवूनही तुम्हाला उत्तर येणार नाही, ना त्या महाभागावर काही अॅक्शन घेतली जाईल. त्यांची युनियन सत्र पुकारण्यास तयारच असते. असे काही न होता, समजा सुखरूप पोचलात तर रिस्टवॉच पाहू नका. नाहीतर म्हणाल

'एवढ्याशा अंतराला तीस पैसे न् अर्धा तास ? त्यापेक्षा चालत...' अर्थात बस मिळण्यासाठी तासभराचे ताटकळणे हिशोबात धरायचे नसते !

कालच्या १६ मार्चला गुढीपाडवा आणि 'उगादी' सण होता, म्हणजे तेलगू नव वर्षारंभाचा दिवस. ज्यांना सुट्ट्या नव्हत्या असे कामावर आणि सुट्टीवाले स्नेह्यांकडे निघाले. मद्रासच्या मौंटरोडवरील 'राऊंड ठाना' चौक म्हणजे तुमच्या पुण्याचा जिमखाना चौक किंवा मुंबईच्या खोदादाद सर्कलप्रमाणे महत्त्वाचा चौक ! सकाळी–भल्या सकाळी–नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीच–एक बसड्रायव्हर श्री. अमीर जान महंमद यांनी आपली बहादुरी कुण्या प्रवाशाला दाखविली. सुशिक्षित लोक दोन शिव्या (अर्थात मनातल्या मनात) देऊन मोकळे होतात, पण बसवाल्यांच्या नादी लागत नाहीत. चढता उतरताना खाली पडले तरी कपडे झटकून चालू लागतात. ड्रायव्हर–कंडक्टर्सना तर कशाचंच सोयरंसुतक नसतं. पण कालच्या गुढीपाडव्याला बसमधून उतरता उतरता एकजण पडला, कारण बस थांबलीच नाही. अमीर जानच्या दुर्दैवाने तो पडणारा निघाला साध्या वेषातील पोलीस कॉन्स्टेबल–सेल्वराज नावाचा. इतराप्रमाणे सेल्वराज गप्प कसा बसणार ? त्याने ड्रायव्हरची गचांडी धरून त्याला खाली खेचला. मग थोडीशी देवघेव झाला–शिव्यांची आणि ठोशांची ! एवढ्यांत बाजूने जाणाऱ्या येणाऱ्या बसेसही थांबल्या. संकटात सापडलेल्या आपल्या गुणी (?) सहकाऱ्याला मदत करणे कर्तव्य नव्हे काय ? हा हा म्हणता संपूर्ण चौकात सर्व बसेस थांबल्या. किती ? फक्त दीडशे ! अर्थात च मौंटरोड ह्या प्रमुख मोठ्या मार्गावरील इतर सर्व रहदारी तुंबली. मध्यभागी सापडलेल्या टॅक्सी, रिक्शा अन् खाजगी मोटारींना धड पुढे जाता येईना ना मागे. दीडशे बसेसच्या ड्रायव्हर्सनी आपापल्या बसेस तिथेच सोडून दिल्या. लोक वाट पाहून दमले, कंटाळले, चरफडत निघून गेले–अर्थात पायी. जाण्यापूर्वी काढलेल्या तिकिटांचा चोळामोळा करून ती ड्रायव्हर कंडक्टर्सना शिव्यांसह अर्पण करून लोक आपापल्या कामावर गेले. ह्या तुंबलेल्या रहदारीस हटविण्यासाठी पोलीस कमिशनर, डे. कमिशनर्स ट्रॅफिकचे, ट्रान्स्पोर्टखात्याचे डायरेक्टर्स आणि सारी बडी बडी मंडळी समक्ष तेथे आली–ठीक ८ वाजता, म्हणजे रहदारी तुंबण्यास १॥ तास झाल्यावर, कॉन्स्टेबल महाशयास सस्पेंड केल्याचा हुकूम सुटला. इतक्या दीडशे बसेसमधील सुमारे चार साडेचार हजार प्रवासी खोळंबले, ते पाहून सारे पोलीस अधिकारी घाबरले. सर्वांसमक्ष सेल्वराजला 'प्रेमपत्र' देण्यात येऊन, त्यांनी ड्रायव्हर्सना रस्ता मोकळा करावा ही विनंती केली. एव्हाना सकाळचे दहा वाजले होते. आतापर्यंत फक्त ४ च तास बसेस पडून होत्या–म्हणजे शहरातील सर्व स्टॉप्सवर किती गर्दी साचलेली असणार ? शिवाय ट्रिपा बुडाल्या–गल्ला कमी येणार–त्याला काय करावं ? आता नवी मागणी आली, "आमच्यावर ह्याबद्दल काहीही ॲक्शन घेतली जाणार नाही ह्याचे आश्वासन हवे."–हतबल झालेल्या सुपरिटेंडेंटनी तेही दिले व ठीक सव्वा अकराला पहिली बस हलली. बारा वाजले तरी रस्ता मोकळा झालेला नव्हता, गुढीपाडव्याची हजारो गोड स्वप्ने–कार्यक्रम व ४–५ हजार लोकांचा पैसे देऊन खोळंबा–सारे धुळीस मिळाले. केवळ दोन नालायक इसमांमुळे !

मद्रास शहराची सिटी बस वहातूक म्यु. कॉर्पोरेशनकडे नाही. इतके दिवस ती प्रांतिक सरकारच्या वहातूक खात्याकडे होती. कारभार सुधारणे दूरच, पण २० कोटींची गुंतवणूक असणाऱ्या ह्या नफ्याच्या धद्याला—सरकारला मात्र १९६९ मध्ये ४५ लाखांचा तोटा. १९७० मध्ये ५३ लाख निव्वळ लॉस. १ जानेवारी ७२ पासून सरकारने त्या खात्याचे कॉर्पोरेशन बनविले. 'पल्लवा' राजाचे नाव देण्यात येऊन, ही एक स्वायत्त कंपनी म्हणून नोंदली गेली. सध्याचे भांडवल ६ कोटींचे म्हणजे १०० रुपयांचे ६० हजार शेअर्स—सर्व सरकारचे. पुढे भांडवल १० कोटी होईल. आज कार्पोरेशनजवळ १३८२ बसेस असून, रोजचा गल्ला २ लाख ६० हजारांचा आहे. सुमारे बारा हजारांचा सेवकवर्ग असून रोजी ११ लाख प्रवाशांची वहातूक केली जाते. नव्या कंपनीचे डायरेक्टर्स म्हणजे सरकारने नेमलेली, फायनान्स, इंडस्ट्रीज, वगैरे खात्याची सेक्रेटरी मंडळी. एवढ्या मोठ्या प्रचंड संख्येच्या बसेस-वर फक्त जाहिरातींपोटी सालीना २ लाख सरकार कमविते. महाराष्ट्रात ठिक-ठिकाणी स्टॅण्डस बांधून, तेथे हॉटेले, वर्तमानपत्रांचे गाळे देऊन हजारो रुपयांचे उत्पन्न प्रत्येक स्टॅण्डमागे काढण्याची जी कल्पकता आहे ती मद्रास प्रांतात जवळ जवळ नाहीच. अनवाणी अन् बोडक्या डोक्यांचे कंडक्टर्स बिचारे, रस्त्याच्या कडेला झोपडीवजा हॉटेलात विश्रांती घेतात.

गुढीपाडव्याला वास्तविक बस-सर्व्हिस सुधारण्यास हवी होती. कारण त्या दिवसापासूनच ड्रायव्हर्स, कंडक्टर्सना बोनस देण्याची योजना जाहीर केली होती. तेव्हा ट्रान्स्पोर्ट मिनिस्टर रामचंद्रन् म्हणाले, 'पल्लवा ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन ही जनतेची सेवा करणारी संस्था असल्यामुळे, नफ्याच्या प्रमाणात बोनस दिला जाणार नाही'—अहो, ग्यानबाची मेख अशी आहे, की मुळात नफा आहेच कुठे? वास्तविक आता बोनस जाहीर करूनच सरकारने आपलाच तोटा वाढविला आहे. गेल्या ऑक्टोबरातच 'बसमार्गाचे री ऑर्गनायझेशन' नावाखाली भरमसाठ भाडी वाढली आहेत. मद्रास—कांजीवरम पूर्वीचे १·४० भाडे आता २·३५ ते २·८० रु. प्रमाणे निर-निराळ्या बसेच आकारतात. एकाच मार्गाने, एकाच वेगाने, एकाच ठिकाणी जाणाऱ्या, एकाच 'पल्लवा'च्या बसेसमध्ये भाडे मात्र एक नाही. का? 'री ऑर्ग-नायझेशन'. मद्रास शहरातील भाडी ५ ते २० पैशांनी प्रत्येक रूटला वाढली. आवडी ते ब्रॉडवे (म्हणजे पूलगेट—लोणी किंवा व्हिटी ते सायन) अंतरास सध्या १·१० पैसे बसभाडे झाले आहे. वेळेबाबत तर विचारूच नका.

तमीळनाडू राज्यातील संपूर्ण बसवहातुकीची आता सात कॉर्पोरेशन्स झाली आहेत. आंतरप्रांतीय थेट बसेससाठी म्हैसूर व केरळशी बोलणी नोव्हेंबरात सुरू झाली आहेत. जग जंबोजेटच्या काळात व आम्ही स्वतंत्र राष्ट्रातील स्वतंत्र राज्ये बसेसचा वेग ताशी २७ चा ३० केल्याची घोषणा करीत आहोत. मुंबईप्रमाणे 'बेस्ट' बसवहातूक मद्रासला यावी हे आमचे दर नव्या वर्षीचे जुनेच स्वप्न! ह्या वर्षीही त्याच स्वप्नाला 'बोनस योजने'मुळे थोडीशी आशा होती, पण मौंटरोड-वरील पाच तासांत गुढीपाडव्याच्या स्वप्नाचे तुकडे तुकडे झाले! ◻ ◻ ◻

रवींद्र पिंगे

# शानपाखली

# सॉमरसेट मॉम–दुसरी बाजू

Born Yesterday हे नाटक लिहून गार्सन कॅनिन हा अमेरिकन नाटककार प्रसिद्धीच्या झोतात आला. सॉमरसेट मॉमपेक्षा तो चाळीस वर्षांनी लहान होता; वयातलं हे व्यस्त अंतर त्या दोघांच्या मैत्रीत आडवं आलं नाही. मॉमच्या व्यक्तिमत्त्वात अनेक मोठे दोष होते. तो तोतरा होता. छोकरेबाज होता. मत्सरी होता. घमेंडखोर होता. पीडक होता. तुटक होता. ह्या सर्व दोषांची गोळाबेरीज ज्याच्या ललाटी लिहिलेली होती तो खरं म्हणजे पांगळाच व्हायचा. मॉम पांगळा झाला नाही. कारण तो एक बलदंड आणि वस्ताद लेखक होता. आयुष्यातली सलग अशी एकूणसत्तर वर्षे त्याने सातत्याने गुणमंडित लेखन करण्यात कारणी लावली होती. साहजिकच, त्याला लेखक-कवींच्या उगवत्या पिढीबद्दल सदैव ममत्वच वाटायचं. आपल्या इस्टेटीचा ट्रस्ट करून त्या पैशांचा विनियोग नव्या दमाच्या ब्रिटिश लेखकांना प्रवासखर्च देण्याकडे व्हावा अशी व्यवस्थाही त्याने जागरूकपणे केली आहे. गार्सन कॅनिन मॉमच्या परिवारात दाखल झाला. वीस पंचवीस वर्षे त्यांची मैत्री अभंग राहिली. महत्त्व फक्त याचं नाही. त्यांची जी हजारो संभाषणं झाली, ती कॅनिनने ताजी ताजी असताना मान मोडून लिहून काढली, ह्यातलं अगत्य केवळ अपूर्व आहे. डॉक्टर जॉन्सनचा शब्दन् शब्द झेलून बॉस्वेलने जशी त्यांच्या संभाषणाची कीर्द लिहून ठेवली, काहीसं तसंच वाङ्मयीन थोरवीचं काम कॅनिनने केलं. तो मॉमबरोबर सर्वत्र हिंडला, उठला-बसला. मॉमला त्याने प्रसंगी छेडलं. पण मुख्य म्हणजे त्याने मॉमला वैयक्तिक जीवनातल्या खासगी बाबींवर बोलतं केलं. Remembering Mr. Maugham हे त्या संभाषणमय पुस्तकाचं नाव. एक डोळस, कष्टाळू आणि धोरणी चहाता आणि शहाणपणाची उपज असलेला प्रज्ञाशाली लेखक ह्यांची युती झाली, तर त्यातून केवढं चित्ताकर्षक लेखन निर्माण होऊ शकतं त्याचा Remembering Mr. Maugham हे उत्तम उदाहरण आहे. त्यातल्या असंख्य मुलाखतींची ही एक हलकीफुलकी पण मर्मभेदी झलक :–



**Remembering Mr. Maughm**

'तुमच्यासारख्या सिद्धहस्त लेखकाने फ्रान्समध्ये केवळ लेखनावर मिळविलेली ही इस्टेट इतरांच्या मत्सराचा विषय झाली आहे. हा तुमचा बंगला आणि बाग-बगीचा तुम्हाला केवढ्याला पडला ?'

'अठ्ठावीस साली मी ही सारी इस्टेट पस्तीस हजार डॉलर्संना विकत घेतली. त्यावेळी हे निव्वळ रान होतं. बंगला मोडकळलेल्या अवस्थेत होता. माझ्या गरजे-प्रमाणे मी हा आता दुरुस्त करून घेतला आहे. माझ्याकडे उत्तमोत्तम पेंटिंग्ज आहेत. पुतळे आहेत. आज ह्या क्षणाला माझ्या ह्या इस्टेटीची किंमत वीस लाख डॉलर्स होईल. मात्र, मला ही वास्तू विकायची नाही. वरल्या गच्चीत माझी लिहिण्याची खोली आहे. ह्या मजल्यावर माझी वस्ती असते. पलीकडल्या बागेत माझी फळझाडं आणि हौशी शेती आहे. शेतात मी मका पेरतो.'

'ह्या वाड्याचा मूळचा मालक कोण होता ?'

'तशी ही वास्तू फार शापित आहे. पापावर हिची उभारणी झालेली आहे. बेल्जमच्या राजाने आपल्या एका दासीसाठी हे ठिकाण निवडलं. नंतर राजाला वाटलं की रंडीबाजाला मृत्यूनंतर स्वर्गाची कवाडं उघडली जाणार नाहीत. म्हणून त्याने एका बिशपला लांच म्हणून हा वाडा चारला आणि बदल्यात आपण निष्पाप आहोत असं त्याचं शिफारसपत्र मिळवलं. राजाला शिफारसपत्र मिळालं; मोक्षद्वार

खुलं झालं की नाही मला कल्पना नाही. बिशप ह्या वाड्यात खूप वर्षं राहिला. ते असो. वाड्याचा मूळ स्वामी पापी होता ह्यात मला समाधान आहे.'

'तुमच्या लिहिण्याच्या खोलीतून सुंदर देखावा दिसत नाही हे कसं काय ?'

'कारण ती फक्त लिहिण्याची खोली आहे. निसर्गाचे देखावे पहाण्याची नव्हे.'

'तुमच्या लिहिण्याच्या खोलीत फक्त एकाच बाईचं पोर्ट्रेट आहे. ती कोण ?'

'जिच्यावर माझा जीव जडला होता तीच ती बाई.'

'तुमच्याकडे जे चित्रकलेचे उत्तमोत्तम नमुने आहेत त्यांची काळजी तुम्ही कशी घेता ?''

'मी जेव्हा इथे असतो तेव्हा त्यांची निगा मी घेतोच. जेव्हा मी परदेशी जातो तेव्हा माझी चित्रं मी बँकेच्या व्हॉल्टमध्ये लपवून ठेवतो. शिवाय मी डाकू मंडळींना वार्षिक हप्ते तोडून दिले आहेत. त्याच्या बदल्यात त्यांनी माझ्या कलासंग्रहाला अभयदान दिलं आहे.'

'डाकूंना हप्ते तोडून दिलेत म्हणजे काय केलंत ?'

'काही डाकूंनी मला कळवलं, की तुम्ही आम्हाला थोडीशी ठराविक रक्कम द्या, म्हणजे आम्ही तुमच्या घरी कधीही दरोडा घालणार नाही. मी ते मान्य केलं. आता त्यांना ठरीव रक्कम दरसाल देतो. माझ्या संग्रहातून आजवर गवताची काडीसुद्धा चोरीला गेलेली नाही.'

'तुम्ही लिहिता केव्हा ?'

'मी रोज सकाळी आठ वाजता उठतो. ठीक नऊ वाजता मी लिहिण्याच्या मेजाजवळ येऊन लिहायला सुरवात करतो. बैठक थेट चार तासांची असते. एक वाजता पसारा आटोपतो. मग जेवण. जेवणानंतर थोडीशी वामकुक्षी करतो. वामकुक्षी कधी वीस मिनिटं, कधी तीस मिनिटं. पंचेचाळीस मिनिटं म्हणजे डोक्यावरून पाणी गेलं. त्यानंतर इतर व्यवहाराचे कागदपत्र पहातो, वाचतो, वगैरे. नंतर लेखन करीत नाही. सकाळी नऊ ते दुपारी एक ह्याच चार तासांत रोजच्या रोज मी लिहितो. रविवार नाही, सुट्टी नाही. वाढदिवसाला वगैरेही खाडे नाहीत. मी रोजच्या रोज लिहितो, प्रवासात असलो तरीसुद्धा. रात्री जागरण झालेलं असलं तरीसुद्धा.'

'तुम्हाला रोजच्या रोज लिहायला कंटाळा कसा येत नाही ?'

'ज्याचं पोट लेखणीवरच अवलंबून आहे त्याला लेखनाचा असा कंटाळा येणं परवडत नाही.'

'रोजच्या रोज नवीन नवीन सुचतं ?'

'नेहमीच नवीन काही सुचतं असं नाही. मग मी मेजाजवळ नुसता बसून रहातो. माझ्याच सह्या गिरवतो. पण शिस्तीचा भाग म्हणून लिहिण्याच्या टेबलाजवळ सकाळी नऊ ते दुपारी एकपर्यंत असतोच. माझ्या लेखनाच्या वेळात मी काहीही

आडवं येऊ देत नाही. '

'टीकाकारांच्या प्रतिकूल टीकेने किंवा वाचकांना तुमचे लिखाण न रुचल्यामुळे तुम्हीं नाऊमेद होता काय ?'

'आपण लिहितो ते सगळं उत्तम आणि टीकाकारांना किंवा सामान्य वाचकांना काही कळत नाही असं समजणं व्यर्थ आहे. त्यांनाही कळतं. प्रतिकूल टीकेने व्यथित न होता तिचा आस्थापूर्वक विचार केला पाहिजे. त्यांना दोष देण्यापेक्षा स्वतःच्या कलाकृती पुन्हा नीट तपासून पाहिल्या पाहिजेत. शिवाय, सर्वच लेखकांच्या लेखन-गुणांमध्ये चढउतार हा असतोच. बाल्झाक, डोस्टोव्हस्की, शेक्सपियर ह्या सर्व विश्वमान्य लेखकांनीही थोडंफार खालच्या पातळीवरचं गचाळ लेखन केलेलंच आहे. त्यातून कुणीही मुक्त नाही. पण जास्तीत जास्त वरची पातळी तुम्ही किती वेळा गाठू शकता, त्यावर सारं अवलंबून आहे. दुसरं, म्हणजे लेखकांनी टोळ्या करून एकमेकात फार वेळ मिसळू नये. त्यातून पदरी फक्त मूर्खपणा तेवढा पडतो. वेळ वाया जातो ते वेगळंच. त्यापेक्षा समाजातल्या वेगवेगळ्या स्तरातल्या लोकां-मध्ये मिसळावं आणि आपली नजर तयार करावी. कोळी, खलाशी, घोड्यांच्या शर्यतीचे अडत्ये, मवाली, अशा वेगवेगळ्या मंडळींमध्ये लेखकांची ऊठबस हवी. पण होतं काय, की लेखक म्हणून यशस्वी झालात, की इतर लेखक मंडळी तुम्हाला चिकटतातच. त्यांना टाळणं मुष्किल होऊन बसतं. सगळेच लेखक मला आवडतात असं नाही. मात्र ते फार interesting वाटतात. काही मूर्ख लेखक निव्वळ पैशा-साठी लिहितात ह्याचं मला आश्चर्य वाटतं. कारण साधा गवंडीही त्यांच्यापेक्षा जास्त कमावतो. काही लेखक प्रसिद्धीसाठी लिहितात. ही शुद्ध फसवणूक आहे. मी अशा दहा-बारा लेखकांची नावं सांगेन, की ज्यांच्या नावाचा एकेकाळी साहित्यात गजर होता, दबदबा होता, जाल तिकडे त्यांचं नाव घेतलं जाई. आज ते जिवंत आहेत की मेलेत ह्याचीसुद्धा कुणाला दाद नाही. तेव्हा प्रसिद्धी वगैरे सर्व थोतांड आहे. काही लेखक भाव मारण्यासाठी लिहितात. त्यांची स्थिती अगदी करुणाजनक असते. '

'तुम्ही कशासाठी लिहिलंत ?'

'दुसरं काही अधिक चांगलं जमेना म्हणून ! लिहून लिहून माझ्या लेखन-शक्तीचा विकास झाला. आज मी एक बराचसा चांगला लेखक झालो आहे. '

'बराचसा चांगला की थोर, श्रेष्ठ वगैरे ?'

बराचसा चांगला, नि सध्या तर नुसताच चांगला. '

'जग तुम्हाला थोर लेखक म्हणतं. '

'नाही. एक चांगला लेखक हीच माझी यत्ता. '

'तुम्ही लेखन करण्याच्या अगोदर त्याचा कच्चा आराखडा तयार करता काय?'

'मला कथानकाची आणि व्यक्तिरेखांची अस्पष्ट, धूसर कल्पना असते. प्रत्यक्ष

लेखन करताना मात्र त्यात फार मोठे फेरवदल होतात. कथा म्हणून लिहायला घ्यावी तर लघुकादंबरी होते नि कादंबरी लिहून काढायला जावं तर तिचं नाटक होतं. लिहिताना माझें मलाच आश्चर्याचे धक्के बसत असतात. लेखन ही फार कष्टाची गोष्ट आहे. अर्थात, हे मी माझ्यापुरतंच सांगतो. कारण प्रेम कसं करायचं याचा जसा एकच एक नियम नाही, तसंच लेखनाचं आहे.'

'लेखक म्हणून काही गोष्टी तुम्ही कटाक्षाने पाळल्या असतील ना?'

'होय. लेखनातला जो भाग कापावासा वाटतो, तो दयामाया न दाखवता तिथल्या तिथे कापून टाकणं, हा माझा नियम आहे. शिवाय, गेली अनेक वर्षं मी रोजच्या रोज मला सुचणाऱ्या कल्पनांची, घटनांची टाचणं काढून ठेवत आलो आहे. अठराव्या वर्षी अशी टाचणं करायला सुरुवात केली, ती थेट सत्तराव्या वर्षापर्यंत. मला कधी काही लिहायचं असलं, की ही टाचणवही चाळतो, कारण जसजसं वय वाढत जातं तसतसं नवीन नवीन सुचायचं मंदावत जातं. तुम्हीसुद्धा टाचणं करून ठेवण्याची सवय लावून घ्या.'

'पृथ्वीवरल्या जवळ जवळ प्रत्येक देशात तुम्ही फिरून आलात, ह्याचं कारण काय? तुम्हाला प्रवासाचो जबरदस्त चटक आहे?'

'नाही. लेखनासाठी नवे नवे अनुभव मिळावेत, नवीन माणसं भेटावीत, नवीन दृश्यं दिसावीत ह्या एकाच हेतूने मी भटकलो. त्याचा फायदाही भरपूर झाला. नवी नवी कथानकं सुचली. पागोपागोला आमची बोट अडवली. त्यातून 'रेन' ही माझी सर्वांत लोकप्रिय गोष्ट तयार झाली.'

लेखक म्हणून काही संस्मरणीय असे अनुभव तुम्हाला आले काय?

हो. एकदा मी न्यूयॉर्कमधल्या एका हॉटेलात एकटाच बसलो होतो. इतक्यात वेटरने माझ्या पुढ्यात उंची मद्याची एक बाटली आणून ठेवली. मला आश्चर्य वाटलं, कारण मी काही ती मागितली नव्हती. म्हणून वेटरला विचारलं. तेव्हा तो म्हणाला, 'इथे पलीकडल्या कोपऱ्यात एक गिऱ्हाईक बसलेल होतं. त्याने ही बाटली तुम्हाला भेट म्हणून दिली आहे.' मी विचारलं, 'कुठे आहे ते गिऱ्हाईक?' त्यावर वेटर म्हणाला, 'त्या गिऱ्हाइकाने मला सांगितलं, की त्या माणसाचं नाव सॉमरसेट मॉम आहे. त्याचा लेख वाचून मला वेळोवेळी फार आनंद वाटत आलेला आहे. त्याचं थोडसं तरी उतराई होण्यासाठी मी ही भेट देतो. ती मी हॉटेलातून बाहेर पडल्यानंतर त्यांना दे.' दुसरी आठवण स्पेनमधली आहे. कारडोव्हा शहरातल्या हॉटेलातला मुक्काम संपवून मी बिल द्यायला आलो तर गल्ल्यावरला नोकर माझ्याकडून पैसे स्वीकारीना. मला आश्चर्य वाटून मी विचारलं, 'मी तुमच्या हॉटेलात राहिलो त्याचे पैसे का घेत नाहीस?' त्यावर तो नोकर म्हणाला, 'मालकांनी सांगितलं आहे, की तुम्ही सॉमरसेट मॉम नावाचे लेखक आहात. तुमची पुस्तकं वाचून आमच्या मालकांना फार आनंद मिळत आलेला आहे. म्हणून

तुमच्या ह्या किंवा ह्या पुढच्या कुठल्याही मुक्कामाचे पैसे घ्यायचे नाहीत.'

युरोपात लेखकांना फार सन्मानाने वागवतात, नाही का? फ्रान्समध्ये लेखकांना कर आकारणीतून सूट दिली जाते. इब्सेनची तर अशी गोष्ट सांगतात, की तो हॉटेलात आला, की खातपीत बसलेली इतर गिऱ्हाइकं उभी राहून अगोदर त्याला मानवंदना देत आणि तो बसल्यानंतर मग आपण बसत.

ते खरं असलं पाहिजे. मी इब्सेनला एकदाच बर्लिनमधल्या एका हॉटेलात पाहिलं होतं. तो भडक वाटला. जगावर रागावलेला वाटला. तो होताही तसाच म्हणा!

पोटासाठी दिवसभर वेगळं कष्टाचं काम करणं हे लेखनाच्या आड येतं का? येत नसावं. विल्यम फॉकनर. रात्रपाळी कर, दिवसपाळी कर असं पहारेकऱ्याचं जीवन जगत होता, बॉयलर रूममध्ये काम करीत होता. मेलविल कस्टमखात्यात होता. डिकन्स स्टेनोग्राफर होता. ट्रॉलॉप शिक्षक होता. तुम्ही स्वतः हॉस्पिटलात डॉक्टर होता.

खरं आहे. मी दिवसभर सेंट थॉमस हॉस्पिटलात डॉक्टरकी करायचा. संध्याकाळी उशीरा परतून जेवायचा नि जेवणानंतर झोप येईपर्यंत लिहीत बसायचा. तेव्हा कष्टाची नोकरी लेखनकार्याच्या आड येत नाही. अर्थात, माझं आयुष्य खास करून कष्टाचं नव्हतं. फक्त माझ्यापाशी पैसे नसायचे तरी, किंवा असलेले संपून जायचे.

पैसे मिळवण्यासाठी तुम्ही लेखनाकडे वळलात?

नाही. लेखनात पैसे मिळाले नसते तरीही मी लेखनच केलं असतं. मात्र मी जर धनवान असतो तर मी फार वेगळ्याप्रकारचं लेखन केलं असतं.

आम्ही नव्या मंडळींनी कुणाचं लेखन कित्ता म्हणून वाचावं?

एडमंड बर्क आणि ट्रॉलॉप. भाषा ही केवढी समृद्ध चीज आहे ते बर्क वाचल्यावर पटतं. ट्रॉलॉपचं एक पान संपलं की पुढलं पान वाचावसं वाटतं. यापेक्षा लेखकाला अधिक भूषणावह काय असू शकतं? मी कुठल्याही नव्या लिखाणाला प्रारंभ करण्याच्या आगोदर व्हॉल्टेअरचं 'कँडिड' चाळतो. व्हॉल्टेअर हा परीस आहे. साधं, सुंदर, तत्त्वप्रेरित, खुसखुशीत, ऐटदार आणि अल्पाक्षरी असं सकलगुणमंडित लेखन एकाच वेळी करता येतं हा धडा मला व्हॉल्टेअरनं दिला.

अलीकडे तुम्ही तुमचा जुना पत्रसंग्रह जाळून टाकीत आहात असं कळलं. असं कशाला करता? तुमच्या चरित्राची ती महत्त्वाची साधनं आहेत.

माझं चरित्र कुणीही लिहू नये अशी माझी ठाम इच्छा आहे.

कां?

माझी मर्जी.

तरीसुद्धा एखाद्यानं ते लिहिण्याचा संकल्प सोडलाच तर तुम्ही त्याला मज्जाव करू शकणार नाही.

खरं आहे. पण मी त्याला त्याच्या कार्यात काडीचीही मदत करणार नाही. मी इतरांना पूर्वीच्या काळात लिहिलेली पत्रंही परत मागवून घेणार आहे. चरित्रकाराने माझ्यावर काहीही मल्लीनाथी करण्याचं कारण नाही. माझं वाङ्मय हेच माझं चरित्र. एकदा मी न्यूयॉर्कमधून भटकत होतो. इतक्यांत एका अपरिचित बाईने मला थांबवून विचारलं, ' महाराज, आपण सॉमरसेट मॉम काय ? ' मी होकारार्थी हसल्यावर तिनं माझ्या हातावरून हात फिरवीत म्हटलं, 'Thank you for hundreds of wonderful hours of entertainment' आणि इतकं बोलून ती नावगाव न सांगता निघून गेली. या असल्या श्रेऱ्यांची मातब्बरी मला टीका-कारांच्या समीक्षेपेक्षा कैक पटीने मोलाची वाटते.

ललित लेखकाने राजकीय मतप्रणालीचं भान ठेवावं काय ? लेखक समाजाचं वर्णन करतो. समाज आणि राजकारण अतूट आहे. साहजिकच लेखनात राजकारण डोकावणारच. तुमचं काय मत आहे ?

ललित लेखन आणि राजकारण यांची युती घडवून आणणं महामूर्खपणाचं आहे. राजकारण हा एक व्यवसाय आहे. लेखन हाही एक व्यवसायच. हे दोन्ही व्यवसाय स्वतंत्र आहेत. एकाचा दुसऱ्याशी काडीमात्र संबंध नाही. राजकारण तात्कालिक असतं. त्याचं वाङ्मयात चित्रण झालं तर थोडयाच काळात ते लिखाण शिळं होईल. मग वर्तमानपत्रांची जुनी फाईल आणि राजकीय कादंबरी यात फरक तो काय असेल ? गाल्सवर्दी आणि वेल्सच्या कादंबऱ्यांची आज काय दशा झालेली आहे ते जरा पहा. ललित लेखक म्हणून माझी जबाबदारी कथा कथन प्रभावीपणे करणं इतकीच आहे, असं ऐटोनें सांगण्यात मला कसलाही कमीपणा नाही. माझं लिखाण वाचून जग सुधारेल, अशी घमेंड मारण्याचं मला काहीही प्रयोजन नाही. सुधारलं तर सुधारू दे. मला त्याच्याशी काहीही कर्तव्य नाही.कुणी सांगावं, माझे विचार पटून कदाचित चांगली माणसंही चळणं शक्य आहे. पण त्याच्याशीही मला कर्तव्य नाही. मला सुचलेली गोष्ट मी उत्तम प्रकारे लिहिणं एवढी लेखक म्हणून माझी एकमेव जबाबदारी आहे.

तुम्ही लेखन करताना काही शिस्त पाळलीत काय ?

हो. नाटकं लिहितांना मी कटाक्षाने शिस्त पाळली. एक आठवडयात एक अंक पुरा करायचा नि त्याच्या पुढच्या आठवडयात त्यात दुरुस्त्या करायच्या, असं वेळा-पत्रक मी कटाक्षानं पाळलं.

तुम्ही सदानकदा म्हणे पैशाचा हिशोब करीत असता ! इन्कमटॅक्स ही तुमची सततची डोकेदुखी आहे. इन्कमटॅक्सच्या कक्षेत येण्याच्या अगोदरच्या काळात तुमच्या डोक्याला कसले व्याप होते ?

माझी हट्टी बायको हीच माझी त्या काळात महान डोकेदुखी होती.

तुमचं आणि तुमच्या मुलीचं भांडण अखेर कोर्टात गेलं. तुम्ही तिला वाईट

म्हटलं वगैरे–वगैरे. पण आदर्श पिता म्हणून तुमची कर्तव्यं तुम्ही बजावलीत ?

आदर्श पिता बनण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या परिस्थितीनुसार शक्य ती सारी मदत मी माझ्या लेकीला केली. तिलाच नव्हे तर तिच्या मुलाबाळांनाही भरपूर पैसे दिले आणि हे सारं निरपेक्षपणे, कसलीही अभिलाषा न धरता केलं. पण माझ्या बायकोने तिला माझ्याविरुद्ध फितवलं. माझ्या दुष्ट बायकोचा प्रभाव तिच्यावर पडला.

तुम्हाला फक्त एकच मुलगी झाली. आणखी मुलं झाली असती तर बरं झालं असतं ?

होय, असंच म्हटलं पाहिजे. कारण पोटची पोरं जन्मदात्या बापाला जसा धडा शिकवतात, तसा धडा या त्रिभुवनात अन्यत्र कुठेही शिकायला सापडत नाही !

बापाचं संसारातलं कर्तव्य काय असावं ?

मुलांसमोर आदर्श ठेवणं.

तुमची वागणूक तशी होती ?

नव्हती.

तुम्ही स्वतः होऊन लग्नासाठी किती बायकांना मागण्या घातल्या ?

फक्त एकीलाच. आणि तीही एकदा. तिथे मला नकार मिळाला. मात्र तिचं माझ्यावर गाढ प्रेम होतं.

तरीही नकार मिळाला ?

हो, मी तिला खोदून खोदून विचारलं. तिच्यासाठी साखरपुड्याची अंगठीही घेतली. म्हटलं, 'नाही का म्हणतेस ? तुला मी आवडत नाही ?' ती म्हणाली, 'अंतःकरणापासून आवडतोस.' म्हटलं, 'दुसऱ्या कुणावर मन जडलं आहे काय ?' तर म्हणाली, 'छे. ते अशक्य आहे. पण मी तुझ्याशी कालत्रयी लग्न करू शकत नाही.' मी विचारलं, 'तुझी तब्बेत बरी नसेल तर मी थोडासा वेळ जाऊ देतो. तू पुन्हा शांतपणे विचार कर.' तर म्हणाली, 'पुनर्विचारही शक्य नाही. आपलं लग्न होऊ शकत नाही.' आणि इतकं बोलून ती नाहीशी झाली. त्यानंतर अनेक वर्षं लोटली. मला ती अचानक अमेरिकेत भेटली. साहजिकच मी तिला विचारलं, 'काय ग, मला तू तेव्हा लग्नाला नकार का ग दिला होतास ?' ती शांतपणे म्हणाली, 'त्यावेळी मला दुसऱ्या माणसापासून दिवस गेलेले होते. आमचं प्रेमबीम नव्हतं. पण प्रेमाशिवायही अशा गोष्टी घडतातच. मी काळजी घेतली होती, पण कुठे तरी गडबड झाली.' मी विचारलं, 'मग मुलगा कुठे आहे तुझा ?' तर थंडपणे म्हणाली, 'माझा गर्भपात झाला.' मग प्रकरण तेवढ्यावरच संपलं.

नवीन उमेदवार लेखकाला तुमचा संदेश काय असेल ?

A writer must write and record and describe and express constantly. एकदा एका अमेरिकन बाईनं मला सल्ला विचारला, 'तुम्ही सर्वज्ञानी

आहात. विशेषत: प्रीतिपंडीत आहात. तेव्हा पुरुषावर भुरळ कशी घालावी आणि ती कायम कशी टिकवावी ते मला सांगा. मीं सांगितलं, 'पुरुषावर भुरळ घालण्याचा स्त्रीला मार्ग फक्त एकच आहे; तुमच्यापाशी लैंगिक आकर्षण हवं. आणि ती भुरळ कायम ठेवण्याचा मार्गही फक्त एकच आहे; तुम्ही लैंगिक तृप्ती दिली पाहिजे.'

जगात कठीण काय आहे, जगण्याची कला की लेखनकला ?

ह्या प्रश्नाचं सरळसरळ उत्तर देता येणार नाही. वेगळं देतो. लेखन करताना मी रंगून गेलो; आयुष्य जगताना कटाळलो. एक उदाहरण सागतो. माझ्याच वयाचा माझा एक म्हातारा मित्र होता. त्याची बायको मात्र फार तरुण होती. ती अगदी निराश होती. म्हाताऱ्या नवऱ्याची आयुष्यातली आनंदावरली पकड ढिली ढिली होत चाललेली पहाणं तिच्या नशिबी आलं होतं. तिने डॉक्टर्स बोलावले. एकदा मी गेलो. माझ्या लक्षात आलं, की माझ्यासारखंच ह्याचं वय झालं आहे, वरवरच्या मलमपट्टीने काहीही होणार नाही. मी त्याला स्वानुभवाचा सल्ला दिला, की बाबा, तू स्वित्झर्लंडला जा आणि नवतारुण्योन्मादाचा लाभ होण्यासाठी शस्त्रक्रिया करून घे. तो अगोदर जाईच ना. मग त्याची तरणी बायको त्याला घेऊन गेली. त्याने मी सांगितलं तसं केलं, आणि एका महिन्यातच त्याला गूण पडला. त्याने कृतज्ञतापूर्वक मला एक भेटवस्तूही पाठवली. मात्र तेव्हापासून त्याची बायको मात्र माझ्याशी बोलायची अजिबातच बंद झाली !

तुम्ही जे खरं म्हणून सांगता ते नकली वाटतं आणि नाटकी म्हणून सांगता ते खरं वाटतं !

हे बोलून तुम्ही माझ्यातला लेखकाचा बहुमान केला आहे.

तुमचा असा बहुमान अनेकदा होत असेल, नाही ?

होतो नं. एकदा एका सैनिकाने मला पत्रं टाकलं, की जो कुणी तुमची कुठलीही तीन पुस्तकं वाचेल, त्याला आयुष्यात आणखी काही वाचण्याची जरूरी नाही. केवढा बहुमान आहे, अनोळखी वाचकाने असं कळवावं म्हणजे !

विसाव्या शतकातली सर्वश्रेष्ठ कादंबरी कोणती ?

मार्सेल प्राऊस्टची Remembrance of Things Past.

युगप्रवर्तक कादंबरी कोणती ?

टॉलस्टॉयची War and Peace.

अत्यंत वाचनीय कादंबरी कोणती ?

बाल्झाकची Pere Goriot.

तुम्ही स्वत: किती गोष्टी लिहिल्यात ?

एकशे चार. माझं कथालेखन आता कायमचं थांबलं. माझ्या कथालेखनातलं

पृष्ठ ५८ वर

‘दक्षिणवाहिनी गंगे’ इतकाच भारतातील दुसरा एक भव्य प्रकल्प

# जगातील सर्वांत लांब कालवा

इंद्रसेन डोंगरे

पावसाळा आला, की विशेषत: उत्तर भारतीय नद्यांना पूर हा यायचाच आणि शेकडोच नव्हे, तर हजारो खेडी व काही महत्त्वाची शहरेही जलमय व्हायची हे जणू काही ठरल्यासारखेच ! आपण दरवर्षी वार्तापटांत आणि वर्तमानपत्रांच्या प्रथम पृष्ठावर अतिवृष्टीने अथवा नद्यांच्या महापुराने उडविलेल्या हाहा:काराची भयंकर दृश्ये बहुधा पहातोच. आपण असेही वाचतो, की पूरग्रस्त विभागात विमानाने जाऊन पंतप्रधानांनी पहाणी केली. काही ठिकाणी लष्कराच्या साहाय्याने पुराचे पाणी थोपविण्याचा प्रयत्न केला; जीवित व वित्तहानी थांबविली अथवा काही ठिकाणी पॅराशूटच्या साह्याने विमानातून पूरपीडितांना शिधा पोचविण्यात आला, वगैरे वगैरे.

वर्षानुवर्षे हे असे वृत्त सतत ऐकायला आणि वाचायला मिळाल्यावर साहजिकच आपल्यासारख्या सर्वसामान्य नागरिकांच्याही मनात काही प्रश्न उभे राहतात. जवळजवळ दरवर्षी येणारी ही आपत्ती टाळण्याचा काहीच उपाय नाही काय ? नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी वित्त आणि जीवित हानी थांबविण्याचा काहीच मार्ग सापडण्यासारखा नाही काय? जर आपल्या मनात असे प्रश्न येतात, तर शासकांच्या आणि इंजिनियरांच्या मनात असे प्रश्न न आले तरच आश्चर्य ! त्यातून आपला भारत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपली सर्वांगीण प्रगती करून घेण्यासाठी कटिबद्ध झालेला. विकसनशील देशांच्या अग्रस्थानी असलेला. गेल्या तीन–चार पंचवार्षिक योजनांद्वारे भाक्रा-नानगल पासून ते नागार्जुनसागर धरणापर्यंत अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आपण पूर्ण केलेले. नवभारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू अशा प्रकल्पांना “आधुनिक भारताची तीर्थक्षेत्रे” म्हणून संबोधीत. अशा एकंदर परिस्थितीत उत्तरेस अतिवृष्टीमुळे अथवा पावसाळ्यात एरवीही येणाऱ्या नद्यांच्या पूरांना प्रतिबंध करण्यासाठी दक्षिणोत्तर कालवा काढला तर कसे ? ही कल्पना

आपल्या देशाच्या विचारवंतांसमोर उभी राहावी हे अगदी स्वाभाविकच नाही काय ?

## प्रकल्पास हिरवा कंदील

आपत्ती युक्तीची जननी होय. या बोलीप्रमाणे भारतातील गंगा मध्य भारतातून वाहणाऱ्या नर्मदेद्वारे दक्षिण भारतातील नद्यांशी जोडून टाकेल असा एखादा प्रचंड लांबीचा कालवा खोदण्याची कल्पना भारतसरकारला सुचली. अशा प्रकारचा कालवा एकंदर ३,४२४ किलोमीटर लांबीचा होईल ! हरियाना राज्यातील प्रसिद्ध असलेला जुई नहर हा कालवा केवळ १५० किलोमीटर लांबीचा आहे. पण या किंवा इतर कालव्यांची तुलना उत्तर दक्षिण भारताला जोडणाऱ्या प्रचंड कालव्याशी कशी करता येईल ? अशा प्रचंड कालव्याच्या प्रकल्पाची आर्थिक व व्यावहारिक शक्याशक्यता (Feasibility) तपासून पाहाणे इष्टच ठरते. म्हणून भारताने या प्रकल्पाच्या शक्यतेची सर्वंकष पहाणी केली. त्यावेळी त्यांनी यूनोच्या विकास कार्यक्रमाखाली उपलब्ध होणारे आर्थिक व तांत्रिक मार्गदर्शन स्वीकारले. त्यानुसार गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये एक तज्ज्ञांचे मंडळ या प्रकल्पाची इंजिनियरिंगच्या दृष्टीने पाहणी करून गेले. आणि त्याने हिरवा कंदील दाखविला !

हा प्रकल्प केवळ भारतातच नव्हे तर जगातील सर्वात अधिक मोठा असल्यामुळे याबद्दल दुसऱ्यांदा आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचे मत अजमवावे, हे अगत्याचे आहे असे केंद्रीय पाटबंधारे व वीज मंत्री डॉ. के. एल. राव यांनी मार्च २० रोजी राज्यसभेत प्रश्नोत्तरांच्या वेळी सांगितले. यूनोच्या या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या मंडळाचे प्रमुख न्यूयॉर्क येथील "नैसर्गिक साधनसंपत्ती आणि दळणवळण विभागाचे" संचालक डॉ. जोसेफ बारनिया हे आहेत.

या प्रकल्पाने नद्यांच्या पुरावर थोडेबहुत नियंत्रण तर होईलच, परंतु त्याबरोबरच देशाचे अनेकविध फायदे होतील. या कालव्याद्वारे पाणी पुरवठा होऊन शेती-उत्पादन वाढेल. असंख्य खेड्यांना पिण्यास पाणी मिळू शकेल. सध्या अस्तित्वात असलेल्या सडका आणि रेल्वेमार्गांनी होणाऱ्या दळणवळणाच्या मदतीला जलवहातुकीची साथ मिळेल. कारण हा कालवा ७६ मीटर रुंद आणि ३ ते ७ मीटर खोल असल्यामुळे मालवाहू जहाजे त्यातून ये जा करू शकतील. या कालव्याच्या काठी ठिकठिकाणी अनेक बंदरे विकसित केली जातील. तेथून शेतीमाल, लाकूड आणि तेले चढविण्या-उतरविण्याबरोबरच त्यासाठी वखारीही उपलब्ध केल्या जातील.

## भव्य प्रकल्प

या कालव्याच्या भव्यतेची कल्पना यावरून येऊ शकेल, की तो बिहारमधील पाटणा या राजधानीच्या शहरापासून निघून पुढे एकंदर सहा राज्यांतून वाहात जाणार आहे आणि त्याच्यावर २०० पूल बांधावे लागतील ! त्याचे टप्पे खालील.

प्रमाणे असतील. पाटणापासून बारगीपर्यंत जाऊन तो नर्मदेस मिळेल. हे अंतर ८४८ किलोमीटर राहील. बारगी ते पंचमपाद ९७६ किलोमीटर, पंचमपाद ते श्रीशैलम ६२६ किलोमीटर आणि श्रीशैलम ते मेत्तूर धरणापर्यंत ९४४ किलोमीटर अशी एकंदर ३,४२४ किलोमीटर लांबी होईल.

या प्रकल्पाचा उद्देश दरवर्षी पावसाळ्यातील चार महिन्यांत गंगेच्या जादा व पुराच्या एकूण ४०,००० क्यूसेक्स इतक्या प्रमाणात पाण्याचा सदुपयोग करून घेण्याचा आहे. त्याकरवी मध्य आणि दक्षिण भारतातील ज्या प्रदेशांत बहुधा अवर्षण असते; त्या प्रदेशांतील सुमारे १० दशलक्ष एकर-फूट जमिनीला पाणी पुरवठा होईल. ही क्षमता पुढे २० दशलक्ष एकर-फुटांपर्यंत वाढविण्यात येईल.

पाटण्याजवळ गंगचे पाणी या कालव्यात सुरवातीस येऊन मिळेल. तेथून ते छोटानागपूरच्या पठारावर ६०९ मीटर उंचीवर पंपाच्या साह्याने चढविण्यात येईल. नंतर पुढे ते उतारावरून दक्षिण भागी वाहात जाईल आणि मग महानदी, नर्मदा, वैनगंगा आणि पंचगंगा यांच्या खोऱ्यांतून कालव्याचे हे पाणी वहात जाऊन गोदावरी नदीस मिळेल. गोदावरीत मिळालेला हा लोंढा पुन्हा पंपाच्या साह्याने उपसून पचमपाद धरणाच्या मार्गे कृष्णा नदीत सोडण्यात येईल. श्रीशैलम धरणापासून पुढे ते पंपाने उपसून ९० मीटर दूर न्यावे लागेल आणि मग मेत्तूर धरणापाशी ते कावेरी नदीत सोडण्यात येईल. असा हा त्यांचा एकंदर ३,४२४ किलोमीटर लांबीचा प्रदीर्घ प्रवास राहील.

यूनेस्कोने १९६५ ते १९७४ हे आंतरराष्ट्रीय जलदशक (International Hydrolic Decade) म्हणून जाहीर केले आहे. या दशकाच्या आतच या अभूतपूर्व प्रकल्पाचा श्रीगणेशा करण्याचा नियोजनमंडळाचा मानस व प्रयत्न राहील, असे डॉ. के. एल. राव आणि केंद्रीय राज्य पाटबंधारे व विद्युत् मंत्री श्री. मोहन धारिया यांच्या वक्तव्यावरून दिसते.

# लगन



सौ. दीपा पटवर्धन

ज्याला भूतकाळ पुसता येतो
आणि भविष्य रंगवण्याची हौस नसते
त्याला प्रचंड खात्री असते....सारे हवे तसे घडवण्याची.
मलाही तशीच खात्री होती....

---

खूपशी खुषी...खूप खुषीत आहे मी.

शब्द सापडत नाहीतच. सुखाचा स्वीकार करतानाही आपण उतावीळ नसतोच कधी. त्यामुळेच कसलीही वेदना आपल्याला माहीतच नाही.

माझे नंदाचे लग्न.

कर्मयोग ?

अनासक्ती ?

मृत्यूशी संवाद ?

नाती......दोस्ती......ही पोकळी अस्तित्वाची भरण्यासाठी.

अर्थांचे गठ्ठे. शब्दांची पेरणी......त्यांचे पीक.

१७ डिसेंबर.

नंदा......मी......खूप जिवलग, कितीतरी हितचिंतक, माझे आई-अण्णा...... लग्नाचा सोहोळा......कसं सांगू ? कसं व्यक्त करू ?

आनंदाला पर्याय नाही.

आनंदाचा पर्याय आनंदच.

So I was very happy.

नंदा......माझी नंदा......पूर्णार्थानं माझी झालेली माझी जिवलग मैत्रिण ! प्रयसीचा टप्पा न गाठता थेट माझी बायको झाली.

जिवलग मैत्रिण आणि प्रेयसी ह्यातला फरक अनाकलनीय आहे. तरीही नंदा फक्त माझी जिवलग मैत्रिण होती. अबाधित दोस्ती यापलीकडे काही नाही.

पण दिवस लोटले, काळ लोटला.

काळाच्या गंमती.

हरवलेली माणसे.

गवसणारे क्षण.

सारा गतकाळ नजरेसमोरून सरकतोय. त्याच्यावर प्रेम असते पण तो गेलाय याची पूर्णत: खात्री असल्याने त्याच्याशी तसा संबंधही नसतो.

असते याद ती......अस्तित्वांची, एकमेकात मिसळून गेलेल्या.

आयुष्यात असे प्रसंग खूप येतात. आत्मविश्वास, ताकद असूनही मनासारख्या गोष्टी कधी कधी घडतच नाहीत. एरवी लग्नाच्या बाजारात राजरोस फसवली गेलेली सुकुमार नंदा मी सहनच करू शकलो नसतो.

आयुष्याचे सर्वांत सुंदर स्वप्न कोसळत असताही अतिशय शांत असलेली नंदा मी तिच्या पहिल्या लग्नानंतर प्रथमच पाहिली.

आणि त्याच क्षणी...तिच्या साथीच्या दुर्दम्य विश्वासावर आयुष्याचे सर्वांत सुंदर सत्य साकार करण्याचे मी ठरवले.

माझ्या भोवतीचे, माझे माझे म्हणवणारे सारे हसले. साऱ्यांच्या नापसंतीच्या नजरा जणू पुन्हापुन्हा विचारीत होत्या...

"काहीतरी आगळं वेगळं करण्याची इतकी विकृत इच्छा कशाला?" त्यांच्या नजरेत मी सुशिक्षित, सुदृढ तरुण...तेव्हा मला बायकोही तशीच हवी. प्रतिष्ठित समाजात मान्यता पावलेली, सुरेख, घरंदाज वगैरे वगैरे.

मला संताप येतोय साऱ्यांचा, कोत्या मनाच्या ह्या समाजाचा, आणल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या खोट्या दडपणाचा...!!! नंदाच्या लग्नाच्या वेळीही ह्या साऱ्या साऱ्या कसोट्याच लावल्या होत्या. प्रतिष्ठित, पैसेवाला, सुशिक्षित, शिवाय घरंदाज जावई त्यांना हवा होता. हवा तसा त्यांना तो मिळालाही भरपूर हुंडा देऊन...

पण लग्नानंतरच्या पहिल्याच रात्री...

"सौ. नंदा, तिकडे अमेरिकेस माझी पहिली बायको वाट पहातेय. मी तिकडेच रहाणार आहे कायमचा, नंदा मी तुझ्याशी लग्न केलं ते तुझ्या बापाचा सूड घ्यायचा म्हणून. फार घमंड आहे त्यांना खोट्या प्रतिष्ठेची अन् स्वत:च्या पैशाची. पैशाच्या बळावर मला कत घेऊ विपहात होते. भोगा आता...नंदा, मला तुझी कीव येतेय. तुझा बळी द्यावा लागला म्हणून...पण तू त्यांची एकुलती एक; मग माझाही नाईलाज झाला. पण तुझे बाबा तुला आयुष्यभर सहज सांभाळतील पैशाच्या आवरणाखाली."

सजवलेल्या खोलीतल्या, सुगंधी फुलांनी सजवलेल्या पलंगावरच्या मऊशार उशीवर ठेवलेल्या त्या चिटोऱ्यानं नंदाचं सगळं आयुष्य उध्वस्त केलं होतं.

कसं ? कसं सहन केलं असेल हे सार माझ्या नंदानं ?

घडलेल्या साऱ्या घटनांचा मी शांतपणाने विचार करीत होतो. माझा त्यावेळचा शांतपणा साऱ्यांना ढोंग वाटायचा.

पण, भावनांचा गडद कचरा करून, क्षणांची विटंबना करून, त्यांना हातचे दवडण्याचा खुळेपणा मला करायचा नव्हता.

स्वप्नील भाबडेपणा माझ्या स्वभावातच नाही. म्हणूनच मी ताबडतोब निर्णय घेतला.

"नंदाला माझी बायको करण्याचा ! ! !"

ज्याला भूतकाळ पुसता येतो आणि भविष्य रंगवण्याची हौस नसते, त्याला प्रचंड खात्री असते...सारे हवे तसे घडविण्याची.

मलाही तशीच खात्री होती.

युद्ध जिकल्यानंतर सैनिकांचे कौतुक करायला सारेच धावतील.

घडलेही तसेच......

आजचा हा दिवस......

साऱ्यांच्या रोखलेल्या कौतुकाच्या नजरा......


शब्दांशी आपले नाते संपत आल्याचे फार प्रकर्षाने वाटते आहे. एकटा नाही आता मी. नंदा आहे शेजारी.

माझी झालेली......

वास्तविक पानेच्या पाने मजकूर लिहिण्याची वेळ ही......पण मी लिहूच शकत नाही.

आणि मी लिहू शकत नाही हेच लिहीत रहाण्याचे ठरवून लिहितो आहे......

रेघांपलीकडचे सारे जाणून......



# आलोचना मासिकाचा
# कोल्हटकर विशेषांक

अनंत भावे

'आलोचना' हे एक वेगळे मासिक आहे. या मासिकात केवळ पुस्तकपरीक्षण असतात; आणि तीही निनावी केलेली. परीक्षणे खऱ्या अर्थाने निर्भीड व्हावीत म्हणून परीक्षणकर्त्याचा चेहेरा पुसून टाकलेला असतो. नावासुद्धा परीक्षणे लिहिणे अवघड आहेच; पण प्रसिद्धीची (आणि मानधनाचीही) अपेक्षा सोडून निनावी परीक्षणे लिहिणे जास्तच अवघड आहे. आलोचनाकारांनी ही अवघड साधना गेली दहा वर्षे चालवली आहे. आलोचनेच्या अंकातून मधूनमधून प्रसिद्ध होणारी आवाहने-निवेदने तुम्ही वाचा; म्हणजे आलोचनेच्या धडपडीची काहीशी कल्पना तुम्हाला येईल.

या धडपडीत, मला वाटते, आलोचनेची इतकी शक्ती खर्ची पडते, की त्यामुळे उपक्रमशीलता मर्यादित होते. तरीही प्रसंगानुरोधाने 'केशवसुत' व 'गीतकाव्य' (Lyric) या विषयांवरील विशेषांक अलीकडे आलोचनेने काढले. आणि आता श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या नुकत्याच झालेल्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आलोचनेने एक महत्त्वाकांक्षी कोल्हटकर-विशेषांक सादर केला आहे.

आलोचनेने आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या पार पलीकडची ही जबाबदारी अंगावर घतली, ती एका कर्तव्यभावनेने" या शब्दांत प्रस्तुत विशेषांकाबद्दलची आपली भूमिका संपादकांनी स्पष्ट केली आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे 'साहित्याचार्य'; एक युगप्रवर्तक लेखक अशी त्यांची ख्याती. परंतु एक 'सुदाम्याचे पोहे' आणि दुसरे 'बहु असोत सुंदर संपन्न की महा' हे महाराष्ट्रगीत सोडता कोल्हटकर जवळजवळ विस्मृतप्राय झालेले. अशा परिस्थितीत, जन्मशताब्दीच्या निमित्ताने कोल्हटकरांचे पुनर्मूल्यमापन करण्याची संधी आली आणि आलोचनेने ती 'कर्तव्यभावनेने' साधली.

मात्र आलोचनेचा कोल्हटकर-विशेषांक पाहिला म्हणजे ही कर्तव्यभावना अगतिक, आंधळी नसून चांगली डोळस आहे, याची साक्ष पटेल. या अंकात कोल्हटकरांच्या अनेकविध वाङ्मयसेवेची चिकित्सा आहे; त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे लेखरूप आणि पत्ररूप दर्शन आहे; आणि त्यांच्या व त्यांच्यावरील इतरांच्या वाङ्मयाची विस्तृत आणि उपयुक्त सूचीही आहे.

श्री. वि. स. खांडेकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि श्री. गं. दे. खानोलकर या तीन कोल्हटकर शिष्यांनी घडवलेले कोल्हटकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन मोठे हृद्य आहे. त्यांनी सांगितलेल्या विशेषांचा प्रत्यय कोल्हटकरांच्या पत्रांतूनही येतो. ही पत्रे विशेषांकात सादर करण्यात संपादकांनी मोठे औचित्य दाखवले आहे. "गडकऱ्यांच्या मरणाने माझा अत्यंत प्रिय व्यवसायबंधु, साह्यकर्ता व पाठीराखा नाहीसा झाला "...

"माझे हृदय चमत्कृतिपूर्ण नाविन्याला हपापलेले असते' या आपल्या विधानात माझ्या लेखनाचे मर्म साठवलेले आहे असे म्हणण्यास हरकत नाही "... "चिमणी (कोल्हटकरांच्या 'श्यामसुंदर' या कादंबरीची नायिका) आपणास अस्वाभाविक वाटते, पण तिच्याइतकी बुद्धिमान स्त्री माझ्या परिचयाची असून आज समाजात विद्यमान आहे "... "रा. देवलांनी मला माझे नाटक (वीरतनय) जाळून त्याची राख तोंडास फासण्याबद्दल सूचना केली अशी जी आख्यायिका दिली आहे, ती धडधडीत खोटी आहे" यांसारख्या पत्रगत वाक्यांतून घडणाऱ्या कोल्हटकरांच्या दर्शनाचे महत्त्व वेगळे स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही.

## एकच निष्कर्ष

कोल्हटकरांची नाटके, कविता, कथा आणि कादंबऱ्या यांना थोडेबहूत ऐतिहासिक मूल्य आहे, स्वतंत्र मूल्य जवळजवळ नाहीच, असा निष्कर्ष या विशेषांकातील त्या त्या वाङमयप्रकारावर लेख लिहिणाऱ्या टीकाकारांनी काढला आहे; आणि तो मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही. जवळपास हाच निष्कर्ष 'श्रीपाद कृष्ण : वाङ्मयदर्शन' या वा. ल. कुलकर्णी यांनी १९५९ साली लिहिलेल्या पुस्तकात काढलेला आढळतो. किंबहुना प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचे पुस्तक आणि 'आलोचने'च्या कोल्हटकर-विशेषांकातील काही लेख यांच्या प्रतिपादनात सारखेपणा पुष्कळ आहे. [या संदर्भात, वानगीदाखल, कोल्हटकरांनी वृद्धापकाळात लिहिलेल्या तीन लघुकथांसंबंधीचे प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचे पृ. ९५ वरील तळटीपेतील विवेचन आणि श्रीमती इंदुमती शेवडे यांचे कोल्हटकर-विशेषांकातील पृ. ११७-११८-११९ वरील विवेचन एकमेकाशी ताडून पाहावे. मात्र या सारखेपणावरून लगेच श्रीमती इंदुमती शेवडे यांनी कुलकर्ण्यांच्या विवेचनाची उचल केली, असे म्हणणे आततायीपणाचे ठरेल. कारण या कथांबद्दल (आणि कोल्हटकरांच्या इतर लेखनाबद्दलही) मुद्दाम वेगळे विवेचन करायचे तर हेकटपणा किंवा वावदूकपणा किंवा आंधळा कोल्हटकराभिमान यापैकी एखादा वा तीनही गुण परीक्षणकर्त्याकडे हवेत.]

या गुणांचा आढळ कोल्हटकर-विशेषांकातील 'श्रीपादकृष्णांची साहित्यदृष्टी' या श्री. सुनील सुभेदारांच्या लेखात होऊ शकेल. हा लेख प्रतिक्रियात्मक आहे. एके ठिकाणी ते म्हणतात : 'श्रीपाद कृष्ण : वाङ्मयदर्शन' या प्रा. कुलकर्णी यांच्या टिप्पणीवजा लेखसंग्रहात माहितीच्या, प्रतिपादनाच्या आणि आकलनाच्या एवढ्या

चुका आहेत, की त्या सगळ्या दाखवून देणे हा डॉक्टरेटसाठी प्रबंध लिहिण्याच्या तोडीचा उद्योग ठरावा. वस्तुतः त्यांच्या चुका दाखवण्याचे प्रयोजन नाही. परंतु त्यांना भाष्यकार समजून माग पुसत जाणाऱ्या अनुयायी टीकाकारांचा एक वर्ग त्यांची कोल्हटकरांवरील मते प्रमाण मानून उद्‌धृत करत असतो. '–तेव्हा या पर-प्रत्ययनेय, अधू दृष्टीच्या मराठी टीकाकारांसाठी नवा महाजनपंथ निर्माण करावा या हेतूने बद्धपरिकर होऊन श्री. सुभेदारांनी या लेखाची सिद्धता केली आहे. प्रत्य-क्षात मात्र श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे अवाजवी समर्थन आणि वा. ल. कुलकर्ण्यांवर अवाजवी आगपाखड, असे ढळतोल स्वरूप या लेखाला आले आहे. कोल्हटकर कले-पेक्षा कारागिरीलाच महत्त्व देतात, किंवा रस म्हणजे संबंधी पात्राच्या मनात निर्माण होणारा भाव, ही कोल्हटकरांची रसकल्पना चुकीची आहे, या आणि इतर अभिप्रायांबद्दल प्रा. कुलकर्ण्यांनी आपल्या पुस्तकात पुरेसे स्पष्टीकरण केले आहे. त्यात आकस वा अपसमज आहे, असे मला वाटत नाही. तसे असते तर, ' मराठी टीकेला शिस्त, शास्त्रीयता, पद्धतशीरपणा, तत्त्वविचाराचे पाठबळ, वाङ्मयेतिहा-साची दृष्टी, जागरूकता आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे अवघड कार्य (टीकाकार) कोल्हटकरांनी केले, ' हा निष्कर्ष वा. ल. कुळकर्ण्यांनी कसा आणि कशाला काढला असता ?

म्हणजे वा. ल. कुलकर्ण्यांचा अक्षम्य प्रमाद हा, की त्यांनी कोल्हटकरांचे मूल्य-मापन तटस्थपणे आणि विवेकीपणाने केले आणि आपली मते प्रांजळपणे मांडली. आणि त्याबद्दल एके ठिकाणी त्यांना मिळालेला, सुभेदारी अहेर पाहा : ' पण कुलकर्णी यांना क्षमाच केली पाहिजे. का, की ते काय लिहीत आहेत, ते त्यास समजत नाही. ' मला वाटते, श्री. सुनील सुभेदरांनाही या लेखाबद्दल क्षमाच केली पाहिजे; का, की ते काय लिहीत आहे तें त्यांना चांगले समजते आहे !

खरी गोष्ट अशी आहे, की कोल्हटकरांच्या सगळ्या साहित्यविषयक मतांचा परस्परमेळ घालणे शक्य नाही. याची अचूक जाणीव वसंत दावतरांच्या ' श्रीपाद कृष्णांची समीक्षा ' या लेखात दिसते आणि म्हणून तो उद्‌बोधक झाला आहे.

कोल्हटकरांच्या विनोदाचा परामर्श श्री. गं. दे. खानोलकर आणि प्रा. वि. द. संत यांनी घेतला आहे. त्यात, प्रसंगोपात, कोल्हटकरांच्या विनोदावर वेळोवेळी केल्या गेलेल्या टीकाटिप्पणीचे संकलनही आहे. ' श्रीपाद कृष्णाचे नाट्यसंगीत ' आणि ' श्रीपाद कृष्णांवरील समकालीन समीक्षा ' हे आणखी दोन संकलनात्मक उपयुक्त लेख या विशेषांकात आहेत.

जन्मशताब्दीच्या निमित्ताने श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांबद्दलचे कुतुहल जागे झाले होते. अशा वेळी प्रकाशित झालेल्या ' आलोचने 'च्या या महत्त्वाकांक्षी कोल्हटकर–विशेषांकाने फार मोठे औचित्य साधले आहे. ' आलोचना 'च्या पुढील उपक्रमांबद्दल शुभेच्छा व्यक्त करतो.

□ □ □

# संभाजी महाराजांवरील मराठी ऐतिहासिक नाटके



## उत्तरार्ध

भीमराव कुलकर्णी

संभाजीविषयक, मराठीतल्या, ' बेबंदशाही 'पर्यंतच्या नाटयकृती या मराठी ऐतिहासिक बखरींनी जो भाव व्यक्त केला होता, त्याच्याशी संवादी होत्या आणि संभाजीबद्दलच्या दारुण शोकनाटयाच्या आकर्षणातून त्या निर्माण झाल्या होत्या. परंतु १९१७ पासून काही एक निराळा सूर काही नाटयकृतींतून उमटू लागला. अलीकडच्या काळात वसंत कानेटकर यांनी लिहिलेल्या ' रायगडला जेव्हा जाग येते ' व ' इथे ओशाळला मृत्यू ' या दोन नाटकांमध्ये हा सूर पराकोटीला पोचला आणि संभाजीबद्दल एक गूढ असे नवे कुतुहल निर्माण झाले. संभाजीबद्दलचे नवे संशोधन आणि नवी ऐतिहासिक नाटके यांचे स्वरूप व त्यानिमित्ताने झालेली बरीच उलट-सुलट चर्चा लक्षात घेऊन काही महत्त्वाच्या गोष्टी येथे स्पष्टपणे परंतु अगदी थोडक्यात मांडणे अत्यावश्यक झाले आहे.

१९१७ साली वा. न. शहा यांचे ' प्रणयी युवराज ' व नाथमाधव यांचे ' मराठ्यांचा आत्मयज्ञ ' अशी दोन नाटके संभाजीच्या जीवनावर लिहिली गेली आहेत. त्यांपैकी शहा यांनी आपले नाटक ' स्वतंत्र ऐतिहासिक ' असल्याचे म्हटले आहे, आणि या वर्णनाला ते साजेसे आहे. संभाजी-झेबुन्निसा यांच्या रंगेल प्रणयाचे हे एक अतिरिक्त चित्रण आहे. नाथमाधवांच्या नाटकापासून संभाजीविषयक समर्थनपर अशा नाटकांचा जमाना सुरू होतो. रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्या मराठी रियासतीचा पूर्वार्ध १९०२ साली प्रसिद्ध झाला होता. त्याची दुसरी आवृत्ती

१९१५ मध्ये प्रसिद्ध करताना सरदेसायांनी संभाजीविषयक समर्थनपर असे काही विवेचन केले. या नव्या माहितीचा उपयोग नाथमाधवांनी करून घेतला आहे. ' हे नाटक पाहून व वाचून संभाजीविषयक प्रचलित असलेले सर्वसाधारण मत काही अंशाने तरी बदलावे; निदान, अप्रतीम शौर्य, निरुपम धाडस व मरण आले तरी शत्रूस हार न जाण्याचा अलौकिक बाणा इत्यादीमुळे हा महापुरुष शिवाजीचा पुत्र म्हणवून घेण्यास लायक होता, इतका तरी ग्रह जनतेचा व्हावा ' अशी नाटककाराची इच्छा होती. त्यांचा हा प्रयत्न फारसा यशस्वी ठरला नाही. कारण त्यांच्यानंतर आलेल्या गडकरी व औंधकर यांच्या कृती अतिशय प्रभावी होत्या. या प्रभावापुढे संभाजीबद्दलचा नवा समर्थनाचा सूर काही काळ दबून गेला.

१८९१ मध्ये प्रसिद्ध झालेले आणि १९१२ पर्यंत मराठी रंगभूमी गाजवीत असलेले पाठारे यांचे नाटक अनेक दृष्टींनी कल्पकतेने युक्त होते, याची प्रचिती यानंतरच्या या विषयावरच्या नाटकांवरून येते. पितापुत्र-संघर्ष, संभाजीला नादी लावणारा कलुषा, आपल्या बापाचा वध करणाऱ्या संभाजीचा सूड घेण्यास टपलेली तुळसा आणि प्रणयाचे डाव टाकून तिने साधलेला कावा, संभाजी-रोषनआरा यांचे प्रणय-प्रसंग, येसूबाईची संभाजीमुळे होणारी कुचंबणा व शेवटी संभाजीचे हौतात्म्य,हे सारे प्रसंग एकापेक्षा एक नाटचपूर्ण असून ह्या काल्पनिक प्रसंगांच्या आधारे नाटककाराने वाचकांचे लक्ष सतत खिळवून ठेवले होते. संभाजी-रोषनआरा प्रकरणामुळे हे नाटक जप्त झाले आणि त्याच्या प्रयोगावर बंदी आली. त्यानंतर पुढे किरातांची नाटके, सहकारी कृष्ण यांची ' शापित महाराष्ट्र ' ही कादंबरी आणि रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी प्रसिद्ध केलेल्या मराठी रियासतीच्या पूर्वार्धामुळे संभाजीच्या बाबतीत एक नवे शिर्के-प्रकरण नाटककारांच्या हाती गवसले. गणोजी शिर्के हा शिवाजीचा मेहुणा व जावई, राजारामाचा तो मामा व संभाजीची बहीण राजकुंवर ही त्याला दिली होती; ही अशा प्रकारची नवी माहिती (तीही बरीच काल्पनिक होती) उपलब्ध झाल्यानंतर तुळशी, गणोजी व कलुषा यांचे त्रिकूट संभाजीच्या नाशासाठी टपलेले नाटकातून दाखविण्यात येऊ लागले. अशा पद्धतीचे पहिले नाटक नाथमाधवांचे. गडकऱ्यांनी या शिर्के-प्रकरणाचा उपयोग करून घेतला नाही. त्यांनी पाठाऱ्यांच्या नाटकाची चौकट घेऊन तिला एक नवा, फार मोठा अर्थ देण्याचा प्रयत्न केला. औंधकरांनी ' बेबंदशाही 'मध्ये शिर्के प्रकरणाची नवी माहिती संघर्षाखातर योजून भाषाशैली, व्यक्तिचित्रण इत्यादिकांची बैठक मात्र गडकरीप्रणीत ठेवली. राजसंन्यास आणि बेबंदशाही यांच्या यशामुळे आणि संभाजीविषयक काही नवी माहिती पुढे येऊ लागल्यामुळे संभाजीबद्दलच्या नव्या नाटकांचे पेव फुटल्यासारखे झाले.

' राजसंन्यास ' प्रसिद्ध झाल्यानंतर त्याच्या पाठोपाठ हडपांचे ' राज संसार ' व औंधकरांचे ' बेबंदशाही ' ही दोन नाटके प्रसिद्ध झाली. गडकऱ्यांची भाषाशैली,

त्यांचा विलक्षण कल्पनाविलास, त्यांनी रंगविलेली तुळशी आणि शेवटच्या अंकात संभाजीच्या तोंडून वदविलेली त्याची आत्मनिर्भर्त्सना या साऱ्यांचा प्रभाव असा काही विलक्षण होता, की यानंतर येणाऱ्या संभाजीविषयक नाटचकृतींतून या साऱ्या वैशिष्टचांचे पडसाद सारखे ऐकू येतात.

## हडप आणि औंधकर

'राजसंन्यास'च्या मागोमाग प्रसिद्ध झालेली हडपांची 'राजसंसार' ही गडकऱ्यांच्या तुलनेने एक दुबळी कृती होती. अनुकरणाचा दोष टाळण्यासाठी गडकऱ्यांनी घेतलेल्या प्रसंगांना व कथासूत्राला संविधानकात जागा न देता स्वतंत्रपणे रचना केल्याचे नाटककाराने सांगितले असले, तरी वस्तुस्थिती मात्र तशी दिसत नाही. छत्रपतींना विलासविहारात गुंगविणाऱ्या विलासललनेचे प्रतीक म्हणून रंगविलेली तुळशी आणि इलाचीबेगसमोर संभाजीने केलेली आत्मनिर्भर्त्सना ही वैशिष्टचे तर गडकरीप्रणीतच आहेत. नाटचदृष्टीच्या अभावामुळे हडपांची कृती परिणामशून्य ठरते. याउलट औंधकरांना ही नाटचदृष्टीची जाणीव चांगली दिसते. त्यामुळेच गडकऱ्यांनी निर्माण केलेल्या वातावरणाचा उपयोग त्यांना 'बेबंदशाही'-मध्ये अतिशय परिणामकारकतेने करून घेता आला. संभाजीच्या व्यक्तिचित्रणाची गडकऱ्यांचीच बैठक औंधकरांनी स्वीकारली आहे. परंतु निराळे प्रसंग आणि कथासूत्र योजून आणि गडकऱ्यांच्या भाषाशैलीचा व कल्पनाविलासाचा मागोवा घेऊन औंधकरांनी आपली कृती कमालीची परिणामकारक बनविली आहे. औंधकरांचे यश हे दुय्यम दर्जाचे असले तरी ते गडकऱ्यांचे सामर्थ्य आत्मसात करण्याच्या प्रयत्नातून प्राप्त झाले आहे. गडकऱ्यांच्या नाटकात नसलेले शिर्केप्रकरण, हडप व औंधकर या दोघांनीही योजिले आहे, परंतु या प्रकरणाचा नाटचपूर्ण संघर्षासाठी औंधकरांनी जितक्या कौशल्याने उपयोग करून घेतला आहे, त्याच्या शतांशही कौशल्य हडपांना दाखविता आले नाही.

औंधकरांनंतर कृ. बा. भोसले यांच्या 'रक्तरंगण' या कृतीला बरेच महत्त्व द्यावे लागेल. 'रक्तरंगण' मध्ये शिवाजीच्या मृत्यूनंतरचे राजकारण रंगविले आहे. संविधानकाररचना, भाषाशैली व व्यक्तिचित्रण या दृष्टीने हे नाटक बरेच वरच्या दर्जाचे आहे. शिवाजीच्या मृत्यूनंतरच्या गृहकलहाचे चित्र नेटकेपणाने उभे करण्याकडे नाटककाराने येथे लक्ष दिले आहे. या गृहकलाची तीव्रता मराठचांतील उच्चनीचतेच्या कल्पनेवर आधारलेली होती, अशी नाटककाराची धारणा आहे. सोयराबाई ही शिर्के कुळातील आणि तिला सासरचे भोसले कूळ आपल्या माहेरपेक्षा कमी वाटत होते, या कल्पनेचा नाटककाराच्या मनावर मोठा परिणाम असल्यामुळे सोयराबाईकडे खलत्व आले आहे. तिच्या खलत्वाबरोबरच राजारामाचे उदात्त बंधुप्रेम आणि कारभारी मंडळाचे कारस्थान यातून सारा संघर्ष उभा केलेला आहे. गडकऱ्यांच्या भाषाशैलीचे अनुकरण करण्यात नाटककार यशस्वी ठरला आहे. उर्दू-

फारसीमिश्रित शब्दांबरोबरच मराठयांच्या तोंडच्या शब्दप्रयोगांचाही त्याने उपयोग केला आहे. जोडीला गोंधळयांचा अस्सल मराठमोळा नाच योजून मराठेशाहीचे वातावरण उभे केले आहे. सोयराबाई, प्रधानमंडळ, राजाराम यांची व्यक्तिचित्रणे, भाषाशैली, नाटकाचा शेवट आणि संभाजी-राजाराम यांच्या संबंधातील भावनातिरेकी (Over Sentimental) वर्णने इ. अनेक वैशिष्टये लक्षात घेतली तर हे नाटक कानेटकरांच्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचे पूर्वसुरी ठरते.

'रक्तरंगण' मधील गृहकलाचे वातावरण इतिहास-संशोधक वा. सी. बेंद्रे यांच्या संभाजीविषयक समर्थनपर लेखांवर आधारलेले आहे. १९२५ पासून बेंद्रे यांनी संभाजीविषयक नवे समर्थनपर विचार लेखरूपाने व्यक्त करावयास सुरुवात केली. १९२९ मध्ये 'छत्रपती संभाजी-चरित्र कार्यालय लिमिटेड' नावाची संस्था स्थापून संभाजीविषयक साधनांचे संकलन त्यांनी सुरू केले. ही माहिती गोळा करता-करताच लेखद्वारा त्यांनी संभाजीबद्दल एक निराळीच हवा निर्माण केली. ही हवा किती पराकोटीला पोचली होती, याची कल्पना कोठीवाल्यांनी लिहिलेल्या 'छेडलेला छावा' या नाटकाच्या प्रस्तावनेवरून येईल. संभाजीविषयक नवी माहिती इतकी विपुल प्रमाणात उपयोजिली आहे, की ती पडताळून पाहण्यास संशोधकास त्याची हयात पुरणार नाही, असे कोठीवाल्यांना त्यावेळी वाटू लागले होते! बेंद्रे यांनी संभाजीबद्दल पाचपन्नास हजार पृष्ठे अस्सल माहिती मिळविली आहे आणि ती आपण पाहिली आहे, असा आव कोठीवाल्यांनी आणला आहे, तो बेंद्रे यांनी निर्माण केलेल्या हवेमुळेच!

बेंद्रे यांच्या हालचालींमुळे संभाजीबद्दल एक वाढते कुतुहल आणि वाढते गूढ निर्माण झाले. त्यामुळे नाटककारांमध्ये जो एक आवेश निर्माण झाला, तो त्यांच्या कृतींतून आणि प्रस्तावनांतून ओसंडत राहिला. हडपांनी 'राजसंन्यास'च्या प्रभावामुळे 'राजसंसार' हे नाटक लिहिले होते. त्यांनी १९३१ साली 'रायगडची राणी' हे नाटक लिहिले. त्याच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे :

> "संभाजी महाराजांच्या चरित्रावर आजवर गोष्टी, कादंबऱ्या, नाटके वगैरेंच्या रूपाने जो प्रकाश टाकण्यात आला आहे तो बराचसा निराधार आहे. एखाद-दुसरा अपवाद सोडला तर इतरांनी संभाजीमहाराजांना व्यसनांची व दुर्गुणांची मूर्ती ठरविण्याचा अक्षम्य अन्याय केला आहे, असे अलीकडील ऐतिहासिक शोधावरून कबूल करणे भाग आहे.

१९२७ साली व्यं. वि. वैद्य यांनी संभाजीच्या गोमांतकस्वारीचे वर्णन करण्यासाठी 'गोमांतक विजय' हे नाटक लिहिले होते. १९३३ मध्ये मालती तेंडुलकर यांनी याच विषयावर 'मराठयांचा राजा' हे नाटक लिहिले. त्यांचा अभिनिवेश पाहण्यासारखा आहे. त्या म्हणतात:

" संभाजी म्हणजे स्वाभिमानाची व शौर्याची जळती मशाल! परंतु दुर्दैवाने ते महाराष्ट्रात जन्मले!! ...त्यांच्या अतुल व अमोलिक कृतीला आमच्या कारस्थानीइतिहासकांनी हिडीस स्वरूप दिले व मानभावी इतिहासकारांनी त्याला माना डोलल्या."

संभाजीबद्दलचा हा नव्या नाटककारांचा समर्थपर आवेश उसना होता, हे त्यांच्या नाटयकृतींच्या अवलोकनावरून कळून येणारे आहे. हडपांच्या नाटकामध्ये संभाजी पूर्णपणे कलुषाच्या नादी लागलेला, व्यसनी दाखविला आहे. तुळशीऐवजी हडपांनी या नाटकात 'कमळजा' निर्माण केली असून तिच्या नादी लागलेला संभाजी येसूबाईचा पदोपदी छळ करतो. ह्या छळाची परमावधी होते, तेव्हा शंकराच्या पिंडीतून धूर निघायला लागतो अशा तऱ्हेचा अद्भुत प्रसंग योजून नाटकाला शेवटी कलाटणी दिलेली आहे. 'मराठ्यांचा राजा'मध्ये सारे वातावरणच अनैतिहासिक व कृत्रिम असून संभाजीचे समर्थन अत्यंत हास्यास्पद रीतीने केले आहे. कोठीवाल्यांच्या 'छेडलेला छावा' या नाटकाची हीच अवस्था आहे. संभाजी हा 'तुळशीदास' नव्हता म्हणून इतरांचा उपहास करणाऱ्या नाटककाराने कलुषाचे चित्र रंगविताना 'तो विनोदमूर्ती भांगवाटचा वाटेल' असे धोरण ठेवले आहे, आणि 'ते एक आपले अजब पण तर्कशुद्ध संशोधन आहे, कदाचित त्याला तर्कातीत म्हणूनही मान तुकवावी लागेल' असा अजब कोटीतला युक्तिवाद सादर केला आहे.

एकीकडे गडकरी-औंधकर यांचा विलक्षण प्रभाव आणि दुसरीकडे बेंद्रे यांनी निर्माण केलेली हवा यांच्या कात्रीत ही सारी नाटके सापडलेली आहेत. गडकरी-औंधकर यांच्या प्रभावातून ती काही केल्या सुटत नाहीत आणि बेंद्रे यांच्या समर्थनपर विचारांच्या नादी लागल्यामुळे अनेक हास्यास्पद नव्या गोष्टी हे व यांचे अनुकरण करणारे गिरणगावी नाटककार दाखवीत राहतात.

## टिपणिसांचे निराळेपण

या अनुकरणाच्या कात्रीत न सापडलेले 'शिवाजीला शह' हे टिपणिसांचे नाटक निराळेपणामुळे उठून दिसते. शिवाजी–संभाजी ह्या पितापुत्र-संबंधावर हे नाटक आधारलेले आहे. सुवासिनीवर बलात्कार करणारा संभाजी आणि त्यामुळे व्यथित झालेला शिवाजी, यांच्यातल्या संघर्षामुळे संभाजी आततायीपणाने मोगलांना जाऊन मिळतो, शिवाजी मोगलांवर छापा घालून संभाजीला हस्तगत करतो आणि त्याला म्हणतो, की 'तुझ्याप्रमाणे वडिलांचा राग मीही ओढवून घेतला पण तो सत्यासाठी, स्वराज्यासाठी, पारतंत्र्यातून महाराष्ट्राला मुक्त करण्यासाठी...' वेषांतर, मुसलमानी पात्रांचा गौरव, गौणपात्रांतून प्रेमप्रकरणे उभी करून त्यांतून विनोदनिर्मिती या नेहमीच्या टिपणिशी–वैशिष्ट्याने नाटक युक्त असले, तरी नाटककाराने शिवाजीच्या व्यक्तिमत्त्वाला कुठेही धक्का लागू दिला नाही. शिवाजीच्या व्यक्तिमत्त्वातील उदात्ततेचा संस्कार करावयास टिपणीस चुकत नाहीत. तत्कालीन

रंगभूमीवर परिणामकारक ठरेल असे नाटक लिहावयाचे याखेरीज टिपणिसांचा दुसरा कोणता हेतू दिसत नाही.

## समर्थनात्मक भूमिका

टिपणिसांचा अपवाद सोडला, तर समर्थनाच्या लाटेमध्ये जुने, नवे बहुतेक सारे नाटककार सापडले आहेत असे दिसते. जुन्या नाटककारांपैकी माधव आप्पाजी कामत, ग. कृ. बोडस, श्री. कृ. ओक या नाटककारांनी संभाजीवर समर्थनपर नाटके लिहिली आहेत. त्यातल्या त्यात बोडसांच्या कृतीवर तत्कालीन हिंदुत्वनिष्ठ विचारांची छाप दिसते. इतिहासातील व्यक्तींना हौतात्म्य देण्याची हिंदुत्वनिष्ठांची दृष्टी नाटकाच्या सुरुवातीपासूनच बोडसांनी राबविली आहे. त्यांचा संभाजी पहिल्या अंकापासूनच रंगभूमीवर 'धर्मवीर' म्हणूनच वावरतो ! कामत, बोडस, ओक हे कामगार रंगभूमीचे प्रवर्तक असल्याने त्यांच्यामागून येणाऱ्या गिरणगावी नाटककारांनी आतापर्यंतच्या नाटककारांच्या कृतींच्या अनुकरणातून हाच समर्थनाचा घोशा लावलेला आहे, हे त्यांच्या नाटकांच्या नुसत्या नावांवरूनही लक्षात येण्यासारखे आहे. समर्थनाचा आवेश भरपूर परंतु नाट्यमयता निर्माण करण्यासाठी गडकरी–औंधकर यांचे अंधानुकरण, यापेक्षा निराळ्या शब्दात त्यांचे वर्णन करताच येत नाही. डॉ. बी. एन. सामंत यांचे 'राजनिष्ठा' हे नाटक उदाहरणादाखल याबाबतीत नमूद करता येईल. १९६२ पर्यंतच्या संभाजीविषयक गिरणगावी नाट्यकृतींमध्ये सामंतांचे नाटक बरेच चांगले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जो अशांततेचा डोंब उसळला, त्या वेळी जनतेने आपल्या नेत्यावरील (यशवंतराव चव्हाण) निष्ठा अविचल ठेवली व त्यातूनच महाराष्ट्राच्या ऐक्याचे दीर्घ स्वप्न साकार झाले आणि ही परिस्थिती म्हणजे संभाजीकालीन इतिहासाची पुनरावृत्ती होय असे नाटककाराला वाटते ! संभाजीवर जनतेने अशी निष्ठा ठेवली, हे नाटककाराला नाटकात दाखविता आले नाही, उलट संभाजीच्या व्यसनाधीनतेचे, बदफैलीपणाचे चित्रणच त्याने रंगविले आहे. केवळ नव्या उपलब्ध सामग्रीच्या मागे लागल्याने श्रेष्ठ ऐतिहासिक ललितकृती निर्माण होत नाहीत. त्यासाठी इतिहासकालीन घटनातील नाट्य हेरावे लागते. पाठारे व गडकरी यांनी ते हेरले होते. संभाजीबद्दल नवे सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्यानंतरच्या साऱ्या मराठी कृतींना काही केल्या गडकऱ्यांची चौकट ओलांडता येत नाही, नवी चौकट निर्माण करता येत नाही व नवा आशय भरता येत नाही !

संभाजीवर सारखे कुणीतरी अन्याय करते आहे आणि अन्याय करणारेच कुणी गुन्हेगार आहेत, संभाजी त्यामध्ये कसा धुतल्या तांदळासारखा स्वच्छ आहे, तो उत्कट मनोवृत्तीचा व वयाने लहान असल्यामुळे त्याला इतरांनी नीट समजावून घेणे आवश्यक होते, तसे न करता त्याला सारेच छेडीत बसले, आणि त्यातून पुढचे सारे महाभारत घडले, असा संभाजीविषयक बेंद्रे यांच्या लेखनाचा व त्यावर

आधारलेल्या नाटककारांचा रोख होता. ' छेडलेला छावा ', ' चिडलेला छावा ' ही नाटकांची नुसती नावे पाहिली, तरी संभाजीच्या अल्पवयाची सूचना या नाटककारांना द्यावयाची आहे, हे लक्षात येते. शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीच संभाजीला १७ वर्षे पूर्ण झाली होती आणि शिवाजीच्या मृत्युसमयी तो २३ वर्षांचा होता. इतिहासकाळातील कर्तृत्ववान व्यक्तींचा मागोवा घेतला तर ' छावा ' म्हणून कौतुक करण्यासारखे संभाजीचे वय नव्हते हे लक्षात येईल. शिवाजी, राजाराम, बाजीराव, नानासाहेब, माधवराव यांनी याहीपेक्षा कमी वयात मोठमोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आणि त्या हिकमतीने पार पाडल्या. संभाजीबद्दलच्या अशा कितीतरी अनावश्यक, भाबड्या कल्पना या समर्थनाच्या नादी लागलेल्यांनी प्रसृत करण्यात धन्यता मानली आहे.

## पूर्वग्रहदूषित पाया

१९२५ पासून संभाजीबद्दल जी हवा निर्माण केली होती तिची परिणती १९६० साली प्रसिद्ध झालेल्या ' छत्रपती संभाजी महाराज ' हा चरित्रग्रंथात झाली आणि बेंद्रे यांच्या संशोधनाचा पायाच मुळी किती पूर्वग्रहदूषित अज्ञानमूलक अशा चुकीच्या कल्पनांवर उभा आहे आणि केवळ समर्थनपर प्रवाहात वाहवल्यामुळे एका सामान्य कवीच्या ' अनुपुराण ' नावाच्या काव्यावर अवलंबून बेंद्रे यांनी हा सगळा इमला उभा केला आहे, हे लक्षात आले. हे अनुपुराण देवदत्त नावाच्या परमानंदपुत्राने लिहिले आहे. संभाजीच्या काळात त्याला राजकवी म्हणून प्रतिष्ठा न मिळाल्याने मंत्रिमंडळाबद्दलच्या सूडबुद्धीचे त्याने आपल्या काव्यात जे गरळ ओकले आहे, त्याच्या आधाराने बेंद्रे यांनी एवढा विलक्षण अनैतिहासिक स्वरूपाच्या चरित्रग्रंथाचा इमला उभा केला आहे ! हे काव्य संभाजीची अतिशय उथळ व मिथ्या स्तुती करणारे असून त्या काव्याचा पोकळपणा व खोटेपणा प्रसिद्ध इतिहाससंशोधक त्र्यं. शं. शेजवलकर यांनी उघडकीला आणलेला आहे. इतिहास-संशोधकाची दृष्टी पूर्वग्रहनिरपेक्ष असावी लागते आणि उपलब्ध साधनांचे तारतम्य त्याला सतत असावे लागते. या दोन्ही गोष्टींचा बेंद्रे यांजजवळ संपूर्ण अभाव आहे, हे बेंद्रे यांच्या या संभाजीविषयक ग्रंथाने चांगल्या रीतीने लक्षात आले. तीसच्या सुमारास संभाजीबद्दल हजारो पृष्ठांचा पुरावा असल्याची हवा निर्माण करणारे बेंद्रे साठपर्यंत का थांबले, याचे मर्म पुस्तक वाचल्याबरोबर कळून आले. संभाजीचे समर्थन करण्यासाठी ज्यांना ऐतिहासिक साधने म्हणून कसलीही किंमत नाही, अशा कित्येक गोष्टींची त्यांनी केलेली भरताड पाहून अगदी अपेक्षाभंग होतो. संभाजीवरच्या या समर्थनपर विकृत लेखनाने आपण शिवाजीसारख्या महापुरुषावर कोणता अन्याय करतो आहोत, याचा ते क्षणभरही विचार करीत नाहीत. शेजवलकरांनी लिहिले आहे,

" (बेंद्रयांनी) शिवाजीला, आजच्या राजकारणी भाषेत मटाळलेल्या ब्राह्मणांचा पक्षपाती व प्रधान सरकारकुनांना स्वार्थी, कारस्थानी, राज्यहित न जाणणारे,

लबाड ठरवून कित्येकांना तर नाकर्तेही करून सोडले ! आणि हे सर्व कशासाठी ? तर मत्सरी कवी देवदत्ताप्रमाणे स्वप्नात आणलेला संभाजी सर्वगुणसंपन्न, शिवाजीहून श्रेष्ठ व शहाणा समजून त्याचे चरित्र तद्रूप रंगविण्यासाठी ! इतिहाससंशोधनाची जर हीच फलश्रुती असेल तर त्याला समाजातून हद्दपार करावे लागेल ! पण आज तरी संभाजी 'महान पुण्यश्लोक' म्हणून राजशिक्क्यानिशी इतिहासात प्रस्थापित करण्यात आलेला आहे ! व त्याच्या या नूतन स्थापित स्थानाबद्दल शंका घेणारे 'मिथ्या सत्यापलापी' ठरविण्यात येऊन, त्यांनाच हद्दपार करण्याचा हुकूम सुटला आहे ? कालाय तस्मै नमः दुसरे काय ? येथे मात्र प्रत्यक्ष कलीचा संचार झाल्याचे दृश्य दिसत आहे."

बेंद्रे यांच्या १९२५ पासूनच्या लेखनामुळे संभाजीविषयक नाटके या समर्थन-परतेच्या काळात वहावत गेली आणि बेंद्रे यांचे संभाजीचरित्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यानंतर अलीकडच्या काळातील एक प्रमुख नाटककार श्री. वसंत कानेटकर हे या चरित्रग्रंथामुळेच या प्रवाहात सापडले.

## बेंद्रयांच्या प्रवाहातील नाटककार

कानेटकरांनी बेंद्रे यांचा ग्रंथ प्रमाणभूत मानूनच 'रायगडला जेव्हा जाग येते' हे महत्त्वाचे नाटक लिहिले. या नाटकास त्यांनी जो 'पार्श्वभूमी'दाखल विस्तृत मजकूर लिहिला आहे, त्यामध्ये त्यांनी बेंद्रयांचाच अभिनिवेश दाखविला आहे. संभाजीच्या दुर्वर्तनाबद्दल मराठीतल्या साऱ्या बखरींनी जो भाव व्यक्त केला होता, त्यासंबंधाने बेंद्रे यांनी जी आग पाखडली आहे, तिचाच अनुवाद कानेटकरांनी या 'पार्श्वभूमी'त केला आहे. तसेच बेंद्रे यांच्या चरित्रावर आवळसकरांसारख्या साक्षेपी संशोधकाने जे आक्षेप घेतले होते, त्याबद्दल एखाद्या पट्टीच्या इतिहास-संशोधकाने आपले निर्णायक मत द्यावे, तशा प्रकारची भूमिकाही मांडली आहे. आतापर्यंत मराठीतल्या कोणत्याही नाटककाराने स्वतःची कलावंताची भूमिका विसरून इतक्या अमर्याद रीतीने इतिहास-संशोधनात कानेटकरांइतकी तज्ज्ञपणाची भूमिका घेतली नव्हती ! इतिहास-संशोधनात गती असलेल्या खाडिलकर-केळकरांनी खरेशास्त्र्यांनी प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांचा केवळ हवाला दिला होता. ते त्यांच्या आहारी गेले नव्हते आणि आपणाला काही पट्टीच्या इतिहाससंशोधकांपेक्षा विशेष समजते, असा त्यांच्यात अभिनिवेशही नव्हता. मराठयांच्या इतिहासातील शिवाजीच्या राज्याभिषेकापासून त्याच्या मृत्यूपर्यंतच्या घटना व संभाजीच्या कार-कीर्दीतील शेवटच्या चारपाच वर्षांच्या घटना यांमध्ये बरेच काही 'गूढ' आहे. त्यामध्ये विलक्षण गुंतागुंत आहे. हयातभर संशोधन करूनही या कालखंडातील महत्त्वाच्या घटनांवर प्रकाश पाडण्यात बेंद्रे यांना फारसे यश आले नाही, याचे कारण या काळातील संभाजीच्या दुर्वर्तनाच्या घटनाच इतक्या कटू आणि मनःस्ताप-दायक आहेत, की मराठी बखरींनी व कागदपत्रांनी कर्तव्यबुद्धीने त्यावर मौन

पाळले आहे. संभाजीचे समर्थन करण्याचा कितीही प्रयत्न केला असला, तरी संभाजी मोगलांस जाऊन मिळाला, त्याने कारभारी मारले, तो मोगलांच्या हाती सापडण्यापूर्वी क्षत्रीयास न शोभेल अशा रीतीने तळघरात लपून बसला, तो व्यसनी होता आणि त्याने सुवासिनीवर बलात्कार केला हे सत्य त्यांना लपविता आले नाही; याची ग्वाही इतिहासज्ञ श्री. रा. टिकेकर व शां. वि. आवळसकर यांनी दिली आहे. ' शिवकालीन बाजारगप्पांचा कोश ' संपादण्याचे श्रेय, यापेक्षा बेंद्रयांच्या हाती काहीही लागले नाही, असा या बाबतीत शेवटी टिकेकरांनी निष्कर्ष काढला आहे. हे सारे लक्षात घेतल्यानंतर, इतिहास-संशोधन हा ज्यांचा प्रांत नव्हे व बेंद्रे यांच्या एकमेव चरित्रग्रंथाने प्रेरित होऊन ज्यांनी नाटक लिहिले त्या कानेटकरांनी अशा स्थितीत प्रस्तावनेत इतिहासतज्ज्ञतेची जी ग्वाही दिली आहे व अभिनिवेश आणला आहे तो धाष्टर्याचा वाटतो. ऐतिहासिक ललित-वाङ्मयाला आधार-ग्रंथांची जत्री जोडण्याचे हल्लीचे खूळ याच मासल्याचे आहे

शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळी संभाजीला युवराज म्हणून अभिषेक करण्यात आला नव्हता, मात्र संभाजीची सावत्र आई सोयराबाई हिला पट्टराणी म्हणून अभिषेक करण्यात आला होता, या घटनेत फार मोठा अर्थ आहे. शिवाजीचा राज्यभिषेक वैदिक पद्धतीने झाला आणि शिवाजीने या प्रसंगी धर्माज्ञेचे पुरेपूर पालन करण्याची शपथ घेतली. म्हणूनच संभाजीला ' युवराज ' म्हणून मान्यता देण्यामध्ये बऱ्याच अडचणी होत्या आणि त्या नेमक्या कोणत्या होत्या, याची धर्मग्रंथांच्या अभ्यासाने कल्पना येते. त्यांचा विस्ताराने खल करणे, हे या ठिकाणी अप्रस्तुत ठरेल ! परंतु शिवाजीनंतर संभाजीने गादीवर येण्यात प्रधानमंडळाचा जो विरोध होता, त्याला धर्मग्रंथांची मान्यता होती, तशा त्यांनी शपथा घेतल्या होत्या म्हणून ते विरोध करीत होते, एवढेच येथे लक्षात ठेवणे जरूर आहे.

वर उल्लेखिलेल्या संभाजीच्या दुर्वर्तनाचे व संभाजीनेच शिवाजीवर विषप्रयोग केला असल्याचे इंग्रजांच्या कागदपत्रातील उल्लेख, बेंद्रे यांनीच आपल्या चरित्रात सादर केले आहेत (पृ. ११७). ज्या ' अनुपुराणा 'वरून बेंद्रे यांनी संभाजीच्या श्रेष्ठतेचा इमला उभा केला आहे, त्याच अनुपुराणात संभाजीची स्वतंत्र राज्य-प्रस्थापनेची प्रौढी व स्वतःच्या पित्याला लवकर मरण यावे, यासाठी कलुषाच्या साहाय्याने तंत्रपद्धतीने त्याने केलेला यज्ञयाग यांची माहिती दिली आहे. त्यामुळे संभाजीबद्दलच्या बखरींतील उल्लेखांबद्दल आग पाखडण्यात काही अर्थ नाही. संभाजीच्या पराक्रमाबद्दल मराठीतल्या कोणत्याही इतिहासकाराने दुमत व्यक्त केलेले नाही, हेही लक्षात घेण्याजोगे आहे. त्यामुळे कानेटकरांनी आपल्या नाट-कांच्या प्रस्तावनांतून इतिहासकाराविरुद्ध जो कांगावा केला आहे, तो काल्पनिक म्हणावा लागेल.

## मर्यादित अनुभवविश्व

ऐतिहासिक कागदपत्रांचे तारतम्य नसणे हा दोष नाटककाराच्या दृष्टीने क्षम्य असतो, परंतु आपली मर्यादा ओळखून त्याने आपल्या इतिहासज्ञानाबद्दल मोठी शेखी मिरवू नये, ही त्याच्यावर मोठी जबाबदारी असते. कानेटकर ही जबाबदारी ओळखत नाहीत ही गोष्ट क्षणभर दूर सारून, कलावंत म्हणून पितापुत्रसंबंधांचे, इतिहासकाळातील शिवाजीसंभाजीसारख्या लोकोत्तर पुरुषांची मने व्यक्त करण्याचे कलात्मक सामर्थ्य कानेटकरांजवळ कितपत आहे याचा विचार केला तर, जे काही हाती लागते ते फारसे समाधानकारक नाही. कानेटकरांच्या प्रतिभाशक्तीने या बाबतीत अतीव भाबडेपणाखेरीज दुसरे काही साध्य केले नाही ! थोर पुरुषांच्या कर्तृत्वाला नियतीने दिलेला एक मोठा शाप असतो. त्यांच्या थोरपणामुळे त्यांच्यामध्ये पुत्राबद्दल एक विलक्षण गूढ अशी अढी असते. ती भाबडेपणाने त्यांना शब्दाने व्यक्त करता येत नाही आणि तितक्याच धीरोदात्तपणे ती हे सहन करीत जातात. या विलक्षण चमत्कारिक मानसिक कोंडीचे चित्रण करण्यात मानवी जीवनातील शोकनाट्य हेरण्याची प्रतिभावंताजवळ असाधारण ताकद हवी. अशी ताकद रामायण-महाभारतांसारख्या महाकाव्यांमध्ये, शेक्सपियरसारख्या कलावंतांमध्येच असू शकते. रामायणामधील रामाचे, महाभारतामधील युधिष्ठिराचे मन या पातळीवरून व्यक्त झाले आहे. त्यामध्ये यत्किंचितही भाबडेपणा नाही. आहे तो मन अस्वस्थ करणारा खराखुरा जीवनानुभव. अलीकडच्या काळात टिळक व गांधी यांच्या पुत्रांच्या बाबतीत हाच प्रकार घडून आला. साऱ्या जगाला पालाण घालू शकणारे टिळक व गांधी आपल्या मुलांच्या बाबतीत असमर्थ, दुबळे ठरले. मुलांच्या बाबतीत त्यांनी धारण केलेला कठोरपणा हा त्यांना स्वतःला अतीव मनस्तापदायक होता, पण या कठोरपणातच त्यांचे अलौकिकत्व होते व लौकिकत्वही होते ! हा अनुभवच असा काही विलक्षण गूढ आहे, की टिळक-गांधी यांच्या चरित्रकारांना त्याची संगती लावता आली नाही आणि मराठीतल्या कोणत्याही कलावंताला कलात्मक पातळीवर नेऊन तो व्यक्त करता आला नाही. हा पितापुत्र-संबंधातला अनुभव व्यक्त करताना त्यातल्या मूलभूत जीवनानुभवाला कानेटकर स्पर्श करू शकले नाहीत. एखाद्या मध्यमवर्गीय माणसाच्या पातळीवरून तो व्यक्त झाला आहे. शिवाजीसारख्या लोकोत्तर पुरुषाची पातळी त्याला प्राप्त होऊ शकली नाही. कानेटकरांच्या नाटकातला शिवाजी, वय झाल्यानंतर एखादी सामान्य व्यक्ती सारखी ज्याप्रमाणे भडाभडा बोलत जाते, त्याप्रमाणे भाबडेपणाने बोलत जातो आणि या भाबडेपणामुळे त्याच्या तोंडून जी असहाय्यता व्यक्त होते, ती अती सामान्य माणसाची वाटते. शिवाजीसारख्या लोकोत्तर विभूतीचे त्यामुळे विडंबन होते. मराठी माणसाचे अनुभवविश्व अत्यंत मर्यादित असल्याची जाणीव येथे त्यामुळे येते. मराठी नाटक जर कुठे थिटे असेल तर ते येथे, असे म्हणावे लागते. शिवाजी-संभाजी किंवा संभाजी-राजाराम यांची मने साकारताना ती नागेश जोशीं-

सारख्या नाटककाराने लिहिलेल्या ' देवमाणूस ' मधील अतिरिक्त भावविवशतेच्या पातळीवर जावी, हे मराठी नाट्यवाङ्मयाचे दुर्दैव होय. शिवाजीसारखे लोकोत्तर व्यक्तिमत्त्व सदैव त्याच्या सामान्य हालचालींतून, घरगुती प्रसंगांतूनही तितकेच उंच राहिले पाहिजे. शिवाजीला कोत्या मनोवृत्तीचा, भाबडा व दुबळा दाखवून कानेटकरांनी कलेच्या दृष्टीने स्वतःच्या मर्यादाच दाखविल्या आहेत. कलात्मकतेचा व तटस्थतेचा अभाव, हा या कलाकृतीतील मोठा दोष होय.

अलीकडच्या नाटककारांत कानेटकरांचे स्थान मोठे आहे. विशेषतः ऐतिहासिक नाट्यवाङ्मयाच्या क्षेत्रात एक नवे चैतन्य निर्माण करण्याचे त्यांचे सामर्थ्य कोणालाही नाकारता येणार नाही. त्यांच्या रंगभूमीच्या जाणीवा बऱ्याच तीव्र आहेत आणि म्हणूनच त्यांच्या संवादांना, त्यांच्या संविधानकतेला नाट्यमयतेचे मोठे वरदान आहे. मनोविश्लेषणाच्या नव्या तंत्राचा अवलंब करून जीवनाचा वेध घेण्याची त्यांची धडपड त्यांच्या नाटचकृतीला चांगलेच सामर्थ्य प्राप्त करून देते. परंतु त्यांच्या कृतीतून जीवनविषयक जाणीवा जितक्या सखोलतेने व्यक्त व्हायला हव्यात तितक्या सखोलतेने त्या व्यक्त होताना दिसत नाहीत. आधुनिक तंत्राचा, मनोविश्लेषणाचा वापर करूनही जीवनविषयक अनेक प्रकारच्या सखोलतेचा साक्षात्कार घडवून आणण्याच्या सामर्थ्यापासून त्यांच्या कलाकृती वंचित राहिल्या आहेत. असे सामर्थ्य त्यांजपाशी नक्कीच आहे, परंतु नाटक हटकून यशस्वी होण्यासाठी मराठी रंगभूमीवर ज्या अकलात्मक पद्धती राबविल्या जातात, त्यांच्या ते आहारी जातात. ' रायगडला जेव्हा जाग येते ' हे नाटकही म्हणूनच एकपदरी, एकपरिणामी वाटते.

## ओशाळला मृत्यू : हरवलेला संघर्ष

शोकनाट्य म्हणून, हा पिता-पुत्रसंबंध आणि संभाजीची शिवाजीच्या निधनानंतरची कारकीर्द यांमध्ये इतके मोठे सामर्थ्य आहे, की ते ओळखण्याची कानेटकरांनी खरीखुरी धडपड करावयास हवी होती. पण तसे न करता त्यांनी संभाजीविषयक समर्थनाचा एकच एक धोशा लावला. त्याचे परिणाम त्यांच्या पुढच्या ' इथे ओशाळला मृत्यू ' या कृतीमध्ये दिसून आले. ' हिंदवी स्वराज्य आणि मोगल ' या आपल्या ग्रंथामध्ये सेतुमाधव पगडी यांनी संभाजीच्या कारकीर्दीबद्दल जी काही तुटपुंजी मोगल साधने निर्देशिली, त्यांच्या आधाराने कानेटकरांनी ही कृती निर्मिलेली आहे. एकच एका इतिहासकारावर अवलंबून राहून त्याच्या आशयाच्या बाहेर कलात्मकतेची झेप घेता न येण्याची कानेटकरांची प्रकृती येथेही लक्षात येते ! या नाटकाचा रोख संभाजी-औरंगजेब संबंधावर आहे आणि तसाच तो संपूर्णपणे असावयास हवा होता. परंतु संभाजीच्या समर्थनाबद्दलचे भूत मानगुटीवर बसल्याने अनेक प्रकाराने या कलाकृतीचा तोल त्यांनी आपण होऊन बिघडविला आहे. औरंगजबाचे चित्र सतत उपरोधाच्या पातळीवर त्यांनी ठेवले आहे आणि

तेही नाटकी आणि एकसूरी ठेवले आहे. औरंगजेबाच्या उपरोधी स्वभावापेक्षा औरंगजेबालाच उपरोधाच्या धारेवर धरल्याने त्याच्या व्यक्तिचित्रणातले सामर्थ्यच हरवून गेले आहे. औरंगजेब व मौलवीजी यांच्या चित्रणातील नाटकीपणा आणि सेनापतीशी बोलताना उपरोधाने औरंगजेबाने त्याच्या द्रोहाची काढलेली लक्तरे यांमधील पुनरुक्ती आणि भडकपणा हा टिपणीसयुगाची आठवण करून देतो. संभाजीबद्दलचे समर्थन तर या नाटकात इतक्या चमत्कारिक पातळीवर गेले आहे, की खुद्द येसूबाई संभाजीबद्दल आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीला त्याचे वकीलपत्र घेतल्या-प्रमाणे धारेवर धरतें! संभाजीला मोठे करण्यासाठी औरंगजेबाचे चित्र शक्य तितके उपहासास्पद करण्याच्या भरात संभाजीचे औरंगजेबाच्या दरबारातील वागणे कमालीचे नाटकी झाले आहे. औरंगजेबाची बाजू दुबळी झाली आहे आणि खुद्द येसूबाईनेच संभाजीचे वकीलपत्र घेतल्यामुळे नाटकामधला संघर्षच हरवला आहे, याची नाटककारास जाणीव राहिलेली नाही! संभाजीची रसिकता येसूबाईच्या संमतीनेच राजरोसपणे प्रकटत आहे, एवढेच सांगून नाटककाराचे समाधान होत नाही तर त्याच्या औदार्याचा प्रभाव दाखविण्यासाठी तो म्हाताऱ्या बायांनाही गळ्यातील माळा वाटीत सुटला आहे, येथपर्यंत त्याने आपली कल्पना-शक्ती ताणली आहे! समर्थनाच्या भरात इतकी अकलात्मक वृत्ती गिरणगावी नाटककारांनीही दाखविली नसेल! भाषेच्या बाबतीतही त्यांचा असाच तोल सुटला आहे. पहिल्या नाटकामध्ये उर्दू किंवा मराठमोळ्या शब्दांचा मार्मिक उपयोग करून ऐतिहासिक वातावरण निर्माण करण्यामध्ये त्यांना यश आले होते, परंतु या दुसऱ्या नाटकात उर्दू शब्दांचा वापर अतिरेकी ठरला आहे. पात्रांच्या तोंडी जड-जंबाल उर्दू शब्द वापरून त्यांच्याच तोंडून त्यांची भाषांतरे वदविण्याची कल्पना यापूर्वी कोणत्याच नाटककाराला सुचली नव्हती!

बेंद्रे यांच्या 'संभाजी'चे तज्ज्ञपणाने परीक्षण करणाऱ्या शेजवलकरांनी कानेटकरांच्या नावाचा निर्देश न करताही, त्यांच्या 'रायगडा'ची खालीलप्रमाणे संभावना केली आहे.

> "अत्याधुनिक नाटककार मानसशास्त्राचा कापूस पिंजून संभाजीच्या अंतर्मनाचा ठाव घेऊ पाहात आहेत, ते तर शुद्ध कल्पनाजाल आहे. ऐति-हासिक शक्यता व सत्यता त्यात कोठे उमटलेली दिसत नाही. नाटकातील खोटे काल्पनिक प्रवेश निर्माण करून त्यात तितक्याच काल्पनिक संवादांचा मालमसाला भरून एतिहासिक व्यक्ती समाजापुढे मांडणे गैर आहे, असे आम्हास वाटतें. यात बऱ्या व्यक्तींना अलौकिक गुण चिकटविण्यात येतात व वाईट (खल) माणसाची प्रमाणाबाहेर बदनामी करण्यात येते. नाटकापासून प्रेक्षक काय अपेक्षितात तो त्यांचा प्रश्न पण इतिहासाची ही अक्षम्य विकृती व हानी आहे असे आम्हास वाटते."

शेजवलकरांचा हा अभिप्राय कानटकरांच्या दुसऱ्या ऐतिहासिक नाटकालाही तितक्याच यथार्थतेने लागू पडतो.

कानेटकरांसारख्या नाटककारांचे प्रायोगिक यश मोठे आहे. परंतु केवळ त्याच्यावरच समाधान मानून चालण्यासारखे नाही. टिपणीसयुगातील नाटकांचेही प्रायोगिक यश काही दुर्लक्षिण्यासारखे नव्हते. परंतु ती नाटके आज कोठे आहेत ? सुदैवाने दोन-तीन नाटकांनंतरच आपल्या मर्यादांची जाण कानेटकरांना आलेली दिसते. तिसऱ्या नाटकामध्ये त्यांनी इतिहासकाराची भूमिका घेतली नव्हती ती या जाणिवे-पोटी. तीन नाटकांनंतर त्यांनी ऐतिहासिक नाट्यलेखनाच्या विरामाची भाषा काढली ती उद्वेगापोटी. हा उद्वेग इतिहास व ऐतिहासिक ललितकृती यांच्याबद्दलच्या चुकीच्या कल्पनेमुळे त्यांच्या वाट्याला आला ! आपण नाटककार आहोत, इतिहास-कार नव्हे, हे त्यांच्या लक्षात वेळीच आले ते बरे झाले ! आता नाटककाराच्या विशुद्ध भूमिकेतून त्यांनी ऐतिहासिक नाट्यलेखनाकडे वळले पाहिजे !

प्रायोगिक दृष्ट्या यशस्वी झालेल्या नाटकांचे उदंड अनुकरण होते, या आज-पर्यंतच्या रिवाजास अनुसरून कानेटकरांच्या ' रायगड 'चे पुष्कळ अनुकरण झाले. गिरणगावी नाटककारांनी ते केले हे साहजिकच होते. परंतु इतर अनेक होतकरू नाटककारांनाही त्यांचा कित्ता गिरविला आहे. सीमा साखरे यांच्या नाटकाकडे त्या दृष्टीने बोट दाखविता येईल. संताजी-धनाजी संबंधावर आधारलेल्या दत्ता कदम यांच्या ' सह्याद्रीचे सोने ' या नाटकातही हे अनुकरण जाणवते. अर्थातच ही सारी नाटके स्थूल, बटबटीत अशी आहेत.

संभाजीच्या जीवनातील शोकनाट्य हेरण्याचा प्रयत्न, एक गडकऱ्यांचा अपवाद वगळता कलात्मक पातळीवर गेला नाही. गडकरी-युगानंतरच्या मराठी नाट्य-वाङ्मयाची ही शोकांतिका मोठी विचारप्रवर्तक आहे !

**[ भीमराव कुलकर्णी यांनी लिहिलेल्या ' मराठी ऐतिहासिक नाटके ' या प्रबंधातील ' संभाजी 'वरील नाटकांचे एक चिकित्सक विवेचन. ]**



# मेजर विल्यम मार्टीन छे:???



**दुसऱ्या महायुद्धातील एक सत्यकथा**

**लेखक : इ. इ. एस. मॉंटेग**

**अनुवाद : विजय वैद्य**

अटलांटिक महासागरातील जिब्राल्टरच्या वायव्येला १३० मैलांवर हुललवा नावाचे एक छोटे शहर आहे. स्पेनच्या किनारपट्टीवर असलेल्या या शहरातील एका स्मशानभूमीत एक ब्रिटिश प्रजाजन चिरनिद्रा घेत आहे.

१९४२ सालच्या एका हिवाळी संध्याकाळी सर्वत्र दाट धुकं पडलेलं होतं. हवा सर्दच होती. याच संध्याकाळी तो न्युमोनियानं मेला. स्वच्छ सूर्यप्रकाशात तळपणाऱ्या स्पेनमध्ये आपलं दफन होईल अशी पुसटशी कल्पनाही बिचाऱ्याला मृत्युसमयी नव्हती. जिवंतपणी त्याने मातृभूमीची काहीही खास सेवा केलेली नव्हती, पण मृत्यूनंतर त्याने जी कामगिरी बजावली त्याला क्वचितच तोड सापडेल. त्याच्या कामगिरीमुळे हजारो दोस्तराष्ट्र-सैनिकांचे प्राण वाचले.

सन १९४२ च्या हिवाळ्यात दोस्त-फौजेने मारलेली उत्तर आफ्रिकेतील आक्रमक मुसंडी वेगाने विजयाकडे झुकत चालली होती. पुढील हमला सिसिलीवर करा-

यचा असे साधारणपणे ठरले होते. जर्मनांनाही याची कल्पना होती. पण असा हल्ला सिसिलीवर होणार नाही ही गोष्ट जर्मन सेनापतींच्या व पर्यायाने हिटलरच्या मनावर बिंबवून, सिसिलीतील जर्मन सैन्य इतरत्र हलविण्यासाठी काही तरी करणे आवश्यक होते. असे होते तरच सिसिलीवरील मोहीम फत्ते होणार होती. पण हे साधायचे कसे हा एक मोठा प्रश्न होता.

नाविकदल गुप्तहेर खात्याच्या एका अधिकाऱ्याने एक सूचना विचारासाठी पुढे मांडली. स्पेनच्या किनाऱ्यापासून ते उत्तर आफ्रिकेपर्यंत ब्रिटिश टेहळणी विमाने सारखी उडत असतात याची जर्मनांना पूर्ण माहिती होती. तेव्हा स्पेनच्या किनाऱ्याजवळ एखाद्या शाही विमानदळाच्या विमानाला अपघात झाल्याचा बनाव करून हे साधता येणे शक्य होते. योजनेचा आणखी भाग असा, की अगोदरच मेलेली व्यक्ती 'त्या अपघातात बुडून मेली' असे दाखवायचे आणि त्या व्यक्तीकडे असलेले खोटे कागद पत्र खरे असल्याचा आभास निर्माण करून स्पेनच्या किनाऱ्यावर हेरगिरी करणाऱ्या जर्मन हेरांच्या हाती ती कागदपत्रे पडतील अशी व्यवस्था करायची. यामुळेच कदाचित शत्रूची गफलत होऊन त्याचे लक्ष सिसिलीकडून दुसरीकडे वेधता आले असते आणि सिसिलीची मोहीम दोस्त-राष्ट्रांना फते करता आली असती. पण हे करण्यात एक व्यवहारिक अडचण येणार होती. मृतव्यक्ती श्वासोश्वास करीत नसल्याने समुद्रात प्रेत सोडले असता त्याच्या फुफ्फुसात पाणी गेले नसते. शवविच्छेदनप्रसंगी भांडे फुटण्याची शक्यता होती.

दुसऱ्याच काहीतरी कारणाने मेलेल्या पण बुडून मेल्याप्रमाणे फुफ्फुसात पाणी असू शकेल असे एखादे प्रेत मिळू शकेल का याबाबत अत्यंत गुप्तपणे सेनादलांच्या वैद्यकीय विभागाकडे चौकशी सुरू झाली. शेवटी एका ठिकाणाहून हवा तसा अह-वाल आला. ही व्यक्ती नुकतीच न्युमोनियाने मेली होती आणि न्युमोनियामुळे फुफ्फुसात पाण्यासारखा द्रव होता. मृत व्यक्ती तीस एक वर्षांची होती. तिच्या नातेवाईकांना गाठण्यात आले. योजनेबद्दल त्यांना काही एक पत्ता लागू न देता ते प्रेत ताब्यात घेण्यात आले. त्यासंबंधी कुठेही काहीही बोलायचे नाही असे त्यांच्या-कडून वचन घेण्यात आले होते.

आता ती एक सामान्य मृत व्यक्ती 'शाही नौदलातील मेजर विल्यम मार्टिन' झाली. योजनेचा पूर्ण तपशील ठरेपर्यंत मार्टिनला शीतगृहात ठेवण्यात आले.

मेजर मार्टिन जी कागदपत्रे घेऊन 'जाणार होता' ती वरच्या पातळीवरूनच मिळवायची असे ठरले. ब्रिगेडियरच्याही वरच्या अधिकाऱ्याने तशाच वरच्या अधि-काऱ्याला लिहिलेली पत्रे मिळविण्याचे प्रयत्न सुरू झाले. इंपीरियल जनरल स्टाफचे उपप्रमुख लेफ्टनंट जनरल सर 'आर्चिबॉल्डने' यांनी उत्तर आफ्रिकेतील १८ व्या भूदल विभागाचे प्रमुख, जनरल अलेक्झांडर यांना लिहिलेले पत्र मिळवायचे असे

ठरले. जनरल 'ने' यांची मान्यता मिळविण्यात आली. 'ऑफ द रेकॉर्ड' असलेल्या पत्रात जनरल ने यांनी जनरल अलेक्झांडर यांना स्पष्टीकरण पाठविले होते. स्पष्टीकरण असे होते, की पश्चिम भूमध्य सागरातील पुढील हल्ला हा सिसिलीव होणार नसल्यानेच सिसिलीवरील हल्ल्याच्या तयारीसाठी जनरल अलेक्झांडर यां हवी असलेली सामग्री मिळत नव्हती व मिळणारही नव्हती.

भूमध्य समुद्रातील पुढील हल्ल्याचे एक लक्ष ग्रीस आणि दुसरे लक्ष त्यात स्पष्ट करता ते पश्चिम भूमध्य समुद्रातच कुठेतरी असेल असा उल्लेख त्याच पत्रा अत्यंत खुबीने करण्यात आला होता. पत्रात दुसरी एक गोष्ट स्पष्ट करण्यात आल होती ती अशी, की जर्मन्सना आपण सिसिलीवर हल्ला करणार असल्याचे वाट असले, तरी त्यांना तशाच भ्रमात ठेवून आपण हल्ला पश्चिम भूमध्य सागरा दुसऱ्याच ठिकाणी करणार आहोत आणि जर्मन्सना आमला हल्ला सिसिलीवर होणार आहे असे वाटण्यासाठीच सिसिलीजवळ आपण काही हालचाली करी आहोत असेही त्यात म्हटले होते.

याच पत्रासोबत लॉर्ड लुई माउंटबॅटन यांनी भूमध्य सागरातील शाही नौद काफिल्याचे प्रमुख ॲडमिरल सर ॲन्ड्र्यू कनिंगहॅम यांना पाठविलेल्या पत्रकाचाह समावेश करायचा असे ठरले. या पत्रकात लॉर्ड माउंटबॅटन यांनी मेजर मार्टिनच्या मोहिमेचा खुलासा केला होता आणि पुढे म्हटले होते--

" मार्टिन हा माणूस अगदी आपल्याला मोहिमेसाठी हवा तसाच आहे..... लक्षावरील हल्ला पूर्ण होताच कृपया त्याला तात्काळ परत पाठवा. येथे सध्य सार्डिन्स (एक प्रकारचे मासे) फारच कमी मिळतात. कदाचित मार्टिन पर येताना माझ्यासाठी थोडे सार्डिन्स आणील.'

यात थोड्याशा गमतीबरोबरच सार्डिन्सवरून पश्चिम भूमध्य समुद्रातील द हल्ला सार्डिनियावर होईल अशी जर्मन्सची खात्री पटावी असाही प्रयत्न होता. आत मेजर मार्टिनचे ओळखपत्र, त्याचे छायाचित्र वगैरे तयार करायचे होते. त्याच चेहरा मृत्युसमयी असा काही झाला होता, की ओळखपत्रासाठी त्याचा फोटो घे शक्य नव्हते पण थोड्याच दिवसांत हा प्रश्नही सुटला. मार्टिनप्रमाणे दिसणार एक माणूस मिळाला व त्याचा फोटो घेण्यात आला.

पुढील भाग मेजरचे व्यक्तिमत्त्व दर्शवील असा काही पुरावा तयार करण्याच होता. तो तरुण बुद्धिमान आणि समुद्रमार्गे लॅंडिंगक्राफ्टच्या सहाय्याने जमिनीव सैन्य उतरवण्याच्या डावपेचात तज्ज्ञ असल्याचे व म्हणूनच त्याला उत्तर आफ्रिके कडे हवाई मार्गे पाठविण्यात येत असल्याचा पुरावा उभारण्यात आला. मार्टि थोडा उधळ्या होता हे दाखविण्यासाठी त्याच्या खिशात, १४ एप्रिल १९४३ ही तारीख असलेले आणि लॉइड्स् बँकेच्या मुख्य कार्यालयाकडून आलेले एक प ठेवण्यात आले. या पत्रात त्याने या बँकेकडून घेतलेल्या ८० पौंडांच्या ओव्ह

ड्रॉफ्टचे पैसे परत करण्याबद्दल लिहिले होते.

जवळजवळ प्रत्येक तरुण लष्करी अधिकाऱ्याचे काहीना काही गोड गुपित असतेच आणि साहजिकच मेजर मार्टिनही अलीकडेच पाम नावाच्या एका गोड पोरीच्या प्रेमात पडला होता. तेव्हा तिचा फोटो आणि तिची दोन पत्रे मेजरच्या पर्समध्ये ठेवण्यात आली. पत्रं ठेवण्याआधी एक खबरदारी घेण्यात आली होती. त्याने त्या पत्रांची अनेक पारायणे केली होती, असे दर्शविण्याकरिता त्या पत्रांच्या घड्या करणे पुन्हा त्या उघडणे पुन्हा घड्या करणे असे करण्यात आले. त्याचा पाम-बरोबर वाङ्निश्चय झाला असल्यानेच कदाचित त्याच्यावर ओव्हरड्राफ्ट काढण्याची पाळी आली असावी, हे दाखविण्यासाठी त्याने तिला वाङ्निश्चयाची अंगठी घेतल्याची ५३ पौंडांची पावतीही पर्समध्ये ठेवली गेली होती.

याशिवाय त्याचे घड्याळ, त्याच्या गळ्यातील ओळख पटविणारा बिल्ला, सिगरेट्स्, बसची जुनी तिकिटे, इतर काही कागदपत्रे आणि ' स्ट्राइक ए न्यू नोट ' सिनेमाची दोन तिकिटे एवढा मालमसाला त्याच्याकडे देण्यात आला. इंग्लंड सोडण्याच्या आदल्या रात्रीच तो आपल्या वाग्दत्तवधूबरोबर सिनेमाला जाणार असल्याचे ती दोन तिकिटे सांगत होती.

आता सारी तयारी पूर्ण झाली होती.

स्पेनच्या नैऋत्य किनाऱ्यावरील हुलवा या एका छोट्या बंदराच्या जवळपास त्याचे शव सोडायचे असे ठरले. शव किनाऱ्याला लागताच स्पॅनिश लोकांनी पुरण्यासाठी ते ब्रिटिश उप-दूतावासाच्या हवाली केले असते यात शंकाच नव्हती. पण त्या आधीच एखादा स्थानिक जर्मन हेर शवावरोबरील कागदपत्रांची टिपणे जरूर काढून घेईल अशी खात्री होतीच. आणि झालेही तसेच.

हुलवा येथे शव समुद्रात सोडण्यासाठी पाणबुडीतून ते तेथे नेणे आवश्यक होते आणि लेफ्टनंट ज्युवेल याच्या अधिपत्याखाली 'सेरफ' नावाची एक पाणबुडी माल्टाकडेच निघाली होती. लेफ्टनंट ज्युवेल आपल्या कामात तरबेज होता. १९४३ साली जनरल मार्क क्लार्क याला त्याने गुप्तपणे उत्तर आफ्रिकेत नेले होते व तेथून माघारी आणले होते.

फ्रेंच जनरल जिराद् यालाही फ्रान्समधून पाणबुडीच्या साहाय्याने निसटायला त्यानेच मदत केली होती.

स्पेनच्या किनाऱ्याजवळचे हवामान साथ देणारे होते. वाराही किनाऱ्याच्याच दिशेने वहात होता.

प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांच्या कानांवर ही योजना घालण्यात आली. जर्मन्सना जर यात खोटेपणाचा वास आला, तर दोस्तराष्ट्रांचा रोख सिसिलीवरच असल्याची त्यांची पक्की खात्री होईल याची त्यांना स्पष्ट जाणीव करून देण्यात आली. पंतप्रधानांनी योजनेस मान्यता दिली. सिसिलीवरील सल्ल्याची सारी सूत्रे

हाती असलेल्या जनरल आयसेनहावर यांना हा बेत तात्काळ कळविला जावा अशी त्यांनी आज्ञा केली.

१९ एप्रिल १९४३ या दिवशी संध्याकाळी ६ वाजता सेरफने ब्रिटनचा किनारा सोडला. मेजर मार्टिन अर्थातच पाणबुडीत होता. सहा फुटांच्या एका मोठ्या नळकांड्यातील ड्राय आईसच्या थरात तो निपचित पडून राहिला होता.

दहा दिवसांच्या सफरीत सेरफ फक्त रात्रीच डोके वर काढीत असे. ३० एप्रिलच्या दिवशी ती हुलवापासून अवघी १६०० यार्डांवर होती. ठरलेल्या दिवशी आणि कोणाच्याही दृष्टीस न पडता ती तिथे पोचली होती. पहाटे साडेचार वाजता मेजर मार्टिनला फार मोठ्या कामगिरीवर पाठविण्यासाठी अलगद पाण्यात ढकलण्यात आले. कमांडर ज्युवेल व त्याचे चार तरुण अधिकारी यांनी ही कामगिरी पार पाडली. त्यांनीच मेजरला सलाम ठोकला आणि लेफ्टनंट ज्युवेलने प्रार्थना म्हटली.

विमान अपघात झाला असल्याचा पुरावा उभारण्याठी त्या जागेपासून सुमारे अर्ध्या मैलावर विमानातील काही वस्तू फेकण्यास सेरफचा कमांडर विसरला नाही.

३० एप्रिल रोजी उजाडतच किनाऱ्याकडे येणारे ते शव एका स्पॅनिश कोळयाच्या नजरेला पडले. स्पॅनिश अधिकाऱ्यांनी शवाचा ताबा घेतला आणि शवविच्छेदनही पार पडले. पाण्यात बुडाल्याने गुदमरून मृत्यू आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

यासंबंधी ब्रिटिश-दूतावासाच्या प्रमुखाला कळविण्यात येऊन मेजर मार्टिनचे शव दफनविधीसाठी २ मे रोजी त्याच्या हवाली करण्यात आले.

शव देण्यात आले, पण मेजरकडे असलेल्या कागदपत्रांबाबत स्पॅनिश अधिकाऱ्यांनी काहीच सांगितले नाही. म्हणून ४ मे रोजी तेथील उप-दूतावास प्रमुखाला तातडीने व अत्यंत गुप्त असा संदेश पाठविण्यात आला. मेजर मार्टिनकडे काही अत्यंत महत्त्वाची व गुप्त कागदपत्रे असल्याचे नौदल विभागाकडे आलेल्या माहितीवरून दिसते, तेव्हा औपचारिकपणे स्पॅनिश अधिकाऱ्यांकडे त्यांची मागणी केली जावी असे त्या संदेशात म्हटले होते.

हुलवामधील जर्मन हेराने आपले काम चोख बजावले. त्याला त्या कागदपत्रांचा सुगावा लागून ती कुठे चालली होती त्याची बातमी लागली. त्याने यासंबंधी आपल्या वरिष्ठांना जागे केले. पुढील काही घटनांवरून तें कालांतराने सिद्ध झाले. ३० मे १९४३ रोजी स्पॅनिश नौदल प्रमुखाने ती सारी कागदपत्रे 'सुरक्षितपणे' ब्रिटिश उप-दूतावासातील अधिकाऱ्यांच्या हवाली केली.

मेजर मार्टिनच्या थडग्याजवळ त्याची माहिती असणारा शिलालेख ठेवला जावा असे ठरले. तो आजही त्या जागी आहे. (पामने अर्थातच एक पुष्पचक्र पाठवून दिले.) ४ जून १९४३ च्या 'द टाइम्स'मध्ये तो धारातीर्थी पडल्याबद्दल मृतांच्या

यादीत त्याचे नाव झळकले.

जुलैमध्ये सिसिलीवरील स्वारीत दोस्त राष्ट्रांना जे यश मिळाले त्यावरून योजना यशस्वी पार पडल्याचे प्रथम दिसून आले पण त्यानंतर पकडलेल्या सैनिकांकडे मिळालेल्या कागदपत्रांवरून तर यासंबंधी चांगलाच पुरावा मिळाला.

जर्मन नौदलाच्या कागदपत्रांचे जे दप्तर ब्रिटिश नौदल गुप्तहेर विभागाच्या हाती पडले, त्याची युद्धानंतर कसून छाननी चालली होती. ती करणारा त्या खात्याचा एक अधिकारी चिंताग्रस्त स्वरात आपल्या वरिष्ठाला म्हणाला, 'महाशय, आपल्या एका अत्यंत वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याने आडमार्गाने पाठवलेली अत्यंत गुप्त व महत्त्वाची कागदपत्रे जर्मनांच्या हाती पडल्याचे दिसते. ती कागदपत्रे मेजर मार्टिनकडीलच होती यात शंकाच नव्हती. त्या कागदपत्रांची छायाचित्रे घेण्यात आली होती व त्यांचे जर्मनमधील भाषांतर आणि गुप्तहेराचा अहवाल एवढी सारी माहिती वरील छाननीत मिळाली. या सर्वांची एक फाईल करून ती जर्मन दर्यासारंग कार्ल डोनिझ याच्याकडे पाठविण्यात आली होती.

मार्टिनचे शव किनाऱ्याला लागल्यानंतरच्या १४ व्या दिवशी जर्मन नेव्हल स्टाफ डायरीत जो मजकूर लिहिला गेला त्यावरून असे दिसते, की ती कागदपत्रे अस्सल असल्याची त्यांची खात्रीच पटली होती आणि दोस्तराष्ट्रांचा मुख्य हमला सिसिलीवर न येता सार्डिनिया येथेच येणार व ग्रीसचा सैन्य उतरवण्यासाठीच वापर केला जाणार असाच पक्का ग्रह झाला होता हे अगदी निर्विवादच होते.

मेजर मार्टिनकडे असलेल्या कागदपत्रांत उल्लेख केलेल्या केप ॲराक्षोक्स व कालमाता या किनाऱ्यांचे रक्षण करण्याकरिता जर्मनांनी फ्रान्समधील त्यांचे 'पँझर'चे चिलखती दळ हलवून ते ग्रीसमधील पेलोपोनसस् येथे नेले. यामुळे हे दळ फार काळपर्यंत वापर न होता सुस्त पडून राहिले. जर्मन हायकमांडरने ग्रीसच्या किनाऱ्याच्या आसपास सुरुंग पेरायची तसेच किनाऱ्यावरील तोफखाना जय्यत तयारीत ठेवण्याची, त्याचप्रमाणे आर. बोटींचे (जर्मनांच्या इंजिनवाल्या टॉर्पेडो सोडणाऱ्या छोट्या बोटी) तळ उभारण्याची आणि सागरी गस्त विभाग अहोरात्र सज्ज ठेवण्याची आज्ञा दिली. आर. बोटींचा साराच्या सारा काफिला जूनमध्येच सिसिलीहून ग्रीसकडे हलविण्यात आला होता.

पश्चिम आघाडीवर सार्डिनियात जर्मन सैन्याची जमवाजमव करण्याचा हुकूम सेना दलांच्या सुप्रीम कमांडच्या वतीने खुद्द फील्ड मार्शल विल्यम काथटेल याने आपल्या सहीनिशी काढला. सार्डिनियावर होणाऱ्या दोस्त राष्ट्रांच्या प्रखर हल्ल्याला तोंड देण्यासाठी पँझरची फार मोठी शक्ती कोर्सिकात एकवटण्यात आली. शिवाय सिसिलीच्या उत्तर किनाऱ्याच्या संरक्षणातही वाढ करण्यात आली. (पण तेथे दोस्त राष्ट्रांची सेनादळे उतरलीच नाहीत.)

पृष्ठ ५९ वर

# सखाराम बाइंडरची जातकुळी

देवीदास बागूल

नयनरम्य देखावे आणि कर्णमधुर आवाज यांची लोकांना फार आवड आहे काय? नेमकं सांगणं कठीण आहे. 'हो' म्हणून म्हणावं, तर होळी आणि शिमगा या दिवशीचं लोकांचं वर्तन आठवतं आणि 'हो' म्हटल्याबद्दल थोडातरी पश्चात्ताप होतो. 'नाही' म्हणावं तर शिमग्याची हीच भुतं दिवाळीला चांगले कपडे घालून सुंदर दिसण्याचा प्रयत्न करतात हेही आठवतं.

माणसं केवळ सणांच्याच बाबतीत असं दुहेरी वागतात असं नव्हे. साहित्य, नाटक इत्यादी कलांच्या बाबतीतही ती असंच वागताना दिसतात. जरा कुठं खुट्ट झाले, की लोक चवताळून उठतात. चार-पाच वर्षांपूर्वी 'वासूनाका' ह्या पुस्तकाच्या वेळी असाच गलगा उसळला होता. जो तो अश्लील अश्लील असं ओरडून नाकं मुरडीत होता.

हा गलगा शांत झाला न झाला तोंच 'गिधाडे' हे नाटक आलं. लोक पुन्हा अस्वस्थ झाले. भारतीय संस्कृतीचं कसं होणार अशी चिंता करू लागले. मग 'अवध्य' आलं. लोक वैतागले आणि आता 'सखाराम बाइंडर'! ह्या नाटकानं तर कहर केला. पात्रांच्या तोंडी शिव्या काय, रंगभूमीवर बायामाणसांचं झोपणं काय, कशालाच काही ताळतंत्र उरला नाही. लोकांना रंगभूमीचं पावित्र्य धोक्यात आहे, असं वाटायला लागलं. ते लेखकाला, दिग्दर्शकाला, नटांना शिव्या घालू लागले.

लोकांचं एक ठीक आहे. त्यांना जसं शिकवाल तसं ते बोलणार. त्यांना जर कुणी सांगितलं, की रंगभूमी पवित्र असते, तर ते रंगभूमी पवित्र मानणार. मग त्या पवित्र रंगभूमीवर 'सखाराम बाइंडर'सारखी अपवित्र नाटकं त्यांना कशी बघवतील? जीवनात जे काही उदात्त, पवित्र, असेल ते दाखवायचं सोडून घाणेरडे, गलिच्छ, विकृत, हिडीस असं का दाखवता?

पूर्वीच्या नाटककारांची भव्य दिव्य नाटकं आठवा !

कशी होती पूर्वीची नाटकं ?

या प्रश्नाचं खरंखुरं उत्तर हे फार अडचणीत टाकणारं आहे हे लोकांना माहीत आहे काय ?

'मृच्छकटिक' नाटकात काय आहे ? एक ब्राह्मण कुलोत्पन्न आणि विद्यासंपन्न, विवाहित आणि सवत्स पुरुष भरपावसात आणि सार्वजनिक उद्यानात एका गणिकेच्या मुलीला अष्टांगी आलिंगन देतो. हाच आदर्श आजच्या तरुणांपुढे ठेवणे इष्ट वाटते काय ? बरे, ह्या पुरुषाचे घरी बिनसले आहे असे म्हणावे तर तसे मुळीच नाही. म्हणजे घरी व्यवस्थित चालूच आहे आणि बाहेर वेश्येच्या मुलीबरोबर पावसातली मजापण चाखतो आहे. आजच्या विवाहित पुरुषांनी असे केले तर ते आजच्या समाजाला मान्य होणार आहे काय ? संभाजी पार्कात पावसाळ्यात अशी आलिंगन दृश्ये दिसली तर 'सखाराम बाईंडर'ला नावे ठेवणाऱ्या लोकांना चालेल काय ? ह्या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर द्यायला हवं. यावर कोणी म्हणतील, की 'मृच्छकटिक'चा काळ वेगळा आजचा काळ वेगळा ! ते नाटक त्या काळातलं म्हणून बघा. मग 'सखाराम बाइंडर'ही सखाराम बाइंडरच्या काळातले म्हणून बघा... मग उगाच 'रंगभूमीचं पावित्र्य' वगैरे लफडी मधे आणू नका. तेरी चूप, मेरीबी चूप !

कोणी म्हणतं, की रंगभूमीवर दिवाणखाना दाखवा, संडास नको. आपल्या घरात संडास कितीही स्वच्छ आणि भपकेबाज असला तरी पाहुण्याला काही आपण दिवाणखान्याऐवजी संडास नाही दाखवत.

काय पण दृष्टांत आहे !

असं जर आहे तर मग 'एकच प्याला' या तुम्ही डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या नाटकात काय आहे ते आठवा ना जरा. 'एकच प्याला' नाटकात तर दारुड्या नवरा आपल्या प्रेमळ आणि सती सावित्रीप्रमाणे वागणाऱ्या पत्नीला मोलाने दळायला लावतो आणि अखेरीस आपल्या दारुड्या हाताने आपलेच तान्हे बाळ ठार करतो.

कसे आहे हे दृश्य ! नयनरम्य आहे काय ? जीवनातला हा भाग दिवाणखाना आहे की संडास आहे ? दिवाणखाना म्हणताना कोणालाही शंभर वेळा विचार करावा लागेल. हा भाग जर संडास आहे, तर मग तो भाग असलेले नाटक मराठी रंगभूमीचे अभिमानस्थळ कसे ठरते ?

किंवा असे तर नाही ना, की भूतकाळातले तेवढे चांगले, वर्तमानकाळातले तेवढे वाईट ? म्हणजे लोकांना स्वतःला चांगले वाईट ठरवण्याची निर्णयशक्ती नाही असेच म्हणावे लागेल. काळ ठरवील तसे ते ऐकणार ! काळाच्या मागे निमूट जाणार ! मग मेंढरात आणि लोकांच्यात काय फरक राहिला ? लोकांचे

एक सोडा, पण जे स्वतःला सुशिक्षित टीकाकार समजून परीक्षक मंडळावर विराजमान होतात त्यांनी तरी गतानुगतिक बुद्धी टाकायला नको काय ?

एका वर्तमानपत्रात एका टीकाकाराने लिहिले, की गडकऱ्यांनी सुधाकरासारखी भव्य पात्रे निर्माण केली, पण तेंडुलकरांनी फक्त सखारामच निर्माण करावेत !

याचा अर्थ काय ?

सुधाकर भव्य का ? कोर्टातल्या अपमानाने दारु प्यायला सुरुवात करतो म्हणून भव्य, की आपल्या स्वतःच्या तान्ह्या बाळाला ठार मारतो म्हणून उदात्त ? की हे सगळे वामाचार करता करता पश्चात्तापाचे लांबलचक चिंतन करतो म्हणून श्रेष्ठ?

अधिक खरं सांगायचं म्हणजे सुधाकर हासुद्धा त्या काळी क्षुद्रच म्हणायला हवा होता. कुठे चारुदत्त आणि कुठे सुधाकर ! चारुदत्तावर एवढे मोठे संकट आले पण त्याने कधी दारूचा आश्रय घेतला नाही. पण हा सुधाकर बघा. एवढ्याशा अपमानाने एकदम दारुत बुडाला. वारे श्रेष्ठ पुरुष!

खरे म्हणजे सुंदर, गोऱ्या रंगांच्या आणि उच्चवर्णीय नायकांच्या तावडीतून सोडविण्याचे कार्य केले म्हणून जसे आपण देवल, गडकरी यांचे ऋणी असले पाहिजे तसेच आपण खानोलकर, तेंडुलकर यांचेही ऋणी असले पाहिजे. या आधुनिक लेखकांनी साहित्यांतर्गत सौंदर्याचे बंड मोडून काढले. आणि माणसाचे नायकत्व त्यांच्या कातडीतील रंगावर, जन्माच्या उच्चनीचपणावर, अंगावरील तलम कपड्यांवर अवलंबून नसून ते नायकत्व जीवनातील बऱ्यावाईटाचे कर्तृत्व स्वतःकडे घेण्यावर अवलंबून असते ही गोष्ट या नव्या साहित्यकृतीतून दाखवण्याचे युगकार्य केले आहे. ते आपण नीट डोळसपणे ओळखणे हे आपल्याच हिताचे आहे. ते अद्यापि आपण ओळखत नाही म्हणून आपण मागे पडलो आहोत. नाहीतर 'पथेर पांचाली' हा सिनेमा पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरी एकदोन दिवसांच्यावर का चालू नये ? आणि त्याच विद्येच्या माहेरघरी 'सांगत्ये ऐका' आणि 'सोंगाड्या' वर्ष वर्ष चालावेत हे कशाचे लक्षण आहे ? 'पथेर पांचाली'मध्ये दारिद्र्याचे दर्शन आहे म्हणून डोळे मिटून घेणारे लोक करंटे नाहीत तर कोण आहेत ? त्या सिनेमात उफाड्याची नायिका नाही हे कबूल ! पण त्या सिनेमात जीवनाचे जे संगीत आहे ते कधी ऐकण्याचा प्रयत्न पुण्याच्या नीतिमार्तंडांनी केला आहे काय ?

रंग, रूप, वर्ण, जात ह्यांवरून नाटकातील नायकाचे श्रेष्ठत्व ठरवून मग नाटकाचे श्रेष्ठत्व ठरवण्याचे दिवस 'एकच प्याला' ह्या नाटकानेच संपवले आहेत. तोच थोर वारसा आज जिद्दीने खानोलकर–तेंडूलकर पुढे चालवीत आहेत. हे नाते जर आजच्या मराठी प्रेक्षकांनी आणि सेन्सॉर बोर्डावरल्या मेंबरांनी ओळखले नाही तर ते झारीतल्या शुक्राचार्यांचे करंटे कार्य करत आहेत असे काळ ठरवल्याशिवाय रहाणार नाही. ◻

# सखाराम बाइंडर आणि मराठी प्रेक्षक

सौ. पुष्पा भावे

स्त्री-पुरुष संबंध हा इतका गुंतागुंतीचा अनुभव असतो, की त्यामुळे काव्यात्म प्रीतीच्या गहिऱ्या रंगापासून तो पाशवी वासनेच्या भयावह स्वरुपापर्यंत त्याची अनंत रूपे वाङ्मयात व्यक्त होऊ शकतात. सर्वसाधारणत: प्रणयाचे आल्हाद-दायी चित्रच वाङ्मयात व्यक्त व्हावे, असा सामान्य वाचकाचा आग्रह असतो. प्रसंगी संस्कृति-संरक्षकाची भूमिका घेऊन तो ठामपणे मांडलाही जातो. कलेतील श्लील-अश्लीलाचा वादग्रस्त प्रश्न कोणत्याही देशामध्ये निर्विवादपणे सोडवला गेलेला नाही. कारण त्याचे विशिष्ट कलाकृतिनिरपेक्ष असे निकष निश्चित होऊच शकत नाहीत. वाङ्मयामध्ये ज्यावेळी समाजाने निश्चित केलेल्या औचित्यबंधना-विरूद्ध बंड केले जाते, त्यावेळी त्याचे प्रतिसाद फार तीव्र होत नाहीत. वाङ्मयाचा आस्वाद व्यक्तिश: घेतला जात असल्यामुळे, त्या आस्वादप्रक्रियेमध्ये समाजाच्या दडपणाचा व्यत्यय फारसा येत नसावा. परंतु ही वाङ्मयकृती नाटकासारखे दृश्य-स्वरूप घेऊन उभी ठाकली, चारपाचशे लोकांच्या समवेत आपण तिचा आस्वाद घेत आहोत ही जाणीव निर्माण झाली, की व्यक्तीच्या प्रतिक्रिया फारच वेगळ्या होतात. याशिवाय नाटक सादर केले जात असताना शब्दगत वर्णनाचे कृतीत रुपांतर होते, त्यावेळी जिवंत पात्रांनी अनेक प्रेक्षकांच्या साक्षीने असे वागावे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. मराठी रंगमंचावर गेल्या काही वर्षांत 'गिधाडे' (श्री. विजय तेंडुलकर) 'अवध्य' (श्री. चिं. त्र्यं. खानोलकर) या नाटकांच्या संदर्भात ही चर्चा पुन्हापुन्हा होत आहे. रंगभूमीवरील या नव्या प्रवाहाविषयी कुचेष्टेने बोलले जात आहे; आणि याचवेळी वर उल्लेखिलेल्या दोन्ही नाटकांपेक्षा अधिक धीट असे 'सखाराम बाइंडर' हे श्री. विजय तेंडुलकरांचे नवे नाटक 'वेलकम थिएटर्स' या संस्थेने रंगमंचावर आणले आहे, या लेखामध्ये श्री. विजय तेंडुलकरांचे 'सखाराम बाइंडर' हे नाटक, त्याचा प्रयोग आणि 'प्रौढ' मराठी प्रेक्षकांच्या त्याविषयीच्या प्रतिक्रिया यांचा विचार करायचे योजले आहे.

आज मराठी समीक्षकांमध्ये अशी एक विचारधारा दिसते, की स्त्री-पुरुष संबंध-

विषयक धीटपणे काही सांगणारी कलाकृती नवी आणि म्हणून चांगली आहे. व्यक्तिशः मला हे मत कलाबाह्य आणि म्हणून अप्रस्तुत वाटते. हे जितके अप्रस्तुत वाटते तितकेच ज्या कलाकृतीमध्ये समाजाने निषिद्ध मानलेला अनुभव व्यक्त केला आहे ती अश्लील आणि म्हणून समाजविघातक आहे, हेही मत अप्रस्तुत वाटते. प्रत्येक कलाकृतीमध्ये एक स्व-तंत्र निर्माण होते : या तंत्राच्या तर्कक्रमात जे योग्य ते श्लील असेच मानणे योग्य होईल. म्हणूनच श्री. विजय तेंडुलकरांचे 'सखाराम बाइंडर' हे नाटक अश्लील आहे, समाजविघातक आहे, हे मत मला मान्य होणार नाही. वरवर पाहता सभ्य समाजात स्त्री-पुरुष संबंधविषयक उच्चारले न जाणारे शब्द, प्रत्यक्ष सुखाच्या प्रसंगाची सूचना, स्त्री-पुरुष संबंधातील अनेक विकृतींचे दर्शन, हे सारे भडकपणे या नाटकात आहे. परंतु या नाटकाचा सर्वांगीण परिणाम उत्तेजक नसून जुगुप्सेचा आणि माणसाविषयीच्या अतीव करुणेचा आहे. हा परिणाम जिथे आहे तिथे अश्लीलता लोकानुरंजनासाठी आलेली नसून जीवनाचा एक भेदक अनुभव व्यक्त करण्यासाठी अपरिहार्यतेने आलेली आहे हे उघड आहे.

## कथानक

'सखाराम बाइंडर' या नाटकाचा पडदा उघडतो, त्यावेळी एका दरिद्री घरात सखारामच्या मागून येणारी, साऱ्या अंगाचा संकोच करून अवघडून उभी असलेली लक्ष्मी (सौ. कुसुम कुलकर्णी) दिसते. सखाराम (श्री. निळू फुले) तिला त्या घरात राहण्याचे नियम समजावून सांगत असतो. त्यातूनच त्याची जगण्याची पद्धती, त्याचे स्वतःचे नीतिनियम (Code of conduct), मनुष्य कसा आहे ते तो निर्माण करणाऱ्या देवाला माहीत, हे त्याचे तत्त्वज्ञान, त्याचा आत्मकेंद्रित स्वभाव आणि टाकलेल्या बायकांना घरात आणून स्वतःची सोय व त्यांची गरज भागविण्याची त्याची रीत प्रेक्षकांना कळते. परंतु त्याचबरोबर घरात आल्याबरोबर देवाची चौकशी करणारी, छळानं सुकून गेलेली लक्ष्मी त्याच्या नेहमीच्या सख्यांपेक्षा वेगळी असावी अशी शंका येते. पहिल्या अंकामध्ये, सखारामची परपीडनातून सुख ओरबाडून घेण्याची (Sadist) वृत्ती, लक्ष्मीचा देवभोळेपणा, कावळ्या-मुंगळ्यांशी संभाषण करण्याची तिची सवय, दाऊद मिया (सखारामचा मुसलमान मित्र) गणपतीची आरती म्हणत असता त्याला अडवणे–त्यासाठी सखारामकडून मार खाणे, अशा विविध तपशीलातून सखाराम आणि लक्ष्मी यांच्या व्यक्तिरेखा व त्यातील परस्पर ताण व्यक्त होतात. 'हास–तशी हास' असे रात्रीअपरात्री लक्ष्मीला सांगणारा सखाराम भयावह वाटतो. अपरिहार्यपणे अंकाच्या शेवटी तो लक्ष्मीला घराबाहेर घालवतो. हा त्याचा निर्णय नेहमीच्या निर्णयापेक्षा वेगळा आहे. याच्या सूचना तेंडुलकरांनी चाणाक्षपणे निर्माण करून ठेवल्या आहेत. कोणत्याही बाईचा झाला नाही एवढा या बावळट वाटणाऱ्या लक्ष्मीचा आपल्यावर परिणाम होतो आहे, या जाणीवेने, कुठेही न गुंतणारा सखाराम, सावध होऊन तिला घालवून देतो. दुसऱ्या अंकाचा प्रारंभ पहिल्यासारखाच आहे; फक्त यावेळी सखारामच्या

मागे उभी असलेली बाई अंगाचा संकोच करणारी नाही, पुरुषाचा मान राखणारी नाही; आपल्या निसर्गदत्त रूपाचा पुरुषमनावर होणारा परिणाम जाणणारी सावध, जगाविषयी बेफिकीर आहे. सखारामच्या वक्तव्याचा तिच्यावर काही परिणाम होत नाही. एका दृष्टीने चंपाच्या (सौ. लालन सारंग) आणि सखारामाच्या विचारपद्धतीत साम्य आहे. जगाच्या आधाशी नजरांपासून संरक्षण म्हणून ती सखारामाच्या घरात आली आहे. तरी शुद्धीवर असताना पुरुषसंबंध तिला किळसवाणा वाटतो म्हणून ती दारूच्या नशेचा वापर करते. पुढे पुढे त्या नशेचीच सवय होते. तिचा नवरा एक वेकार फौजदार (सखाराम भावे) केविलवाणा, लाचार वाटतो; परंतु त्यानेच चंपाला नकळत्या वयात विकत घेऊन तिच्या आयुष्याचे धिंडवडे केले आहेत, असेही चंपाच्या उद्रेकातून कळते. 'मला तिच्या हातचा मार हवाय' म्हणणारा हा फौजदार आत्मपीडनात व परपीडनात रतिसुख शोधणारा, स्वतःच्या पौरुषावर विश्वास नसल्याने विकृत झालेला, एकाचवेळी घृणास्पद व दयनीय वाटणारा माणूस आहे.

## तिसरा अंक

नाटककारने या पहिल्या दोन अंकात सखाराम–लक्ष्मी, सखाराम–चंपा, चंपा–फौजदार यांच्या संबंधातून स्त्री-पुरुष संबंधातील अनेक भयावह घृणास्पद अशी रूपे व्यक्त करून या सर्वांची एक विचित्र अशी आकृती निर्माण केली आहे. परंतु या आकृतीला लक्षणीयत्व प्राप्त होते ते तिसऱ्या अंकातील लक्ष्मीच्या परत येण्यामुळे आणि तिच्या आणि चंपाच्या नात्यामुळे. लक्ष्मीला कोठेही आसरा नसल्यामुळे ती परत येते; परंतु सखाराम तिला घरात घेत नाही; चंपा मात्र तिला घरात घेते; या लक्ष्मीपासून आपल्याला काही भय नाही असे तिला वाटते. परंतु लक्ष्मी घरात वावरते आहे. याचे नकळतपणे सखारामवर, त्याच्या प्रमत्त वासनेवर दडपण पडते. चंपा त्याचा धिक्कार करते. त्या रागात तो लक्ष्मीला घराबाहेर काढत असता ती त्याला सांगते: चंपा बेइमान आहे, दाऊदशी तिचे संबंध आहेत: सखाराम रागाच्या भरात चंपाचा खून करतो. कोणी इतर नाटककार असता तर हे नाटक इथे संपले असते. परंतु तेंडुलकरांनी सखाराम, चंपा, फौजदार, दाऊद या सर्व अनैतिक, असंस्कृत वाटणाऱ्या पात्रांच्या चित्रणाला लक्ष्मीच्या वरवर गरीब, पापभीरू वाटणाऱ्या पण अंतरी मत्सराने जळणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा छेद फार चातुर्याने दिला आहे. 'मी खून केला असे सखाराम ओरडतो; परंतु लक्ष्मी मात्र त्याला गप्प करते; चंपा पापीच होती, असे समर्थन करते; आणि तिथून पुढे नाटकाला एका भीषण मूकनाटयाचे (Pantomime)चे स्वरूप येते. सखाराम निष्क्रीय, स्तब्ध आहे, तर लक्ष्मी उत्साहाने चंपाला गाडण्यासाठी खड्डा खणते आहे. मुंगळ्यांना साखर घालणारी, कावळ्याशी हितगुज करणारी देवभोळी लक्ष्मी खून दडवायला तयार होते, स्वपावित्र्याची भूमिका घेऊन न्याय देण्याचा आव आणते, तर, क्रूर, आत्मकेंद्रित वाटणारा सखाराम मात्र चंपाच्या खुनाने हतबुद्ध झालेला आहे. लक्ष्मी-

विषयी सहानुभूती बाळगणाऱ्या प्रेक्षकाला नाटकाच्या अंती असा हा धक्का देऊन नाटककाराने मानवी अंतरंगातील कुरूपतेचे हे थरारक चित्रण पुरे केले आहे.

## आकर्षक प्रयोग

स्त्री-पुरुष संबंधाच्या मन उत्तेजित करणाऱ्या चटकदार चित्रणापेक्षा 'सखाराम बाइंडर' या नाटकाचा स्वभाव कसा वेगळा, गंभीर आहे हे कळावे म्हणूनच त्याचे कथानक तपशीलवार सांगितले. हे नाटक दृश्यरूपाने सादर करणे अत्यंत अवघड होते. श्री. कमलाकर सारंग या दिग्दर्शकाने या नाटकाचा स्वभाव जाणून ते सादर केले आहे. 'श्रीमंत' या नाटकापासून आधुनिक मराठी रंगभूमीशी श्री. सारंग यांचा निकटचा परिचय आहे, तो प्रामुख्याने नट म्हणूनच. व्यावसायिक पातळीवरील नाट्यांचे दिग्दर्शन करण्याचा, मला वाटते, त्यांचा हा पहिलाच यत्न आहे. प्रथमदर्शनीच त्यांचे कौशल्य जाणवले ते पात्रयोजनेच्या संदर्भात. निळू फुले या लोकनाट्यातील नटाला सखारामची भूमिका देण्यात व सौ. कुसुम कुलकर्णी यांना लक्ष्मीची भूमिका देण्यात श्री. सारंग यांनी नाटककाराने निर्माण केलेल्या व्यक्तिमत्त्वाची सूक्ष्म जाण दर्शवली आहे. श्री. फुले ज्या सहजतेने सखारामाच्या भूमिकेत वावरले, त्यांच्या तोंडी असलेल्या खमंग वाक्यांना प्रेक्षक दाद देत आहेत याकडे त्यांनी ज्या संयमाने दुर्लक्ष केले, त्यासाठी त्यांचे कौतुक करणे आवश्यक आहे. लोकनाट्यात प्रामुख्याने विनोदी भूमिका करणाऱ्या या नटाने सखाराम हास्यास्पद होऊ न देण्याविषयी जी काळजी घेतली ती नाट्यपोषक अशीच होती. सौ. कुसुम कुलकर्णी ही विशिष्ट व्यक्तिमत्त्व असणारी नटी क्वचितच मराठी रंगमंचावर दिसत असली, तरी तिचा अभिनय संस्मरणीच असाच असतो. या नाटकात पहिला अंक आणि तिसऱ्या अंकाचा उत्तरार्ध यामधील लक्ष्मीच्या व्यक्तिमत्त्वातील अंतर सौ. कुलकर्णी यांनी फार कौशल्याने उभे केले. तसेच सखारामशी बोलण्याचा आवाज, मुंगळ्याशीं बोलण्याचा आवाज, यातील भेदही त्यांनी नेमका प्रस्थापित केला. सौ. लालन सारंग यानी चंपाचे पात्र साकार करताना, आवाजाला दिलेला झोका, दोन पात्रात अंतर ठेऊन उभो राहण्याची सवय, बोलण्यातील रासदटपणा इत्यादी तपशीलांनी लेखकाने निर्माण केलेल्या व्यक्तिमत्त्वाला न्याय दिला आहे.

या नाटकाची रचना अनेक दृश्यांनी घडविलेल्या अंकांची आहे. त्यामुळे प्रत्येक दृश्यानंतर अंधारात रंगमंचावर काही बदल झटपट करावे लागतात. ते करीत असताना मात्र श्री. सारंगांचो सफाई अपुरी पडलो आहे. अंधार अधिक गडद होणे आणि मदतनिसांना गडद रंगाचे कपडे देणे, अत्यावश्यक होते.

श्री. सारंग यांनी गांभीर्यपूर्वक जबाबदारीने 'सखाराम बाइंडर' हे नाटक सादर केले आहे आणि त्यांच्या नटवर्गानेही त्यांना योग्य साथ दिली आहे. पहिल्या प्रयोगानंतर श्री. सारंग यांनी काही बदल केले असेही ऐकले. परंतु तरीही या प्रयोगात अशा काही जागा आहेत की तेथे विशिष्ट शब्दप्रयोग केवळ धक्का देण्यासाठी वापरले आहेत की काय अशी शंका येते. मराठी प्रेक्षकांची तयारी लक्षात घेऊन या काही जागा त्यांना टाळता आल्या असत्या.

# प्रौढ कोण ?

'सखाराम बाईंडर' हे नाटक प्रौढासाठी आहे. एखादी कलाकृती ज्यावेळी फक्त प्रौढासाठी आहे असे आपण म्हणतो त्यावेळी आपल्याला काय अभिप्रेत असते? ज्या माणसाला समोर दिसणाऱ्या दृश्याचा संपूर्ण कलाकृतीच्या चौकटीत विचार करता येतो असा मनुष्य, शृंगारदृश्यामुळे ज्याचे चित्त अतार्किकपणे विचलित होत नाही असा मनुष्य, जीवनातील अनेक गुंतागुंतीचे अनुभव जाणून घेऊ शकेल असा मनुष्य 'प्रौढ' या विशेषणातून आपल्याला अभिप्रेत असतो. परंतु प्रत्यक्षात काय दिसते? एरवी प्रायोगिक रंगभूमीच्या वाटेला न फिरकणारी माणसे आंबट षौक म्हणून 'गिधाडे,' 'अवध्य,' 'सखाराम बाइंडर' या नाटकांना गर्दी करतात. म्हणजे नाटककाराच्या वा नटांच्या जे मनातही नसते त्या हेतूने हे प्रेक्षक नाटक पाहायला वा प्रक्षिप्त शब्द ऐकायला येतात. अशी नाटके पाहायला आपण आलो आहोत याविषयी एक अपराधीपणाची जाणीव या प्रेक्षकांच्या मनात असते आणि ती झाकण्यासाठी न्यायाधीशाची भूमिका ते घेतात. परवा 'सखाराम बाइंडर'च्या प्रयोगाला असे अनेक प्रेक्षक होते. नाटकाचा अंक चालू असताना, नाटकातील अनुभव जाणून न घेता, केवळ एखाद्या शिवीला, वाक्प्रयोगाला उन्माद झाल्यासारखे हे प्रेक्षक हसत होते. ज्याठिकाणी नाटककार व दिग्दर्शकाने औचित्याने अंधार करून प्रसंग सूचित केले होते. त्याठिकाणी स्वतःच्या कल्पनाशक्तीचा वापर करून अश्लील वडबडत होते. मात्र अंकानंतर दिवे लागताच, हेच प्रेक्षक संस्कृतिसंरक्षकाचा बुरखा पांघरून श्री. तेंडुलकर, श्री. सारंग व सौ. सारंग यांच्यावर ताशेरे झाडत होते. ज्या माणसांना शांत मनाने एखाद्या कलाकृतीचा आस्वाद घेता येत नाही, ज्या माणसांना स्त्री-पुरुष संबधाविषयी गांभीर्याने, विचार करणे समजू शकत नाही त्या माणसांना 'प्रौढ' म्हणायचे कशाला? 'सखाराम बाइंडर' हे नाटक थिल्लर (cheap) पद्धतीने शृंगार रंगविणारे नाही, ते थिल्लर होते वर उल्लेखिलेल्या प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांमुळे. मराठी प्रेक्षकाने आपला तोल राखण्याचा व कलोपयोगी दृष्टी निर्माण करण्याचे यत्न केले नाहीत तर त्यांच्यासाठी नाटककार व कलावंत काय करू शकणार?

'सखाराम बाइंडर' या नाटकात श्री. विजय तेंडुलकरांनी स्त्री-पुरुषसंबंधाच्या अनेक विकृतींची एक लक्षणीय आकृती दृश्यमाध्यमाच्या विलक्षण जाणीवेने सादर केली आहे. कोणताही पूर्वग्रह मनाशी न बाळगता मराठी प्रेक्षक हे नाटक पहायला गेले, तर या नाटकातील भयावह अनुभवाचा ते स्वीकार करू शकतील. हे ज्यांना जमत नाही त्यांनी मुलाबाळांना घेऊन हिंदी चित्रपटाला जावे आणि त्यातील कॅबेरे, नायिकेचे विशिष्ट कोनातून टिपलेले शॉट्स यावर आगगाडीत चवीने चर्चा करावी.

□ □ □

८ एप्रिल १९७२

पृष्ठ २० वरून

सूत्र सर्रास अनैतिकतेचं चित्रण करण्याचंच आहे. मात्र ह्याचा पैसे मिळविण्याशी सुतराम संबंध नाही. चार चव्वल मिळवणं ही जर माझ्या लेखनामागची प्रेरणा असती, तर सलामीच्या आर्थिक यशानंतरच मी लेखनाला टाळं लावलं असतं. Liza of Lambeth ही माझी पहिली कादंबरी. तिचं मानधन म्हणून मला फक्त वीस पौंड मिळाले. इतक्या क्षुद्र मानधनासाठी कुणी लेखनाचा आटापिटा करेल काय ? पण तें कसंही असो, शहाणा माणूस तोच, की जो निग्रहपूर्वक लेखन योग्य वेळी थांबवतो आणि काळाच्या घसरगुंडीवरून अलगद उडी मारून दूर होतो. मॅक्स बिरबॉम हा असा शहाणा लेखक. त्याने निष्ठापूर्वक लेखन थांबवलं, लंडनला कायमचा रामराम ठोकला आणि आता तो त्याच्या खेड्यावर शांतपणे स्वतःच्या पद्धतीचं जीवन जगतो आहे. जणू काही काळाच्या बर्फात तो गोठून गेला आहे. न लिहूनही त्याची शान कायम आहे. किंबहुना न लिहिलेल्या प्रत्येक पुस्तकागणिक त्याची प्रतिष्ठा वाढतच आहे आणि मी मात्र शतमूर्ख ठरलो ! मी सतत लिहीत राहिलो आणि लोक मला सुनवीत राहिले, ' महाराज तुमचं ह्याच्या आधीचं पुस्तकच चांगलं होतं ! '

पाऊणशे वर्षं सतत लिहित राहून पाच कोटी शब्दांची दौलत उधळणाऱ्या सॉमरसेट मॉमची ही असली चमत्कारिक, परस्परविरोधी, मिष्किल, चातुर्यनिदर्शक आणि कुठे तरी सत्याचा नेमका तळ गाठणारी मतं. मॉम एक्याण्णवाव्या वर्षी घरात पडल्याचं निमित्त होऊन वारला. त्याच्या अखेरच्या आजारपणाची बातमी आल्याबरोबर गार्सनने डायरीत नोंदी सुरू केल्या. त्यातल्या काहींची झलक :–

" रात्री अकराच्या सुमाराला टेलिव्हिजनवर बातमी आली, की मॉम पडला. मार लागल्यामुळे तो महागुंगीत आहे. आम्ही जगभरचे काटे फिरवले. जिकडे तिकडे हीच बातमी. अधिक प्रकाश पडला नाही. मी नुकतंच मॉमला मृत्यूबद्दल विचारलं होतं. मॉम म्हणाला होता, मित्र हो, मरणाला डरू नका. मृत्युमुळे जितके प्रश्न निर्माण होतील त्यापेक्षा अधिक प्रश्न चुटकीसरशी सुटतील. मॉमचा चिटणीस सांगत होता, की अलीकडे मॉम रोज रात्री झोपताना प्रार्थना करतो, ' उद्याचा दिवस मला दिसू देऊ नको.' असं असूनही मॉमची जीवनेच्छा विलक्षण प्रबळ आहे. एकदा तो म्हणाला होता माणसं सवयीची गुलाम असतात. मॉमला जीवनाचा प्याला आकंठ पिण्याची सवय जडलेली दिसते. उशीरा बातमी आली आहे, की मॉमची प्रकृती सुधारत आहे. ह्याचा अर्थच हा की मॉम जगण्याच्या बाबतीत पक्का चिवट गडी आहे. गेले काही दिवस मॉमचा चेहेरा आस्ते आस्ते बदलत आहे. आक्रसत आहे. कदाचित त्याची उंचीही आटत असावी. तसा

तो ठेंगण्यातच जमा. तरीसुद्धा त्याचं खुजेपण वाढत असावं. आपल्या ठेंगणेपणाला उद्देशून तो म्हणाला होता, ठेंगणं असलेलं पथ्यावर पडतं, कारण मृत्यूच्या नजरेच्या टप्प्यात तुम्ही येत नाही. तुम्हाला आपसुखच जिवदान मिळतं.' एका बाजूने हा असं बोलतो नि दुसऱ्या बाजूने काकुळत सांगतो, 'वृद्धपण खराब. जुन्या आठवणींचं ओझं वाहायचं तरी किती वेळ ? चांगलं लांबरुंद आयुष्य लाभलं तर तुम्ही कीर्तिमान होऊ शकता, पण जर का तुम्हाला काहीच्या काहीच लांब आयुष्य मिळालं तर तुम्ही विस्मृतीच्या खोल दरीतही गाडले जाता. तेव्हा दिर्घायुष्यापासून सावधान !

❀

---

## मेजर विल्यम मार्टीन. . . पृ. ४९ वरून

दोस्त राष्ट्रांच्या सिसिलीवरील मोहिमेला सुरुवात झाली तरीसुद्धा मुख्य हल्ला कोर्सिका व सार्डिनियातच होईल हाच विचार ठाम राहिला आणि जिब्राल्टरच्या आखातावरच कडक नजर ठेवण्याचा जर्मन नौदलाला हुकूम देण्यात आला होता.

आर बोटींचा काफिला ग्रीसकडे हलविल्यामुळेच जर्मन सेनादळांच्या वर्मी घाव बसला अशी कडक टीका एका जर्मन अहवालात करण्यात आली होती.

मेजर मार्टिनच्या कामगिरीचा सर्वांत चांगला पुरावा फील्ड मार्शल रोमेलच्या व्यक्तिगत कागदपत्रांवरून मिळतो. तो लिहितो– "एका मुत्सद्दी निरोप्याचे प्रेत स्पेनच्या किनाऱ्याला लागले खरे, पण त्यामुळेच दोस्तराष्ट्रांचा सिसिलीवरील हल्ला यशस्वी ठरला आणि जर्मन सेनादळांचा साफ बोजवारा उडाला."

हिटलरनेही ती कागदपत्रे पाहिली असावीत. कारण ॲडमिरल डोनिझने आपल्या दैनंदिनीत पुढील मजकूर नमूद करून ठेवला होता. "सिसिलीवरच दोस्तराष्ट्रांचा हल्ला येईल याच्याशी फ्युरर सहमत नव्हता. ॲंग्लो अमेरिकनांकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रांवरून असा हल्ला सार्डिनिया आणि पेलो पोनसस् येथेच होईल यावर त्याचा ठाम विश्वास होता."

मेजर मार्टिन ? छे ! ते एक निव्वळ शव !! पण त्या शवानेच जर्मनांना अगदी बेमालून चकविले आणि दुसऱ्या महायुद्धात एक वेगळाच पराक्रम केला.

□ □ □

शरद गोखले

# रंगभूमी

# सूर राहू दे

## चांगला विषय : भडक मांडणी

अभिजात या नाटच संस्थेने 'सूर राहू दे' ही शं. ना. नवरे यांची नवीन 'स्वतंत्र' कलाकृती रंगभूमीवर सादर केली आहे. शं. ना. नवरे यांच्या अनुवादित कलाकृती बऱ्याच मोठ्या प्रमाणामध्ये अलिकडे रंगभूमीवर आल्याने स्वतंत्र या शब्दावर जरा विशेष अर्थाने मी भर दिला आहे.

ध्येयवादाने प्रेरीत होऊन डॉ. बापू एका आडगावी जाऊन आपला व्यवसाय सुरू करतात. अर्थात ध्येयवादाने प्रेरित होऊन खेडेगावी गेल्याने व्यवसायापासून चरितार्थापेक्षा फार मोठी प्राप्ती व्हावी अशी अपेक्षा असते. डॉ. बापू यांच्या घरामध्ये पत्नी अरुंधती, भाचा मोहन, एक मुकी तरुण मोलकरीण इतकी अन्य मंडळी आहेत. शहरी जिवनावर प्रेम करणारी अरुंधती खेड्यातील कंटाळवाण्या जिवनाला कंटाळली असतानाच, तिच्या आयुष्यात पूर्वीचा प्रियकर शेखर अचानकपणे येऊन उभा राहतो आणि एका मुलाची आई असलेली अरुंधती आपल्या प्रियकराचा हात धरून पळून जाते.

शहरी शिकण्यासाठी ठेवलेल्या आपल्या मुलाला बापू घेऊन येतात आणि आपली एकमार्गी वाटचाल चालू ठेवतात. घरामध्ये त्यांच्याखेरीज तरुण मोलकरीण असते. स्वाभाविकपणेच या गोष्टीचा बभ्रा होतो. जाहीर सभेत डॉक्टर आपली बाजू मांडतात. वरकरणी भांडलो तरी मोलकरणीच्या मनामध्ये रुजू पहात असलेला प्रितिचा अंकूर बापूंच्या वेधक नजरेला अचूक दिसतो. आणि तसा काही प्रसंग आलाच तर निभाऊन नेणे कठीण आहे याचीही त्यांना जाणीव होते.

गावातील वडीलधाऱ्या माणसाकडे मोलकरणीला पाठवण्याची योजना निश्चीत केलेली असतानाच मुंबईला गेलेली अरुंधती परत येते. अरुंधतीच्या परत येण्यामध्ये आपला जय आहे अशी बापूंची भावना असली, तरी तिने कधीही परत येऊ नये अशी त्यांची इच्छा असते. अपमानित जिणे वाटचाला आलेली अरुंधती एका विश्वासाने घरी आलेली असते. परंतु कठोरपणे बापू तिला घर सोडून जाण्यास सांगतात. वडिलांच्या तालमीमध्ये तयार होत असलेला मुलगाही वडिलांचाच 'सूर' उचलून धरतो आणि अरुंधती घर सोडून जाते.

## सोज्वळ कलाकृतीचा ठसा

आसक्ती आणि निरासक्ती, त्याग आणि भोग यातील संघर्षाला नाट्यरूप देणारा शं. ना. नवरे यांचा हा विषय चांगला चटकन भिडणारा आहे. विषयाची मांडणी, आणि संवादाची झालर या दोन्ही गोष्टी फार भडक, बटबटीत झाल्या आहेत. असे असले तरी दुभाषींच्या तोंडून येणारे काव्यमय संवाद कानाला आनंद देउन जातात. भाषा खोटी असली तरी डौलदार आहे. विषय मांडणीतले नाट्य खोटे असले, तरी 'चालू' पद्धतीचे असल्याने भिडणारे आहे. अत्यंत थंड मनाने परत आलेल्या आरुंधतीचे स्वागत करणारे बापू खोटे आहेत, प्रेक्षक त्याच बापूंना खरे धरतात. आणि आपले खरे स्वरूप जेव्हा बापू स्पष्ट करतात, तेव्हा प्रेक्षकांना विस्मय वाटतो. एक नाटकी घटना म्हणून त्याचा उल्लेख केला. शेखरच्या तावडीत सापडलेली अरुंधती सही सलामत सुटत हा एक चमत्कारच समजावा लागेल. ध्येयवादाने प्रेरित झालेले बापू खेड्यात स्वतः शाळा सुरू करतात परंतु आपल्या स्वतःच्या मुलाला पुण्याला ठेवतात हे कसे पटावे? अर्थात हे सर्व जरी असले, तरी एक चांगली सोज्वळ कलाकृती म्हणून नाटक जबरदस्त ठसा उमटवून जाते ते मान्य करावेच लागेल, आणि त्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंताकडे विशेषतः सतीष दुभाषी, व पुष्पा भोसले यांच्याकडे जातो हे नमूद करावे लागेल.

सतीष हा एक जबरदस्त ताकदीचा कलावंत आहे. मेजर चंद्रकांत, चक्रव्युह, बिबी करी सलाम, प्रिती परी तुजवरती, हवा अंधारा कवडसा,–अशा अलिकडील कित्येक नाटकातून त्यांनी स्वतःच्या सामर्थ्याची चुणुक दाखविली आहे. विलक्षण सहजता, वाक्याचा अर्थ समजावून घेऊन त्याची फेक करण्याची हातोटी, ही सतीषची प्रमुख वैशिष्ठ्ये. या नाटकातील त्यांचा बापू वैशिष्ठ्याच्या या लेण्यांसह प्रेक्षकांसमोर येतो. मुक्या तरुण मोलकरणीची भूमिका पुष्पाने मन लावून केली आहे. आपली समज वाढल्याचा प्रत्यय ती खचीत जाणवून देते. बापू बरोबर एक छोटे स्वप्न दृष्य तिने छान जिवंत केले आहे.

लता काळे, शेखरचे काम करणारा कलावंत,– आणि छोट्या बिंदूचे काम करणारा मुलगा– निराशा करतात, तर शंकर घाणेकर काही वेळा चक्क 'बोअर' करतात. नंदकुमार रावते यांनी प्रयोग व्यवस्थित बसवला आहे. निर्मितीची बाजू व्यवस्थित सांभाळली गेली आहे. वसंत कानेटकर यांचे हिमालयाची सावली प्रेक्षकांच्या पडावे तितके पचनी पडलेले दिसत नाही. ध्येयवादी माणसाचे 'सूर राहू दे' मधील नाटकी चित्रण कदाचित आपला प्रेक्षक जास्त आपुलकीने पाहील असे वाटते.

◻ ◻ ◻

आहे. दहा-बारा फुटांवर बोलणं सुरूच आहे.

'अय्या, एवढ्या टॉप मोटारी वगैरे त्यांच्याकडे असतील असं वाटलं नव्हतं! येतील ते निवडून नक्की, नाही ?'

'मग काय तर! शिवाय ते कॉंग्रेसचे आहेत, म्हणजे नक्कीच निवडून येणार!'

'जाऊ दे ग! यायचं ते येतील! चल पटकन आइस्क्रीम खाऊन येऊ या! मला तर बाई बोअर झालंय्! नंतर पाहू डिसेक्शनचं!'

हेमचंद्र गुप्त्यांना कॉंग्रेसमध्ये कोंबलेले ऐकल्यावर मी बर्फापेक्षा गार झालो! या मुली बाहेर पडायच्या आधी मी कडू कॉफी पिण्यासाठी कॅंटीनकडे कूच केले. शिवसेनावाल्याला कॉंग्रेसमध्ये न्यायचं पुण्य त्या करायला लागल्या, म्हटलं आपण सटकणं बरं! जाऊ दे, या मुली आता डबल ग्रॅज्युएट होणार आहेत. सुशिक्षित की सुसाक्षर काय ते म्हणतात तशा आहेत. त्यांच्या स्टेटसकडे बघा! थांबा, थांबा हं! त्यांच्याबरोबर आइस्क्रीम खायच्या अपेक्षेने जाऊ नका. त्या मघाच्याच मुलाच्या परवाच्याच अनुभवावरून सांगतो, तुम्हाला कटवून तुमचा 'इज्जतका फालुदा' करतील त्या! जाऊ देत. खाऊ देत बिचाऱ्या! ऑफकोर्स, निवडणुकांसारख्या रुक्ष विषयावर बोलण्यापेक्षा रोज आइस्क्रीम खाण्यात कित्ती कित्ती मजा येत असेल नै?

## प्रसंग क्रमांक दोन

स्थळ : कॉलेजचे होस्टेल.

रोज सायंकाळी माझ्या रूमवर समोरच राहणाऱ्या प्राध्यापकांच्या ब्लॉक्समधून चार इयत्ता गोळ्या खायला येतात. पहिली, दुसरी, तिसरी व चौथी. अनुक्रमे रुचिर, मिनोती, आरती आणि आभा. (रुचिर हा मुलगा. इतर तीन मुली. नाही, म्हणजे हल्ली नावावरून 'हे' कळतच असं नाही, म्हणून खुलासा. परवा 'विस्मय' हे नाव ऐकलं आणि चक्क विस्मय वाटला. मी सांगणाऱ्याला ताबडतोब सुचवलं, की विस्मयच्या बहिणीचं नाव अचंबा ठेवावं आणि ती त्याची बहीण आहे हे कळण्यासाठी प्रत्येक वेळी मागे 'अग' लावून हाक मारत जावं.) तर काय म्हणत होतो, अशी ही चार मुलं. रोज पंधरा-वीस मिनिटं गोंधळ करून, भांडून, धुडगुस घालून सगळी खोली डोक्यावर घेतल्याशिवाय त्यांना जसं चैन पडत नाही तसं मलाही पडत नाही. प्रत्येकाला उजव्या हातात एक आणि डाव्या हातात एक अशा दोन-दोन गोळ्या लागतात–शनिवार, रविवार मी माझ्या घरी गेलो, की

शेजारचे म्हातारे आजोबा मला कुकुलं बाळ समजून आठवडाभर पुरतील इतक्या गोळ्या देतात. त्यांचंच इथं फेरवाटप होतं—दिलेल्या गोळ्यांबद्दल मला प्रत्येकी दोन गालगुच्चे द्यायची या चार इत्तांची तयारी असते. दोन्ही बाजूंनी अटी पूर्ण होतात. 'तू यहाँके मेसमे खाता है क्या ?' 'तेरा कॉलेज सुबह कितने बजे शुरू होता है ?' वगैरे नसत्या चौकशा होतात. 'अवर डॅडी इज नाइस मॅन', 'माय मम्मी इज सो फाइन,' इत्यादी उद्गारही ही मुलं काढतात. पण मुख्य मजा निवडणुकीच्या आदल्या दिवशी झाली, तीच सांगणार आहे.

'अरे, टुमॉरो इलेक्शन है ना ?'—आरती.

'हाँ है तो सही ! पर तुमको कैसे मालूम ?'—मी.

'अरे बाबा, हमको सब मालूम होता है, लेकिन तू किसको वोट देगा, यह तो बताओ ऽऽ !' जिवणीचा ओ करून आभा म्हणते.

'मुझको अबतक वोट नहीं है, तो मैं कैसे बताऊँ ?'—मी.

'लेकिन होता, तो तू किसको देता ?' दुसरीतली मिनोती म्हणते. आपण चाट. पण आता या पोरांची जरा फिरकी ताणूया.

'वोट होता, तो काँग्रेसको देता !'—मी.

'याने इंदिरा गांधीकी काँग्रेस ?' इंदिरा गांधीवर जोर देत प्रफुल्ल चेहऱ्याने आरती विचारते.

'हाँ हाँ, बस बस, वोही ! मैं तो चरखा चलानेवाली महिलाकोही वोट देता !' मी हाताने चरखा चालवायचा अभिनय करून काढलेले सूत हातभर उंचीवर नेत नेत सांगतो.

'आऽऽहा ! सी ही इज मॅड ! इंदिरा गांधीको वोट देना है तो काऊ अँड काफपर सिक्का लगाना पडेगा ! इतनाभी इसे समझता नहीं है, छी छी !' असं म्हणत मला जीभ दाखवत आभा खोलीभर वासरासारखी नाचत सुटते.


# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, पुणे

'ठीक है बाबा! काऊ अँड काफपर सिक्का, बस्स!' –आता झालं का समाधान असं विचारायच्या आविर्भावात मी म्हणतो.

"एऽऽ, एऽऽ, काऊ अँड काफ, गाय और बछडा! इंदिरा गांधी झिंदाबाद, 'दिलीप निक्सन' मुर्दाबाद" असं म्हणत ही चौघंही खोलीभर नाचू लागतात. युद्धकाळामध्ये एकदा रुचिर व भारतीचं भांडण झालं होतं आणि ती एकमेकांशी बोलत नव्हती. हे मला माहीत नव्हतं. मी रुचिरला, तो माझ्याकडे प्रथम आला म्हणून आधी गोळी दिली. म्हणून आरती मला निक्सन म्हणते आणि स्वतःला इंदिरा गांधी म्हणवून घेते. असा 'दिलीप निक्सन'चा उगम. मीही त्यांच्या गोंधळात टाळ्या वाजवून सामील होतो. गोंधळाला ताल येतो. पण मध्येच मिनोती थांबते. रुचिरची बकोट पकडते. 'ए, वी वॉंट रुचिर, टेल हिम टू गो!' असं मला सांगत सगळ्यांना थांबवते. रुचिर चक्रावतो. मी मिनीला विचारतो, 'बट व्हाय?' मिनीचे उत्तर तयार असते. ती म्हणते, 'रुचिर वॉज टॅलिंग दॅट हिज फादर विल वोट दॅट 'स्टार'!' आभा तिच्या सुरात सूर मिसळते, 'यस, वी वोंट टॉक विथ रुचिर! हिज फादर विल वोट नारायण दांडेकर.' 'हमभी रुचिरके साथ नहीं बोलेंगे. स्वतंत्रवाला इंदिरा गांधीसे अच्छा नहीं होता है!' इति आरती. रुचिर थोडासा रडायलाच येतो, पण एकदम सावरून म्हणतो, 'मैं भी इंदिरा गांधीवाला हूं! मैं पप्पाको बता दूंगा, चलो चलो!!

गोळ्या चघळत, हातात हात घालून कंपनी निघून जाते. सकाळचा कॉलेजमधला प्रसंग आठवतो. अभ्यास करतानाही मला अधूनमधून हसू येत राहतं ते प्रथम कॉलेजमधल्या पोस्ट ग्रॅज्युएट 'काऊ'च आणि नंतर प्राध्यापकांच्या अंडर प्रायमरी शिंगरांचं! काऊ अँड काफ, काऊ अँड काफ!!!

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे यथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

" आम्ही विजयी झालो.
आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे "

स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या पहिल्याच भाषणात
विजयोन्मादाने माओ-त्से-तुंग असे म्हणत होता.

आणि खरोखरच सारे जग हादरून गेले.
शतकानुशतकांच्या सुस्तपणानंतर
अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या
फटकाऱ्यामुळे अक्राळ–विक्राळ शक्तीचा चीन
खडबडून जागा झाला.

या चिनी
कम्युनिस्ट क्रांतीची कथा

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरूण साधू

राजहंस प्रकाशन : पुणे
मूल्य : चौदा रुपये